

महाराष्ट्राचे जिल्हे

अहमदनगर

५०४

३०३
व. भा.

महाराष्ट्राचे जिल्हे

अहमदनगर

किंमत २५ नवे पैसे

महाराष्ट्र सरकारच्या प्रसिद्धि खात्याचें प्रकाशन

अनुक्रमणिका

मुखपृष्ठावरील रेखाचित्र—अहमदनगरचा किल्ला

अहमदनगर जिल्हा

पार्श्वभूमि

अहमदनगर जिल्हा हा विकासकार्याच्या बाबतींत सदा आघाडीवर रहाणारा जिल्हा आहे. प्रगतिपथावर नेऊन सोडणारी एखादी गोष्ट आहे आणि ती त्यानें तात्काळ केली नाहीं असें सहसा कधीं झालेंच नाहीं. परवां-परवांच्या गोष्टी घ्या. तालीबांधाच्या बाबतींत केवढा विक्रम केला आहे या भागांतील शेतकऱ्यांनीं ! अल्पबचत योजनेच्या आणि कुटुंबनियोजनाच्या बाबतींत झालों तरी येथील लोकांनीं बहुमोल कामगिरी बजावली आहे. आणि सहकारतत्त्व आत्मसात् करून तें प्रत्यक्ष कृतींत उतरवून दाखविणारा या जिल्ह्यांतल्या इतका जागृत समाज इतरत्र क्वचितच आढळेल. साधेसुधे व कर्तृत्ववान शेतकरी मोठमोठाले सहकारी साखरकारखाने काढू शकतात इतकेंच नव्हें तर ते यशस्वीरीतीनें चालवून दाखवूं शकतात हें त्यानीं सिद्ध करून दाखवून अहमदनगर जिल्ह्याचें नांव नुसत्या महाराष्ट्रांतच नव्हे तर साऱ्या भारतांत पसरविलें आहे. त्यांतूनहि या भागांत ऐतिहासिक काळांतच नव्हें तर त्यापूर्वींच्या पौराणिक काळांतहि मोठमोठाल्या लोकांचें वास्तव्य होऊन महत्त्वपूर्ण अशा घटना घडल्यामुळें या जिल्ह्याचें नांव फार प्राचीन काळापासून सर्वतोमुखीं झालें आहे.

परिचय

आजचा नगर जिल्हा हा पूर्वीं दण्डकारण्य म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भागांत मोडत होता. या जिल्ह्याच्या उत्तर भागांतून वहाणाऱ्या गोदावरी आणि प्रवरा नद्यांच्या कांठांवर पूर्वीं मोठालीं व निबिड अशीं अरण्यें होतीं. तेथें सर्वसंगपरित्याग करून घोर तपांत मग्न होणाऱ्या ऋषीमुनींचें वास्तव्य असें. रघुकुलावतंस राजा राम यानें त्याच्या वनवासाचा कांहीं काळ गोदावरी आणि प्रवरा नद्यांच्या कांठीं घालविला असल्याचें सांगण्यांत येतें. म्हणूनच त्याच्या वनवासाच्या काळांत घडलेल्या बऱ्याच महत्त्वपूर्ण घटनांचा या भूमीशीं संबंध जोडला जातो. सुप्रसिद्ध जटायूकथा ही याच भागांतील पट्टा किल्ल्यावर घडल्याचें बोललें जातें. इतकेंच नव्हें तर रामायण घडवून आणणारी सुवर्णमृगाची गोष्टहि याच भागांत घडली आणि लंकाधिपति रावणानें सीतामाईचें येथेंच अपहरण केलें असेंहि सांगण्यांत येतें. फार काय पार्वतीनें सीतेचें रूप धारण करून रामाला फसविण्याचा प्रयत्न येथेंच केल्याचें बोललें जातें. सुविख्यात अगस्ति ऋषीचा आश्रम

हा याच जिल्ह्यांतील अकोला तालुक्यांत होता तर दैत्यगुरु शुक्राचार्य यांनीं कोपरगांव येथील बेटांत संजीवनीविद्या प्राप्त करून घेतली होती आणि तेथूनच कचानें तिचें अपहरण केलें होतें,अशीहि माहिती पुराणांतरीं मिळते. पाथर्डी तालुक्यांत पांडवकालीन अवशेष आज देखील आढळतात आणि पैठण, पुणतांबा यासारखीं स्थळें हीं अलीकडच्या काळांतच प्रसिद्धि पावलीं असें नव्हें तर शककर्ता शालिवाहनाच्या काळापासून तीं नांवलौकिकाला आलीं आहेत.

थोर महाराष्ट्रीय संत ज्ञानेश्वर, एकनाथ व चांगदेव यांच्या वास्तव्यानें या जिल्ह्याची भूमि पुनीत झाली आहे. शूर राणी चांदबिबी,स्वराज्यसंस्थापक छत्रपति शिवाजी महाराजांचे वडील शहाजीराजे, जमिनधाऱ्याची नवीन पद्धत अंमलांत आणणारा सरदार मलिकंबर, पेशवाईंतील साडेतीन शहाण्यांपैकीं एक संगमनेरचा विठ्ठल सुंदर परशरामी, पेशवाईच्या पडत्या काळांत तिला सांवरण्याचा आटोकाट प्रयत्न करणारा निमगांव जाळीचा त्रिंबकजी डेंगळे आणि इतर कित्यक थोर स्त्री-पुरुषांना नगर जिल्ह्यानें जन्म दिलेला आहे.

पैठणच्या आंध्रभृत्य राजानें आणि त्यांच्यामागून आलेल्या चालुक्य व राष्ट्रकूट नरेशांनीं इ०स० पूर्वीपासून नगर भागावर राज्य केलें. नंतर ११९० ते १३१० पर्यंत देवगिरीच्या यादवांचें येथें आधिपत्य होतें. त्यानंतर १४९० पर्यंत हा बहामनी राज्याचा भाग होता. १४९० ते १६३६ सालापर्यंतच्या प्रदीर्घ काळांत येथें निजामशाहीची राजवट होती. ती मोगल बादशहा शहाजहाननें संपुष्टांत आणून हा टापू आपल्या आधिपत्याखालीं घेतला. पुढें १७०९ सालीं पेशव्यांनीं मोंगलांच्याकडून हा भाग मिळविला आणि नंतर १८१७ सालीं ब्रिटिशांनीं तो आपल्या वर्चस्वाखालीं आणला. हा सुभा पेशव्यांच्या अधिपत्याखालीं होता. ब्रिटिशांनीं या भागावर १३० वर्षे राज्यकारभार केला आणि १९४७ सालीं भारत स्वतंत्र होऊन त्यांची राजवट संपुष्टांत आली.

अहमदनगर जिल्ह्यानें आणि अहमदनगर येथील इतिहासप्रसिद्ध किल्ल्यानें १९४२च्या "चले जाव"च्या चळवळींत कितीतरी महत्त्वपूर्ण अशा घडामोडी पाहिल्या आहेत. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनीं "चलेजाव"ची घोषणा केल्यानंतर जी सार्वत्रिक धरपकड झाली त्यांत या जिल्ह्यांतील कितीतरी कार्यकर्ते होते. इतकेंच नव्हे तर त्यावेळीं पकडल्या गेलेल्या पं. जवाहरलाल नेहरु, सरदार वल्लभभाई पटेल, मौलाना आझाद, आचार्य कृपलानी, श्री. शंकरराव देव इ० थोर नेत्यांना बराच काळपर्यन्त स्थानबद्ध करून ठेवण्यांत आलें होतें तेंहि नगरच्याच किल्ल्यामध्यें.

असा हा सुप्रसिद्ध अहमदनगर जिल्हा नव्या महाराष्ट्र राज्याच्या मध्यावर असून १८–२ व १९–९ अक्षांशावर उत्तरेस आणि ७३-९ व ७५-५ रेखांशावर पूर्वेस वसलेला आहे. त्याचें क्षेत्रफळ ६५६५ चौरस मैल असून त्याच्या दक्षिणेस सोलापूर जिल्हा, नैर्ऋत्येस पुणे जिल्हा, पश्चिमेस ठाणे जिल्हा, उत्तरेस नाशिक जिल्हा, ईशान्येस औरंगाबाद जिल्हा, पूर्वेस बीड जिल्हा आणि आग्नेयेस उस्मानाबाद जिल्हा आहे.

राज्यकारभाराच्या सोयीसाठीं जिल्ह्याचे बारा तालुके व एक महाल असे तेरा भाग पाडण्यांत आले असून त्यांचीं नांवें:– अहमदनगर, पारनेर, श्रीगोंदा, कर्जत, शेवगांव, पाथर्डी, नेवासा, राहुरी, संगमनेर अकोला, कोपरगांव, श्रीरामपूर व जामखेड अशीं आहेत. महसूलखात्यानें या जिल्ह्याचे अहमदनगर, पारनेर राहुरी व संगमनेर असे चार विभाग पाडले आहेत.

जिल्ह्याच्या पश्चिम भागांत सह्याद्रि आहे. या पर्वताच्या कांहीं रांगा पश्चिमेकडून पूर्वेकडे पसरलेल्या आहेत. उत्तरेकडची रांग संगमनेर तालुका, राहुरी तालुक्याचा दक्षिणभाग, नगर तालुक्याचा उत्तरभाग व

पाथर्डी तालुक्याच्या दक्षिणभागांतून जाते. तर दक्षिणेकडील रांग पारनेर तालुका, नगर तालुक्याचा दक्षिण-भाग व श्रीगोंदा तालुक्याच्या उत्तर भागांतून जाते. या डोंगराळ प्रदेशांत काळा कठीण दगड आढळत असल्यानें तो भाग उजाड आहे.

जमिनीच्या उंचसखलपणामुळें जिल्ह्याचे दोन स्थूल भाग पाडतां येतील. पहिला देश किंवा पठार आणि दुसरा डांगी किंवा डोंगराळ भाग. डांगी भाग सह्याद्रीच्या रांगा असलेल्या अकोला तालुक्याच्या पश्चिम-भागापुरताच मर्यादित आहे. ५४२७ फूट उंच असलेलें सह्याद्रीचें अत्युच्च शिखर कळसूबाई हें याच भागांत आहे हा डोंगराळ प्रदेश अरण्यांनीं व्यापलेला असून तेथें महादेव,कोळी व ठाकर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आदिवासी लोकांची वस्ती आहे. हा जिल्ह्यांतला मागासलेला भाग असून तेथील राजूर येथें १९५० सालीं सर्वोदय केंद्र सुरू करण्यांत आलें असून आदिवासी लोकांचा सर्वांगीण विकास घडवून आणण्याचें थोर कार्य तें उत्कृष्ट रीतीनें करीत आहे.

अहमदनगर जिल्ह्यामध्यें नद्यांचें सुंदर जाळें पसरलेलें आहे. गोदावरी, प्रवरा, मुळा, भीमा आणि सीना या पांच प्रमुख नद्या व महाळुंगी, कुकडी, घोड, कापरी आणि आढळा या उपनद्या जिल्ह्याच्या वेग-वेगळ्या भागांतून वहातात. दक्षिणगंगा म्हणून संबोधिली जाणारी गोदावरी कोपरगांव तालुक्यांतून वहात श्रीरामपूर, नेवासा व शेवगांव तालुक्यांच्या सरहद्दीवरून जाते. तिच्या काठांवर पुणतांबा, पैठण व प्रवरा-संगम हीं तीर्थक्षेत्रें आहेत. या नदीला मध्यमेश्वर येथें धरण बांधलें असून त्याच्या कालव्याचें पाणी कोपरगांव तालुक्यांतील जमिनीस मिळतें. अकोला तालुक्यांत उगम पावलेली प्रवरा संगमनेर तालुक्यांतून वहात, श्रीरामपूर व राहुरी तालुक्यांच्या कडेकडेनें नेवासा तालुक्यांत जाते आणि पुढें प्रवरासंगम येथें गोदावरीला मिळते. या नदीवर भंडारदरा गांवाजवळ २८५ फूट उंचीचें धरण बांधून, तिच्या पाण्याचा प्रचंड सांठा करून आणि तो नदीच्या पात्रांतूनच सोडून संगमनेर तालुक्यांतील ओझर या गांवाजवळ त्याचे पाट काढले आहेत. त्यामुळें संगमनेर, राहुरी व श्रीरामपूर तालुक्यांतील जमिनीस पाणी मिळालें आहे. गोदावरी व प्रवरा नदीच्या कालव्याच्या पाण्याचा उपयोग करून त्या भागांतील शेतकरी ऊंस, मोसंबीसारख्या बागायत पिकांची लाग-वड मोठ्या प्रमाणावर करूं लागले आहेत.

अकोला तालुक्यांत उगम पावलेली दुसरी नदी मुळा, संगमनेर व राहुरी तालुक्यांतून वहात जाऊन प्रवरेला मिळते.

अहमदनगर येथें उगम पावलेली आणि दक्षिणेकडे वहाणारी सीना नदी कर्जत व जामखेड तालुक्यांच्या बाजूनें जाऊन पुढें सोलापूर जिल्ह्यामध्यें भीमा नदीला मिळते.

पारनेर तालुक्याच्या सरहद्दीवरुन वहाणारी कुकडी नदी घोड नदीला मिळते आणि पारनेर व श्री-गोंदा तालुक्यांच्या कडेकडेनें जाणारी घोड नदी घोडेगांवाजवळ भीमेला मिळते. भीमा श्रीगोंदा व कर्जत तालुक्यांच्या सीमेवरून वहाते.

अहमदनगर जिल्ह्याला नद्यांचें मोठ्या प्रमाणावर जसें वरदान लाभले आहे तसें तलावांचें नाहीं. येथें नैसर्गिक तलाव असे नाहींतच. कांहीं कृत्रिम तलाव असून त्यांच्याकडून मुख्यत्वेंकरून पिण्यासाठीं आणि थोडचा प्रमाणांत जमिनीसाठीं पाण्याचा पुरवठा केला जातो. सह्याद्रीवर निबीड अशा अरण्यानें वेढलेला आणि प्रवरा नदीच्या कांठीं बांधलेला अकोला तालुक्यांतील भंडारदरा तलाव हा निसर्गरम्य वनश्रीनें नटलेला असल्यानें प्रेक्षणीय स्थळांत तर मोडतोच पण आजूबाजूच्या शेतीला जीवनहि देतो.

नगर शहरानजीक असलेला पिंपळगांव माळवीचा तलाव हा नगर शहराला लाभणाऱ्या पाण्याचा जसा पुरवठा करतो तसा कापुरवाडी तलावापासून उपनगर लष्करभागाला पाण्याचा पुरवठा होतो. विसापूर तलावाचा उपयोग भोंवतालच्या शेतीसाठीं चांगला होतो.

अहमदनगर जिल्ह्यांतील पावसाचें मान बरेंच अनिश्चित असून तो पडतो तोहि कमीअधिक प्रमाणांत. अकोला तालुक्याच्या पश्चिम भागांतील पावसाचें प्रमाण २००" आहे. पण जसजसें पूर्वेस जावें तसतसें तें कमी होत जातें; तें इतकें कीं, फक्त २८ मैलांवर असलेल्या अकोल्याच्या पूर्वभागांत २०" पाऊस पडतो. या भागांत पावसाचा जोर विशेषेंकरून आढळतो तो मान्सूममध्यें, म्हणजे जूनच्या सुरुवातीपासून तें सप्टेंबरच्या अखेरपर्यंत. हंगामाचा शेवट नोव्हेंबर डिसेंबरमधील कांहीं वर्षावानें होतो.

पावसावर मुख्यत: अवलंबून असल्यानें डांगी भाग, अकोला तालुक्याचा पूर्व भाग व संगमनेर तालुका येथें खरीपाचीं पिकें घेतलीं जातात तर देश किंवा पठार भागांत रब्बी पिकें काढलीं जातात. जेथें ५०" हून अधिक पाऊस पडतो तेथें भाताचें पीक निघतें तर इतरत्र ज्वारी व बाजरी हींच पिकें विशेषेंकरून काढलीं जातात. कालव्याच्या पाण्याचा लाभ झालेल्या भागांत ऊसाची आणि भाजीपाल्याची लागवड मोठ्या प्रमाणांत होत आहे. या जिल्ह्यांतील थोडा डोंगराळ आणि पठार भाग सोडला तर जमीन सर्वसाधारणपणें सकस व सुपीक असलेली दिसते. गोदावरी, प्रवरा, भीमा, कुकडी व घोड या नद्यांकांठच्या जमिनी भारी प्रतीच्या, काळचा व . कसदार आहेत. अकोल्याच्या पश्चिम भागांतील डोंगराळ प्रदेशामध्यें तांबूस जमीन असून तेथें झाडें चांगलीं उगवतात.

अहमदनगर जिल्ह्याच्या ४२,०१,८२५ एकर क्षेत्रांपैकीं ४,९५,३५६ एकर रान वनानें व्यापलेलें आहे. पण या प्रदेशापैकीं बराच भाग उजाड व ओसाड आहे. नांव घेण्याजोगीं कांहीं अरण्यें आढळतात तीं अकोला तालुक्यांत. पण येथील झाडांची मागील महायुद्धाच्या वेळीं बेसुमार तोड झाल्यामुळें वनसंपत्तीचा खूप ऱ्हास झाला आहे. पण आतां सरकारनें वनवाढीची योजना हातीं घेतली असून तेथें फिरून वृक्षारोपण होत आहे. त्यामुळें थोडच्या दिवसांतच उजाड दिसणाऱ्या या भागांत फिरून वनराजी चमकूं लागेल.

अहमदनगर जिल्हा हा दक्षिण पठारावर वसलेला असून पश्चिमेकडून वहाणाऱ्या वाऱ्यांचा लाभ त्याला मिळत नसल्यानें तेथील हवा सर्वसाधारणपणें कोरडी, उत्साहवर्धक व आल्हाददायक अशी असते.

ऋतुमानाच्या बाबतींत बोलायचें झालें तर अहमदनगर जिल्ह्यामध्यें ऑक्टोबर ते फेब्रुवारी हिंवाळा, मार्च ते मे उन्हाळा आणि जून ते सप्टेंबर पावसाळा असतो. एप्रिल व मे महिन्यांमध्यें उष्णता जेव्हां वरचें टोंक गांठते तेव्हां ती ११० डिग्रीवर गेलेली असते.नोव्हेंबर डिसेंबर महिन्यांमध्यें उष्णतामान कमी असतें त्यावेळीं हवामान ४५ ते ५० डिग्रीवर येतें.

लोकसंख्या

नव्या महाराष्ट्र राज्यांतील २६ जिल्ह्यांत विदर्भातील चांदा हा सर्वांत मोठा जिल्हा असून अहमदनगरचा दुसरा नंबर लागतो. त्याचें क्षेत्रफळ ६४७२ चौरस मैल असून साऱ्या महाराष्ट्र राज्याच्या क्षेत्रफळापैकीं ५·६ टक्के आहे तर पुणें विभागाचें २३·४ टक्के आहे.

या जिल्ह्याचें चार विभाग पाडण्यांत आले असून १३ तालुके व १ महाल आहे. १९५१ च्या खानेसुमारीप्रमाणें जिल्ह्याची लोकसंख्या १४,१०,८७३ असून ती १३३२ गांवांमध्यें खालीलप्रमाणें विभागली गेली आहे.

विभाग	विभागांतील तालुके व महाल.	शहरें व गांवें	लोकवस्ती.
अहमदनगर	अहमदनगर	११०	२०६१५३
पारनेर	पारनेर	११४	१०६०७८
	श्रीगोंदा	८४	९५००७
	कर्जत	८१	७४६५३
	जामखेड	५५	५९३९७
राहुरी	राहुरी	८५	८८३६०
	नेवासा	१२०	९२०३६
	शेवगांव	१२५	८८०९६
	पाथर्डी	९२	९७५७५
संगमनेर	संगमनेर	१३५	१२९३३१
	कोपरगांव	१०१	१४२८५८
	श्रीरामपूर	७७	१३५२५४
	अकोला	१५३	९६०७४
	एकूण	१३३२	१४१०८७३

जिल्ह्यांतील १३३२ गांवांपैकीं १३१९ खेडीं असून फक्त १३ शहरें आहेत. १३१९ खेड्यांपैकीं ४७८ खरीप पिकाचीं तर ८५४ रबी पिकाचीं आहेत. १३ शहरांपैकीं नगरपालिका असलेलीं ५ शहरें तर नगरपालिका नसलेलीं ८. अहमदनगर हेंच जिल्ह्यांतील सर्वांत मोठें शहर आहे.

नगरपालिका असलेल्या ५ शहरांची लोकसंख्या खालीलप्रमाणें आहे:—

अहमदनगर	८०८५३
अहमदनगर कॅन्टोनमेंट	२४४०२
संगमनेर	१६७५६
श्रीरामपूर	१६३११
कोपरगांव	११६१६

नगरपालिका नसलेल्या ८ शहरांची लोकसंख्या खालीलप्रमाणें आहे:—

पाथर्डी	९९५२
राहुरी (बु.)	९८३३
श्रीगोंदा	८९०९
कर्जत	७६५१
शेवगांव	७२६९
जामखेड	७०२५
खर्डा	६८९४
वांबोरी	५३४१

यावरून पारनेर, नेवासा व अकोला या तीन तालुक्यांत एकहि शहर नसल्याचें दिसून येईल. ज्या भागांत शेतीला भरपूर पाणीपुरवठा होतो तेथें लोकवस्ती दाट असलेली आढळते तर इतरत्र तुरळक. अकोला तालुका हा तर डोंगराळ प्रदेश असून तेथें मोठी वस्ती असण्याचें दूरच राहो पण सुशिक्षित आणि सुसंस्कृत समाज देखील फारसा आढळत नाहीं. आदिवासी लोकांची वस्तीच तेथें मोठ्या प्रमाणांत आढळते.

जिल्ह्यांतील १३ शहरांची लोकसंख्या २१५००० म्हणजे साऱ्या जिल्ह्याच्या लोकसंख्येच्या १५·२ टक्के आहे. म्हणजे राहिलेली ८५ टक्के लोकसंख्या १३१९ खेड्यांची आहे. दर खेड्यामागें लोकांची सरासरी ९०७ पडते.

अहमदनगर जिल्ह्यांत शहरें जशीं कमी आहेत तशीं दोन हजारांहून अधिक वस्ती असलेलीं गांवेंहि कमी आहेत. दोन हजारांहून १००० वस्तीचीं गांवें जास्त आहेत. तर ५०० हून कमी वस्ती असलेलीं गांवें त्याहून अधिक आहेत. तें कसे तें पहा.

	५००लोकवस्ती खालील गांवें	५००ते१००० लोकवस्ती असलेलीं गांवें	१०००ते २००० लोकवस्ती असलेलीं गांवें	२००० ते ५००० लोकवस्ती असलेलीं गांवें	५०००ते १०००० लोकवस्ती असलेलीं गांवें	१००००ते २०००० लो. व. असलेलीं गांवें	२००००ते ५०००० लो. व. असलेलीं गांवें
गांवाची संख्या	५०३	४२९	२७९	९५	१९	५	१
लोक-संख्या	१५७०००	३०५०००	३७६०००	२६२०००	१३४०००	७२०००	२४०००

	५०००० ते १००००० लोकवस्ती असलेलीं गांवें
गांवांची संख्या	१
लोकसंख्या	८१०००

जिल्ह्यांतील २३ टक्के गांवें ५०० ते १००० लोकवस्तीचीं असून ५०० हून कमी वस्तीचीं गांवें ३८ टक्के आहेत. महाराष्ट्र राज्याचें ५०० हून कमी असलेल्या गांवांचें प्रमाण ५५·८ टक्के आहे. तर साऱ्या भारताचें ६७·७ टक्के. ही गोष्ट लक्षांत घेतां अहमदनगर जिल्ह्याचें प्रमाण बरेंच कमी असलेलें आढळेल.

अहमदनगर जिल्ह्यामध्यें शेतीवर उपजीविका करणाऱ्यांची संख्या बरीच मोठी आढळते. खेड्यां-तील ७३ टक्के लोक शेतीवर आपलें पोट भरतात तर शहरांतील २० टक्के लोक. म्हणजे खेड्यांतील २७ टक्के लोक बिगरशेतीवर आपला उदरनिर्वाह भागवितात तर शहरांतील ८० टक्के लोक.

पुणें विभागांत शेतीवर उपजीविका करणारे ६८ टक्के लोक आहेत. तर बिगर शेतीवर आपला उदर-निर्वाह करणारे ३२ टक्के. महाराष्ट्र राज्यांत शेतीवर पोट भरणाऱ्यांचें प्रमाण ६१·९ टक्के आहे तर बिगर शेतीवर पोट भरणाऱ्यांचें ३८·१ टक्के. साऱ्या भारताचे याबाबतींतले आंकडे पाहिले तर शेतीवर उप-जीविका करणाऱ्या लोकांची संख्या जवळजवळ अहमदनगर जिल्ह्याइतकी म्हणजे ७० टक्के इतकी तर बिगर शेतीवर आपल्या पोटापाण्याचा प्रश्न सोडविणाऱ्यांची संख्या ३० टक्के असल्याचें आढळेल.

आज शेतीवर उपजीविका करणाऱ्यांची खालीलप्रमाणें वर्गवारी करून पुणे विभागाशींहि या बाबतींत तुलना करतां येईल.

वर्ग	अहमदनगर जिल्हा	पुणेंविभाग.
स्वतःच्या मालकीच्या जमिनीवर राबणारे	७७.४ टक्के	७७.७ टक्के
दुसऱ्याच्या मालकीच्या जमिनीवर राबणारे	३.१ टक्के	६.९ टक्के
जमिनींत राबणारे मजूर	१६.२ ,,	११.८ टक्के
खंडानें जमिनी लावणारे व न कसणारे मालक	३.३ टक्के	३.६ टक्के
एकूण	१००	१००

वरीलप्रमाणेंच बिगरशेतीवर उपजीविका करणाऱ्यांची वर्गवारी खालील प्रमाणें करून त्या बाबतींत, पुणे विभागाशीं तुलना करतां येईल.

वर्ग	अहमदनगर जिल्हा	पुणें विभाग.
बिगरशेतीचें उत्पादन	३५.२ टक्के	३५.४ टक्के
व्यापार	१६.५ "	१६.८ '
वाहतूक	३.१ "	४.५ "
इतर	४५.२ "	४३.३ "
एकूण	१००	१००

आतां शेतीवर उपजीविका करणाऱ्यांची व बिगरशेतीवर उपजीविका करणाऱ्यांची तालुकावार वर्गवारी खालीलप्रमाणें करतां येईल.

तालुका	शेतीवर उपजीविका करणारे	बिगरशेतीवर उपजीविका करणारे
अहमदनगर	४२.४ टक्के	५७.६ टक्के
पारनेर	८४.९ "	१५.१ "
श्रीगोंदा	७७.९ "	२२.१ "
जामखेड	७७.९ "	२२.१ "
कर्जत	८६.७ "	१३.३ ',

तालुका	शेतीवर....	बिगरशतीवर....
राहुरी	७८.४ "	२१.६ टक्के
नेवासा	८३.७ "	१६.३ "
पाथर्डी	८२.६ "	१७.४ "
शेवगांव	८२.९ "	१७.१ "
अकोला	८९.६ "	१०.४ "
श्रीरामपूर	६०.७ "	३९.३ "
कोपरगांव	७०.४ "	२९.६ "
संगमनेर	७७.७ "	२२.३ "

स्त्री पुरुषाचें प्रमाणें

अहमदनगर जिल्ह्यामध्यें स्त्री-पुरुषांचें प्रमाण जवळजवळ सारखें आहे. येथें १००० पुरुषांच्या मागें ९५१ स्त्रिया पडतात तर पुणें विभागामध्यें ९६९ आणि महाराष्ट्र राज्यामध्यें ९१४. म्हणजे अहमदनगर जिल्ह्याचें व पुणें विभागाचें प्रमाण जवळजवळ सारखें आहे.

अहमदनगर जिल्ह्यांतील वेगवेगळ्या तालुक्यांतील स्त्री-पुरुषांचें प्रमाण खालीलप्रमाणें आहे.

तालुका	हजार पुरुषांमागें स्त्रिया
पारनेर	१०१७
अकोला	१००७
शेवगांव	९९७
नेवासा	९८६
पाथर्डी	९८१
राहुरी	९७८
जामखेड	९७५
संगमनेर	९७२
कोपरगांव	९५७
कर्जत	९५७
श्रीगोंदा	९५६
श्रीरामपूर	९४८
अहमदनगर	९३३

यावरून दिसून येईल कीं, पारनेर व अकोला तालुक्यांमध्यें पुरुषांहून स्त्रियांची संख्या अधिक आहे. तर अहमदनगर व श्रीरामपूर तालुक्यांत ती कमी आहे. इतर तालुक्यांत स्त्री–पुरुषांची संख्या जवळजवळ सारखी आहे. कांहीं टक्क्यांनींच स्त्रियांची संख्या कमी आहे.

साऱ्या अहमदनगर जिल्ह्यांतील स्त्री-पुरुषांचें प्रमाण पाहिलें तर हजार पुरुषांच्यामागें ९८० स्त्रिया असलेल्या दिसतील. मात्र शहरांत हजार पुरुषांमागें ९२१ स्त्रिया आढळतात. यावरून स्त्रियांची संख्या खेड्यांहून शहरांत थोडीशी कमी असल्याचें दिसून येईल.

लिहितां वाचतां येणाऱ्या स्त्री-पुरुषांच्या आंकड्यांकडे पाहिलें तर त्यांच्यांत बरेंच अंतर असल्याचें दिसून येतें. लिहितां वाचतां येणाऱ्या स्त्रियांच्या बाबतींत पुणें जिल्ह्याच्या खालोखाल अहमदनगर जिल्ह्याचा नंबर लागत असला तरी त्यांच्यांत बराच फरक आढळतो. पुणें विभागांत १५.७ टक्के स्त्रियांना लिहितां वाचतां येतें तर अहमदनगर जिल्ह्यांत फक्त ७.९ टक्के स्त्रिया लिहूं-वाचूं शकतात. स्त्रियांच्या मानानें लिहितां-वाचतां येणाऱ्या पुरुषांची संख्या बरीच मोठी आहे. त्यासाठीं खालील तालुकावार दिलेले आंकडे उपयोगी पडतील.

तालुका	पुरुष	स्त्रिया	एकूण
अहमदनगर	४०.५ टक्के	१८.८ टक्के	३२.४ टक्के
श्रीरामपूर	२९.८ "	९.१ "	१९.४ "
कोपरगांव	२९. "	८.२ "	१८.९ "
नेवासा	२९.१ "	६.९ "	१७.६ "
राहुरी	२७.४ "	६.७ "	१७. "
श्रीगोंदा	२३.३ "	६.२ "	१४.९ "
पाथर्डी	२३.३ "	६.१ "	१४.७ "
पारनेर	२३. "	४.६ "	१३.८ "
जामखेड	२१.३ "	५.६ "	१३.६ "
शेवगांव	२२.२ "	५.६ "	१३.६ "
अकोला	२०.७ "	६.५ "	१३.५ "
संगमनेर	२०.७ "	६. "	१३.४ "
कर्जत	२०.	५.७ "	१३.१ "

साक्षरतेच्या बाबतींत अहमदनगर तालुक्याचा पहिला नंबर लागतो तर कर्जत तालुक्याचा शेवटचा. श्रीरामपूर व कोपरगांव यांचे क्रमांक दुसरे व तिसरे असले तरी अहमदनगरच्या मानानें त्यांच्यांतील साक्षर लोकांची संख्या फारच कमी दिसते.

साऱ्या अहमदनगर जिल्ह्याचें साक्षरतेचें प्रमाण १८.८ टक्के आहे. पुणें विभागांत अहमदनगरचा नंबर तिसरा लागतो. पुणें जिल्ह्याचा पहिला नंबर असून तेथील साक्षरतेचें प्रमाण २८.१ टक्के आहे. तर दुसऱ्या नंबरच्या उत्तर सातारा जिल्ह्याचें प्रमाण २०.६ टक्के आहे.

साक्षरतेच्या बाबतींत अहमदनगर जिल्ह्याचे, पुणे विभाग, महाराष्ट्र राज्य व भारत सरकारच्या आंकड्यांशीं तुलना करणें योग्य होईल.

अहमदनगर जिल्हा	१८.८	टक्के
पुणे विभाग	१९.४	"
महाराष्ट्र राज्य	२१.	टक्के
भारत सरकार	१६.६	"

यावरून अहमदनगर जिल्ह्यांतील साक्षरतेचें प्रमाण पुणें विभागाहून थोडेसें कमी असलें तरी तें भारतांतील साक्षरतेच्या प्रमाणापेक्षां जास्त असल्याचें आपल्याला दिसून येईल.

तसेंच साक्षर लोकांची संख्या खेड्याहून शहरांत अधिक आढळते. अहमदनगर जिल्ह्यांतील साक्षर स्त्री-पुरुषांचे खालील आंकडेच पहा.

	साक्षर पुरुष	साक्षर स्त्रिया	एकूण साक्षर
खेड्यांत	२४.६ टक्के	५ टक्के	१४.९ टक्के
शहरांत	५५ "	२४.५ "	४०.४ "

खेड्यांतील स्त्रियांचें साक्षरतेचें प्रमाण शहराहू न बरेंच कमी असल्याचें दिसून येईल आणि अहमदनगर जिल्ह्यांतील बहुसंख्य जनता म्हणजे ८५ टक्के लोक खेड्यांत रहातात तर १५ टक्के लोक शहरांत. एकूण १४,१०,८७३ लोकांपैकीं ११, ९६,००० लोक खेड्यांत रहातात. याबाबतींत साऱ्या महाराष्ट्र राज्यांत १५,५४,००० ग्रामीण लोकवस्ती असलेल्या रत्नागिरी जिल्ह्याचा पहिला नंबर लागतो तर अहमदनगर जिल्ह्याचा दुसरा.

इतर जिल्ह्यांप्रमाणेंच अहमदनगर जिल्ह्याची लोकसंख्याही भरमसाट वाढत आहे. १९२१ते १९५१ या ३० वर्षांच्या काळांत ती १०० टक्क्यांनीं वाढलेली दिसून येईल.

	१९२१	१९३१	१९४१	१९५१
लोकसंख्या	७१९०००	९७००००	११२३०००	१४११०००
वाढीचें प्रमाण	——	३४.८ टक्के	१५.९ टक्के	२५.६ टक्के

पुणें विभागांतील लोकसंख्येची वाढ दरवर्षी १.९ टक्क्यांनीं होत आहे. हें प्रमाण धरून हिशोब केला तर १९६० सालीं अहमदनगर जिल्ह्याची लोकसंख्या १६,६५,००० होईल.

लोकसंख्येच्या वाढीबरोबरच लोकवस्तीच्या प्रमाणामध्येंहि वाढ होणें सहाजिकच आहे. १९५१च्या खानेसुमारीप्रमाणें अहमदनगर जिल्ह्याचें लोकवस्तीचें प्रमाण दर चौरस मैलाला २१३ होतें. १९२१ सालीं तें २०९ होतें. यावरून १९६० सालीं तें २५२ वर जाईल असें दिसतें. तरीहि तें महाराष्ट्र राज्याहून कमी आणि पुणें विभागाहून फारच कमी असेल. कारण १९५१ सालीं पुणें विभागाचें लोकवस्तीचें प्रमाण दर चौरस मैलाला २९१ होतें तर महाराष्ट्र राज्याचें २७०.

अहमदनगर जिल्ह्यांतील तालुक्यांचें लोकवस्तीचें प्रमाण पाहिलें तर ज्या भागांत जमिनींना पाणी-पुरवठा भरपूर होतो आणि ज्या ठिकाणीं शहरें वसविलीं आहेत आणि मोठाले कारखाने निघाले आहेत त्या भागांत तें अधिक असल्याचें दिसून येईल.

तालुका	दर चौरस मैलामागें लोकसंख्येचें प्रमाण
श्रीरामपूर	४२४
कोपरगांव	३५४
अहमदनगर	३५२
पाथर्डी	२२९
राहुरी	२२१
संगमनेर	२०७
शेवगांव	२०२
नेवासा	१९२
जामखेड	१७६
अकोला	१६७
पारनेर	१५४
श्रीगोंदा	१५४
कर्जत	१३३

श्रीरामपूर, कोपरगांव व अहमदनगर यांचे नंबर पहिले, दुसरे व तिसरे असून इतर तालुक्यांचे आंकड बरेचसे कमी असल्याचें, इतकेंच नव्हें तर शेवटच्या पारनेर, श्रीगोंदा, कर्जत तालुक्यांचे आंकडे जवळ जवळ १/३ असल्याचें दिसून येईल.

भाषा

अहमदनगर जिल्ह्याची प्रमुख भाषा मराठी आहे. ९० टक्क्यांहून अधिक लोक मराठी बोलतात. जवळ-जवळ ५ टक्के लोक उर्दू बोलतात तर तेलगू, राजस्थानी, हिंदी, गुजराती व इतर भाषा बोलणाऱ्यांची संख्या ५ टक्क्यांहून थोडीशी कमीच भरेल.

भाषावार वर्गवारी खालीलप्रमाणें करतां येईल.

भाषा	बोलणाऱ्यांची संख्या	शेंकडा प्रमाण.
मराठी	१२७०७४२	९०.१
उर्दू	७०७८५	५.१
तेलगू	२०४३९	१.५
राजस्थानी	१४४३१	१.
हिंदी	१२०३०	.८
गुजराती	१०६३३	.७
इतर	११८१३	.८

मराठी बोलणारे सर्व जिल्हाभर पसरलेले आहेत तर उर्दू बोलणारे कमी-अधिक प्रमाणांत कां होईना सर्व जिल्हाभर विखुरलेले आहेत. पण तेलगू बोलणारे विशेषेंकरून अहमदनगर, नेवासा व राहुरी तालुक्यांत

आढळतात तर राजस्थानी, हिंदी व गुजराती भाषिक मुख्यत्वेंकरून अहमदनगर, श्रीगोंदा, कर्जत, जामखेड, शेवगांव व पाथर्डी तालुक्यांत दिसतात. इतर भाषा बोलणारे बहुतेक सारे अहमदनगर व इतर शहरीं आणि साखर कारखान्यांसारखे मोठाले कारखाने आहेत त्या ठिकाणीं आढळतात.

धर्म

अहमदनगर जिल्ह्यांतील बहुसंख्य जनता हिंदु असून अल्प प्रमाणांत मुसलमान, ख्रिस्ती, जैन, पारशी वगैरे जमातीची मंडळी आढळतात.

धर्म	जनसंख्या	शेंकडा प्रमाण.
हिंदु	१२७०७६३	९०.१
मुसलमान	७७१९०	५.५
ख्रिस्ती	४२३५२	३
जैन	१७०७७	१.२
इतर	३४९१	.२

मागासलेला वर्ग

अहमदनगर जिल्ह्यांतील मागासलेल्या वर्गाकडे पाहिल्यास त्यांची वस्ती शहरांपेक्षां खेड्यांतच अधिक आढळते. शेवगांव, पाथर्डी व राहुरी तालुक्यांतील शहरें सोडलीं तर त्यांची वस्ती सर्व शहरांत जवळजवळ सारख्या प्रमाणांत विखुरलेली दिसून येईल.

तालुके	मागासलेल्या वर्गाची लोकसंख्या.	एकूण लोकसंख्येशीं शेंकडा प्रमाण.
अहमदनगर, श्रीगोंदा, कर्जत,जामखेड या तालुक्यांतील शहरें	१२८८८	९.५
संगमनेर, कोपरगांव व श्रीरामपूर तालुक्यांतील शहरें	३८४५	८.६
शेवगांव, पाथर्डी व राहुरी तालुक्यांतील शहरें.	२२०३	६.४
एकूण	१८९३६	८.८

आज मागासलेल्या वर्गाच्या खेड्यांतील वस्तीकडे पाहिल्यास सर्व तालुक्यांत ती एकसारखी पसरलेली आढळत नाहीं. शेवगांव व पाथर्डी तालुक्यांत ती फक्त १० टक्के आहे तर अकोला व संगमनेर तालुक्यांत ३१ टक्के.

तालुके	मागासलेल्या वर्गाची लोकसंख्या	तेथील एकूण लोकसंख्येशीं शेंकडा प्रमाण
अकोला व संगमनेर तालुक्यांतील खेडीं.	६४०९९	३०.७
कोपरगांव व श्रीरामपूर तालुक्यांतील खेडीं	५६८९०	२२.७
श्रीगोंदा, कर्जत व जामखेड तालुक्यांतील खेडीं	३२९०७	१६.५
नेवासा व राहुरी तालुक्यांतील खेडीं.	२२१२३	१३.९
अहमदनगर व पारनेर तालुक्यांतील खेडीं	२३८६२	११.४
शेवगांव व पाथर्डी तालुक्यांतील खेडीं	१७१०८	१०.१

घरें

अहमदनगर जिल्हयांत एकूण २३९, ३७३ घरें असून त्यापैकी २११०२१ ग्रामीण भागांत आहेत आणि २८३५२ शहरी भागांत. घरांत रहाणाऱ्या माणसांचें घरांमागे सरासरी प्रमाण ५–९ आहे. ग्रामीण भागांतील लोकांचें ५–७ तर शहरी भागांतील लोकांचें ७–७ आहे.

शेती

अहमदनगर जिल्हा हा कृषिप्रधान जिल्हा असून येथील बहुसंख्य लोक शेतीवर आपली उपजीविका करतात. जिल्ह्याच्या एकूण ४२,०४९०० एकर क्षेत्रापैकीं ३०,८६,३०० एकर क्षेत्र म्हणजे ७३.४ टक्के जमिन लागवडीखालीं असून या बाबतींत अहमदनगर जिल्ह्याचा पहिला नंबर लागतो. क्षेत्राचें वांटप खालील-प्रमाणें झालें आहे.

जमिनीचा प्रकार	क्षेत्र	शेंकड प्रमाण
वनें...	४,८९००० ...	११.५
पडीक व लागवडीखालीं न आणतां येणारी जमीन	३,७५६०० ...	८.९
बिगरशेती कामासाठीं वापरलेली ...	५४०० ...	अत्यल्प
लागवडीस योग्य परंतु निरुपयोगी ...	२९२०० ...	.७
कायमची कुरणें व चराऊ रानें ...	५९३०० ...	१.४
या वर्षाची पड जमीन	६४३०० ...	१.५
इतर पड जमीन	९६७०० ...	२.३
लागवडीखालील जमीन	३०८६३०० ...	७३.४
एकूण.	४२,०४९०० ...	१००

लागवडीच्या दृष्टीनें अहमदनगर जिल्ह्याचे तीन भाग पाडतां येतील.

(१) अकोला तालुका

या तालुक्याचा बराचसा भाग वनानें व्यापलेला असून तेथें विशेषेंकरून भात व बाजरी पिकते.

(२) कोपरगांव, श्रीरामपूर व राहुरी तालुका

या तालुक्यांची जमिन सुपिक असून तिला कालव्याचें पाणी भरपूर मिळत असल्यानें या भागांत ऊंस व फळफळावळाची मोठ्या प्रमाणांत लागवड होते.

(३) नगर, पारनेर, श्रीगोंदा, कर्जत व जामखेड तालुके

हा भाग दुष्काळी भाग म्हणून ओळखला जातो. वरुणराजाची अवकृपा झाली की जमिनी पिकायच्या नाहींत असें हरघडी घडतें. पण योजनाकाळांत झालेल्या तालीबांधाच्या आणि विहीरींच्या कामांमुळें हा भागहि आतां लागवडीखालीं येत चालला आहे.

पहिल्या व दुसऱ्या पंचवार्षिक योजनाकाळांत झालेल्या जमीनसुधारणेच्या कामामुळें अहमदनगर जिल्ह्याचा कायापालट होत आहे. कर्जत तालुक्याचा दक्षिण भाग, श्रीगोंदा तालुका, त्याच्या लगतच्या पारनेर तालुक्याचा बराचसा भाग आणि अहमदनगर तालुक्याचा कांहीं भाग हे तर दुष्काळाच्या तडाख्यानें चांगलेच होरपळून निघालेले आहेत. फार काय अकोला तालुका सोडला तर अहमदनगर जिल्ह्याला केव्हांना केव्हां दुष्काळाची झळ ही लागलेलीच आहे. अकोला तालुका मात्र त्या बाबतींत भाग्यवान आहे. तो दुष्काळापासून अलिप्त रहाण्याचें मुख्य कारण म्हणजे त्याच्या पश्चिम बाजूला डोंगरांच्या रांगा उभ्या असल्यानें त्यांच्यावर हमखास पाऊस पडतो हें होय.

१९३० सालानंतरचा या जिल्ह्यांतील पावसाचा आढावा घेतला तर येथील पावसाचें सरासरी प्रमाण २५.७६ इंच असल्याचें आढळून येईल. १९३१ ते १९५४ पर्यन्तचे एकसारखे कमी जास्त होत गेलेले पावसाचे आंकडे पाहिले तर खालील तालुकावार माहिती खात्रीनें उपयुक्त ठरेल.

तालुका	जास्तींत जास्त पाऊस पडलेलें साल	पडलेला पाऊस	कमीत कमी पाऊस पडलेलें साल	पडलेला पाऊस	पावसाचें सरासरी प्रमाण
शेवगांव	१९३४	४५.८० इंच	१९३६	१२.९० इंच	२८.४२ इंच
नेवासा	१९५६	३५.०३ "	१९४१	१४.१२ "	२६.९८ "
पाथर्डी	१९३८	४५.६० "	१९३६	१२.६३ "	२६.८४ "
जामखेड	१९३८	३७.७९ "	१९५२	१३.४८ "	२६.६६ "
अहमदनगर	१९३८	४३.९४ "	१९३६	१२.४३ "	२६.४३ "
कर्जत	१९३८	४३.८० "	१९४५	१२.८३ "	२४.८२ "
श्रीगोंदा	१९३३	४१.२७ "	१९४५	९.७७ "	२२.४७ "
पारनेर	१९५६	३३.६९ "	१९३९	१३.२८ "	२२.२४ "
संगमनेर	१९३३	३५.५८ "	१९५२	११.८८ "	२२.२१ "
राहुरी	१९४३	३७.९६ "	१९५२	८.५० "	२२.१९ "
कोपरगांव	१९५६	३९.३५ "	१९५२	६.१९ "	२२.०२ "

यावरून दिसून येईल कीं, जिल्ह्यांत सर्वांत अधिक पावसाचें प्रमाण असलेल्या शेवगांव तालुक्यांत एका वर्षी ४५.८० इंच पाऊस पडलेला आहे तर दोन वर्षानंतर १२.९०." पावसाचें हें व्यस्त प्रमाण कमी-

अधिक प्रमाणांत या जिल्ह्यांतील इतर तालुक्यांतहि आढळतें. तेव्हां पावसावर भरवंसा ठेवून भागण्याजोगें नसल्याचें जाणून शेतीच्या विकासाचे कार्यक्रम आंखण्यांत आले. १२ ते १४ इंच खोल नांगरणी करून जमिनींत रुतललें तण काढण्यासाठीं व लागवडीयोग्य पडीक जमिनी उपजावू करण्यासाठीं या जिल्ह्यांत यांत्रिक शेतीची योजना लागू करण्यांत आली. शेतीसाठीं पाणीपुरवठ्याच्या सोयींत वाढ व्हावी या हेतूनें नवीन विहीरी खोदण्यासाठी व जुन्या विहीरींची सुधारणा करण्यासाठीं शेतकऱ्यांना तगाई व मदत देण्याची योजना सुरू करण्यांत आली. नाले, ओढे वगैरेंवर योग्य जागीं तात्पुरते बंधारे बांधून त्यामुळें अडवल्या जाणाऱ्या पाण्याचा वापर भाताचें दुसरें पीक काढण्यासाठीं किंवा कडधान्यांची लागवड करण्यासाठीं करावा ह्या हेतूनें ठिकठिकाणीं नाले-ओढ्यांवर कच्चे व पक्के बंधारे बांधण्यांत आले. जिल्ह्याच्या दक्षिण भागांतील जमिनी वारंवार दुष्काळाच्या तडाख्यांत सांपडत असल्यानें तेथील जमिनींची धूप थांबवून पावसाच्या सर्व पाण्याचा पिकांसाठीं उपयोग व्हावा या हेतूनें जमिनीस उतारानुसार ताली घालण्याचें कार्य हातीं घेण्यांत आलें. विहीरींतील पाण्याचा पुरवठा वाढविण्यासाठीं बोअरींगची, जमिनीचा कस वाढवून अधिक धान्योत्पादन व्हावें म्हणून उत्कृष्ट बी-बियाणांचें वांटप करण्याची आणि शेतकऱ्यांना खतें व रासायनिक खतें पुरविण्याची योजना आंखण्यांत आली आणि पूरक अन्नधान्यांचें उत्पादन करणाऱ्या आणि लोकांना अधिक प्रमाणांत अन्नसत्वें मिळवून देणाऱ्या भाजीपाल्याच्या लागवडींत वाढ करण्यांत आली. लिफ्टसच्या सहाय्यानें शेताला पाण्याचा पुरवठा होऊन तेथील धान्यांचें उत्पादन मोठ्या प्रमाणांत व्हावें म्हणून सहकारी लिफ्ट् इरिगेशनची योजना सुरू करण्यांत आली आणि तद्विषयक सहकारी-संस्थांना कर्जें व आर्थिक मदत दिली गेली. तलावांची, छोट्या मोठ्या पाटबंधाऱ्यांची व वनांची वाढ करून पडीक जमिनी लागवडीखालीं आणण्याची, सुधारलेल्या शेतीपद्धतीचा जास्तीतजास्त प्रमाणांत वापर करण्याविषयीं शेतकऱ्यांना प्रोत्साहन देऊन त्याबाबतींत त्यांना सर्वतोपरी मदत करण्याची आणि शेती संशोधन केंद्राद्वारें त्यांना माहिती देण्याची अशा कितीतरी योजना सुरू करण्यांत आल्या आणि समाधानाची गोष्ट म्हणजे अहमदनगर जिल्ह्यांतील कष्टाळू व प्रगतिप्रिय शेतकऱ्यांनीं पहिल्या व दुसऱ्या पंचवार्षिक योजना काळांमध्यें वरील सर्व योजना राबविल्या, सरकारनें देऊं केलेल्या सवलतींचा जास्तींत जास्त फायदा घेतला आणि आपल्या जमिनींतून अधिकाधिक पीक कसें काढतां येईल तें पाहिलें.

अहमदनगर जिल्ह्यांतील मुख्य पिकें ज्वारी, बाजरी, गहूं, ऊंस, डाळी, शेंगदाणे, कापूस व तांदूळ हीं असून येथें मोसंबी, केळी, द्राक्षें, लिंबू वगैरे फळांचीहि लागवड मोठ्या प्रमाणांत होते.

ज्वारीचें पीक अकोल्याखेरीज सर्व तालुक्यांत होतें. कर्जत, पारनेर, श्रीगोंदा, जामखेड, अहमदनगर व नेवासा या तालुक्यांत तें मोठ्या प्रमाणांत निघतें.

बाजरीचें पीक विशेषेंकरून पारनेर, संगमनेर व पाथर्डी या तालुक्यांत होतें तर ऊंस कोपरगांव, श्रीरामपूर व राहुरी या तालुक्यांत पिकतो. गहूं कोपरगांव, शेवगांव, नगर, श्रीरामपूर, राहुरी, नेवासा व पारनेर या तालुक्यांत पिकतो तर भात फक्त अकोले तालुक्यांत. मोसंबीची लागवड राहुरी, कोपरगांव, श्रीरामपूर व अहमदनगर या तालुक्यांत होते.

पिकांचे १९५० ते १९५९ अखेरपर्यंतचे आंकडे पाहिल्यास ऊंस, भात, कापूस वगैरे पिकांत दिवसेंदिवस वाढ होत गेल्याचें तर गहूं, ज्वारी व इतर अन्नधान्यांच्या पिकांच्या प्रमाणांत थोडीशी घट होत गेल्याचें दिसून येईल.

पीक	१९५०-५१ क्षेत्र एकूण क्षेत्राशीं प्रमाण	१९५५-५६ क्षेत्र एकूण क्षेत्राशीं प्रमाण	१९५७-५८ क्षेत्र एकूण क्षेत्राशीं प्रमाण	१९५८-५९ क्षेत्र एकूण क्षेत्राशीं प्रमाण
भात	१८९००ए.- ०.६	२०३००ए.- ०.६	२०८००ए.- ०.६	२३४००ए.- ०.७ट.
गहूं	१४९००ए.- ४.२	१५९२०ए.- ४.९	११९५०ए.- ३.७	११७४०ए-. ३.६"
ज्वारी	१४७५३००ए.-४८.२	१४६९६००ए.-४४.६	१३९६१००ए.-४२.८	१३९७४००ए.-४३.२"
बाजरी	७११२००ए.-२३.२	६७४१००ए.-२०.५	७५३३००ए.-२३.१	७५९१००ए.-२३.५"
डाळी	२४९३००ए.-०८.१	२९०३००ए.- ८.८	३२८१००ए.-१०.१	२९५३००ए.- ९.१"
(इतर अन्न–धान्यें)	८५१००ए.- २.८	७०१००ए.- २.१	५८३००ए.- १.८	५७५००ए.- १.५"
ऊंस	४८५००ए.- १.६	५६४००ए-. १.७	७०९००ए.- २.२	७३२००ए.- २.३"
गळी–ताचीं–धान्यें	१८३१००ए.- ६.०	२४६३००ए.- ७.५	२६०४००ए.- ७.९	२५३८००ए.- ७.८"
कापूस	४६६००ए.- १.५	१४९१००ए.- ४.५	७४३००ए.- २.३	६९०००ए.- २.१"
अन्नधान्यांखेरीज इतर	११७२००ए.- ३.८	१५६२००ए.- ४.८	१७९२००ए.- ५.५	१९०६००ए.- ५.९"
अेकूण क्षत्र	३०६४१००ए.-१००	३२९११००ए.-१००	३२५९९००ए.-१००	३२३६७००ए.-१००

यावरून दिसून येईल कीं, अहमदनगर जिल्ह्यांत सर्वांत अधिक पीक ज्वारीचें निघत असून १९५८-५९ सालीं ४३ टक्के क्षेत्र ज्वारीच्या लागवडीखालीं होतें. याबाबतींत साऱ्या महाराष्ट्र राज्यांत सोलापूर जिल्ह्याचा पहिला तर अहमदनगर जिल्ह्याचा दुसरा नंबर लागतो.

जिल्ह्यांतील दुसऱ्या क्रमांकाचें पीक बाजरी असून १९५८–५९ सालीं बाजरीच्या लागवडीखालीं २४ टक्के क्षेत्र होतें.

यानंतर गव्हाचा व त्यानंतर ऊंसाचा नंबर लागतो. १९५८–५९ सालीं ऊंसाच्या लागवडीखालीं ७३,२०० एकर क्षेत्र होतें. याबाबतींत साऱ्या महाराष्ट्र राज्यांत अहमदनगर जिल्ह्याचा पहिला नंबर लागतो. तीच गोष्ट कापसाची. १९५८–५९ सालीं कापसाच्या लागवडीखालीं १ लाख एकर जमिन आली असून याहि बाबतींत अहमदनगर जिल्हा हा पुणें विभागांत अग्रस्थान पटकावितो. कडधान्यांच्या बाबतींतही तीच गोष्ट आहे. कडधान्यांच्या लागवडीखालीं २३,६०,०० एकर क्षेत्र असून अहमदनगर जिल्ह्यानें साऱ्या महाराष्ट्र राज्यांत पहिला नंबर मिळविला आहे.

अहमदनगर जिल्ह्याला पिकाच्या बाबतींत एवढा विक्रम करतां आला त्याला शेतकऱ्यांचा कष्टाळूपणा आणि शेती सुधारण्याच्या बाबतींत सरकारनें देऊं केलेल्या सवलतींचा जास्तीत जास्त फायदा उठविविण्याच्या त्यांच्या वृत्तीबरोबर आपली जमिन, कालवा, विहिरी व पाटबंधारे वगैरे मार्गें मिळणाऱ्या पाण्याखालीं आणण्याची प्रवृत्तिहि कारणीभूत आहे. अशा रीतीनें पाण्याखालीं आलेल्या जमिनीच्या क्षेत्रांत गेल्या नऊ दहा वर्षांत कशी वाढ होत गेली हें खालील आंकडयांवरून दिसून येईल.

पाणी मिळण्याचें साधन	१९५०–५१ सालांतील क्षेत्र	१९५५–५६ सालांतील क्षेत्र	१९५६–५७ सालांतील क्षेत्र	१९५७–५८ सालांतील क्षेत्र	१९५८–५९ सालांतील क्षेत्र
कालवे	८५,६००एकर	९८,६००एकर	१०,४९००ए	१,२३,६००ए.	१,१०,१००ए.
विहिरी	१,२४,०००एकर	१,५८,८०० "	१,७२,२००ए	१,६१,९००ए.	१,८०,०००" ए
इतर	८ "	....		४ए	९ "
पाण्याखालीं भिजणारी जमिन	२,०९,६००एकर	२,५८,२००एकर	२,७७,१००ए.	२,८५,९००ए.	२,९१,०००"
लागवडीखालीं आलेल्या जमिनीशीं पाण्याखालीं आलेल्या जमिनीचें प्रमाण	७.२ टक्के	८.३ टक्के	८.९ टक्के	९.१ टक्के	९.४ टक्के

१९५८–५९ सालीं वेगवेगळया रीतीनें जमिन किती भिजली याची कल्पना वरील तक्त्यावरून येईल. आतां त्याविषयींची पीकवार माहिती खालीलप्रमाणें देतां येईल.

पीक	पाण्याखालचें क्षेत्र	पाण्याखालीं असलेल्या एकूण क्षेत्राशीं प्रमाण	पाण्याखालीं आलेल्या जमिनीचें लागवडीखालीं असलेल्या क्षेत्राशीं प्रमाण
भात	३९०० एकर	१.२ टक्के	१६.७ टक्के
गहूं	३२९०० "	९.८ "	२८.० टक्के
ज्वारी	१२४५०० "	३७.१ "	८.९ टक्के
बाजरी	१६३०० "	४.८ "	२.१ टक्के
कडधान्यें	१४८०० "	४.४ "	५.० टक्के
इतर अन्नधान्यें	२६५०० "	७.८ "	४६.१ टक्के
एकूण अन्नधान्यें	२१८९०० "	६५.१ "	८.३ टक्के
ऊंस	७३१०० "	२१.८ "	९९.९ टक्के
कापूस	१४६०० "	४.३ "	२०.१ टक्के
इतर पिकें	२९४०० "	८.३ "	६.६ टक्के
एकूण पिकें	३३६००० "	१०० "	१०.४ टक्के

अहमदनगर जिल्ह्यामध्यें बऱ्याच ठिकाणीं एक पीक घेतलें जात असलें तरी कांहीं ठिकाणीं दोन पिकेंहि घेतलीं जातात. गेल्या दहा वर्षांत त्या बाबतींत कसा फरक पडत गेला हें पहा.

	१९५०–५१	१९५५–५६	१९५७–५८	१९५८–५९
लागवडीखालीं एकूण आलेलें क्षेत्र	२९,३०७००एकर	३१,१०२००ए.	३०,८४४००एकर	३०,८६३००एकर
दोन वेळां पीक घेतलें गेलेलें क्षेत्र	१,३३४०० "	१,८०,९००ए	१,७५५०० "	१,५०,४०० "
दुहेरी पीक घेतल्या गेलेल्या क्षेत्राचें लागवडी-खालीं आलेल्या क्षेत्राशीं प्रमाण	४.६ टक्के	५.८ टक्के	५.७ टक्के	५ टक्के.

यावरून १९५५–५६ सालापर्यन्त दुहेरी पिकाच्या क्षेत्रांत वाढ होत जाऊन नंतर ती थोडी थोडी कमी होत गेल्याचें दिसून येईल. दुहेरी पीक निघणाऱ्या भागांमध्यें ऊंसाच्या लागवडींत एकदम वाढ झाली त्याचाहि हा परिणाम असेल.

पाणी पिणाऱ्या रानांच्या बाबतींत मात्र थोडासा वेगळा प्रकार आढळतो. तेथील दुहेरी पिकाच्या क्षेत्रांत १९५७–५८ सालापर्यन्त खूपच वाढ होत गेली पण नंतरच्या वर्षीं मात्र ती एकदम कमी झाली.

	१९५०–५१	१९५५–५६	१९५७–५८	१९५८–५९
पाण्याखालचें एकूण क्षेत्र क्षेत्र	२०९६००एकर	२५८२००एकर	२८५९००एकर	२९१००० एकर
दुहेरी पीक घेतलें गेलेलें पाण्या-खालचें क्षेत्र.	१९६०० "	४०४०० "	४९८०० "	४५००० एकर
दुहेरी पीक घेतलें गेलेल्या पाण्या-खालच्या क्षेत्राचें पाणी पिणाऱ्या एकूण क्षेत्राशीं प्रमाण.	९.३ टक्के	१५.६ टक्के	१७.४ टक्के	१५.४ टक्के

अहमदनगर जिल्ह्यांतील शेतकरी वर्ग आपल्या हक्कांविषयीं जागरुक असलेला आढळतो. म्हणूनच कुळकायद्याचा, तुकडेबंदी कायद्याचा व शेतीविषयक इतर कायद्यांचा या जिल्ह्यांत बराच प्रचार आणि प्रसार झाला आहे. याचा परिणाम लागवडीखालीं आलेल्या जमिनीच्या क्षेत्राच्या वाढीच्या बाबतींत जसा झाला आहे तसा स्वत: जमीन कसणाऱ्या लोकांच्या क्षेत्राच्या वाढीच्या बाबतींतहि झाला. गेल्या कांहीं वर्षांत खंडानें जमीन लावणाऱ्यांची संख्या घटली आहे.

प्रकार	१९४७–४८ सालांतील क्षेत्र	लागवडीखालीं आलेल्या एकूण जमिनीशीं प्रमाण	१९५२–५३ सालांतील क्षेत्र	लागवडीखालीं आलेल्या एकूण जमिनीशीं प्रमाण.
स्वत: जमीन कसणाऱ्यांचें क्षेत्र	१,३६,१३९एकर	७३.३ टक्के	ऽ१७३९५७ एकर	८१.६ टक्के
स्वत: जमीन न कसणारे पण नोकरांकडून मशागत करून घेणाऱ्यांचें क्षेत्र	३,५८४ "	१.९ "	१३८०५ "	६.५ "
खंडानें जमीन लावणाऱ्याचें क्षेत्र	४५,१०६	२४.४ "	२५४६१	११.९ "
एकूण क्षेत्र.	१८४८२९एकर	१००	२१३२२३	१०० "

जनावरें

अहमदनगर जिल्ह्यांतील जनावरांची संख्या १५५९००० आहे. महाराष्ट्र राज्यांतील ६.६ टक्के व पुणें विभागांतील २४.२ टक्के जनावरें एकटया अहमदनगर जिल्ह्यांत आहेत. त्यांची वर्गवारी खालील-प्रमाणें करतां येईल.

बैल, गाई वगैरे	७७७८४६
मेंढ्या	२२१०००
बकरे	४६७०००
म्हशी	६९०००
घोडीं, कुत्रीं वगैरे	२५०००
	१५५९८४६

बकऱ्यांच्या बाबतींत अहमदनगर जिल्ह्याचा पहिला नंबर लागतो.

पक्षी

अहमदनगर जिल्ह्यांतील पाळीव पक्ष्यांची संख्या ५६१००० असून त्यापैकीं ५६०००० कोंबड्या आहेत.

शेतकी अवजारें.

शेतकी अवजारांच्या बाबतींत अहमदनगर जिल्ह्याचा पुणें विभागांत पहिला क्रम लागत असून साऱ्या महाराष्ट्र राज्यांत दुसरा लागतो. औरंगाबादचा पहिला आणि अहमदनगरचा दुसरा. अवजारांच्या संख्येंत गेल्या कांहीं वर्षांत कसा फरक पडत गेला तें खालील आंकडयांवरून कळून येईल.

साल	लांकडी नांगर	लोखंडी नांगर	बैलगाडया.
१९५१	३२०७२	३४०२७	५२२९४
१९५६	२३३२७	३५०८९	५०६३४

वनें

औद्योगीकरणामुळें व लोकसंख्येच्या वाढीमुळें व पदार्थांची मागणी अधिकाधिक वाढत आहे. उद्योगधंद्यांसाठीं, बांधकामासाठीं, आणि घरगुती उपयोगासाठीं लांकूड व कोळसा लागतो तर रासायनिक व इतर उद्योगधंद्यांसाठीं डिंक व रेशीम यांची आवश्यकता असते. कातडीं कमविण्यासाठीं झाडांच्या साली व फळें यांची जरुरी लागते तर लांकडाच्या लगद्यापासून कागद तयार होतोच पण त्याचा उपयोग सेल्युलॉईड व कृत्रिम रेशीम बनविण्यासाठींहि होतो. तसेंच पुठ्ठा, प्लायवुड, आगपेटीचें लांकूड, बॉबिन्स्, धोटे, काथ्या तयार करणें इ० अनेक उद्योगधंद्यांना लागणाऱ्या कच्च्या मालाबरोबर बांबू, गवत, चारा, फळें, फुलें, सूत, व औषधी इ० माल वनांपासून मिळतो. शिवाय झाडें ओलावा टिकवून, नद्यांतील व ओढ्यांतील पाणी-पुरवठ्याचें नियमन करून व पुरांचा जोर नि ओलावा नष्ट करणाऱ्या वाऱ्यांचा जोर कमी करून शेतीचें संरक्षण करण्याच्या बाबतींत फार महत्त्वाची कामगिरी बजावतात. म्हणून दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्यें वनांचें जतन करण्याचे तसेंच त्यांचा पूर्णपणें विकास करण्याचे कार्यक्रम आंखण्यांत आले आहेत.

राष्ट्रीय वन धोरणानुसार वनांखालीं ३३ टक्के क्षेत्र असलें पाहिजे. परंतु महाराष्ट्रांत हें क्षेत्र फक्त २१–६ टक्के आहे. तर ४२,०२००० एकर क्षेत्र लागवडीखालीं असलेल्या अहमदनगर जिल्ह्यामध्यें ४,९५,३५६ एकर क्षेत्र म्हणजें सुमारें १२ टक्के क्षेत्र वनाखालीं आहे. म्हणून केवळ सध्यां असलेल्या वनांचें संरक्षण व जतन केलें पाहिजे असें नव्हें तर किफायतशीर झाडांची लागवड करून त्यांना समृद्ध केलें पाहिजे. इतकेंच नव्हें तर त्यांची वाढहि केली पाहिजे.

परंतु अहमदनगर जिल्ह्यांत काय प्रकार आपल्याला पहायला मिळतो ? बहुतेक साऱ्या भागांत लहान झुडुपें आणि तुरळक झाडेंच दृष्टीस पडतात. गेल्या महायुद्धाच्या वेळीं येथील झाडांची बेसुमार तोड झाल्यामुळें वनें उजाड झालीं आहेत. तीं नुसतीं नांवालाच अरण्यें उरलीं आहेत. म्हणून पहिल्या व दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत वनवाढीची योजना हातीं घेण्यांत आली. वन खात्याच्या व महसूल खात्याच्या ताब्यांतील वनांच्या उजाड झालेल्या भागांत जास्तींत जास्त झाडें लावण्याची मोहिम तर हातीं घेण्यांत आलीच पण इतर ठिकाणींही लोकांनीं अधिक झाडें लावावींत म्हणून महोत्सवांसारखे कार्यक्रम आखण्यांत आले. त्यासाठीं विविध प्रकारच्या झाडांच्या बिया व रोपटीं मोफत पुरविलीं जाऊं लागलीं इतकेंच नव्हें तर वृक्षा-रोपणाच्या बाबतींत लोकांना उत्तेजन देण्याच्या हेतूनें अधिकाधिक झाडें लावून जास्तीत जास्त झाडांची निगा राखण्याच्या बाबतींत आघाडीवर असलेल्या जिल्ह्यांतील पहिल्या तीन गांवांना २०० रु. १०० रु. व ५०रु.

याप्रमाणें तीन बक्षिसें देण्यांत येऊं लागलीं. १९५१ सालानंतरच्या नऊ वर्षांत हीं बक्षिसें पटकाविणाऱ्या खेड्यांचीं नांवें खालीलप्रमाणें आहेत:–

१९५१–५२ साल	पहिलें बक्षीस	देवळाली, तालुका	राहुरी
	दुसरें बक्षीस	राहुरीबुद्रुक "	"
	तिसरें बक्षीस	खरडगांव "	शेवगांव
१९५२ साल	पहिलें बक्षीस	पिंपळगांव, कुंजिरा, तालुका	संगमनेर.
	दुसरें बक्षीस	नान्नज "	जामखेड.
	तिसरें बक्षीस	कोळगांव "	श्रीगोंदा.
१९५३–५४ साल	पहिलें "	त्रिभुवनवाडी	पाथर्डी.
	दुसरें "	सावरगांव पार	अकोला.
	तिसरें "	चिंचोली गुरव	संगमनेर
१९५४–५५ साल	पहिलें बक्षीस	सुपे "	पारनेर
	दुसरें "	कोकमठाण "	कोपरगांव.
	तिसरें "	पिंपळगांव माळवी	अहमदनगर
१९५५–५६ साल	पहिलें बक्षीस	भोकर "	श्रीरामपूर.
	दुसरें बक्षीस	देवळाली "	राहुरी.
	तिसरें बक्षीस	निंबोडी "	कर्जत.
१९५६–५७ साल	पहिलें बक्षीस	देवळाली "	राहुरी
	दुसरें बक्षीस	विसापूर "	श्रीगोंदा
	तिसरें बक्षीस	प्रवरासंगम	नेवासा
१९५७–५८ साल	पहिलें बक्षीस	वाळवणें "	पारनेर
	दुसरें बक्षीस	दिगंबर "	अकोला
	तिसरें बक्षीस	ताकीलवाडी "	अकोला
१९५८–५९ साल	पहिलें बक्षीस	बोल्हेगांव "	नगर
	दुसरें बक्षीस	खांजापूर "	संगमनेर
	तिसरें बक्षीस	देवगांव "	नेवासा.

१९५१–५२ सालीं अहमदनगर जिल्ह्यामध्यें १,५४,४९८, १९५२–५३ सालीं १,६०,००९ आणि १९५३–५४ सालीं १,८२,०२२ झाडें लावण्यांत आलीं. त्यानंतरच्या पांच वर्षांत लावलेल्या झाडांची आणि त्यांपैकीं जगलेल्या वृक्षांची कल्पना खालील आंकड्यावरून येईल.

साल	लावलेलीं झाडें	जगलेलीं झाडें
१९५४–५५	२१,२१,७५०	५,०५९४२
१९५५–५६	१०,४०,९७४	२,११,४५३
१९५६–५७	४,८०,०१८	१,२४,८०३
१९५७–५८	३,१०,३६८	७०,६४३
१९५८–५९	३,४०,८९०	१,०८,४७१
१९५९–६०	६३,२१,७०७	

गेल्या दोन तीन वर्षांमध्यें लावलेल्या झाडांच्या संख्येंत जशी वाढ झाली आहे तशी जगलेल्या झाडांच्या प्रमाणांतहि वाढ झालेली दिसेल. नुसतीं झाडें लावून उपयोग नाहीं तर तीं जगविलीं पाहिजेत, ही गोष्ट ध्यानांत आली आहे. झाडें बेसुमार तोडलीं गेल्यामुळें मोठमोठाले प्रदेश उजाड होऊन जमिनीची धूप कमाली-बाहेर वाढली आहे. त्यामुळें कांहीं ठिकाणीं झुडुपें तरी उगवतील किंवा नाहीं अशी शंका होती पण ती फोल ठरून त्या ठिकाणीं आतां झाडांनीं मूळ धरलें आहे. अशा अकोला व राजूर भागांतील उजाड डोंगराळ प्रदेशांत लवकरच दाट अशी वृक्षराजी दिसूं लागेल. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत संरक्षित वनांचा विकास करण्याची योजनाहि हातीं घेण्यांत आली असून १७५० एकर असलेल्या कुरणांच्या क्षेत्रांत आणखी ३००० क्षेत्राची वाढ केली जाणार आहे. त्या खेरीज भूसंरक्षण व सारख्या उंचीवर खड्डे खणून गवताची प्रत सुधारण्यासाठीं अंजन, शिसू, सिसव इ० जातींच्या झाडांची लागवड करण्यासाठीं दोन नवीन कुरणांची वाढ केली जाणार आहे. अशा कुरणांतून बेकायदेशीरपणें गुरांना चरतां येऊं नये म्हणून कुंपण घालण्याची व्यवस्थाहि करण्यांत येणार आहे.

वन संरक्षणाच्या बाबतींत घायपातांच्या कुंपणाचा चांगला उपयोग केला जातो. त्यांमुळें झाडाचें आगीपासून तर रक्षण होतेंच पण त्यांच्यामुळें गुरांपासूनहि बचाव होतो. शिवाय घायपाताच्या पानांपासून निघणाऱ्या धाग्यांचा दोऱ्या तयार करण्यासाठीं उपयोग होतो. शिवाय घायपातामुळें भूसंरक्षणाचें काम होऊन जमिनीची धूप थांबते. या सर्व गोष्टी विचारांत घेऊन घायपात लागवडीची योजना दुसऱ्या पंचवार्षिक योज-नेंत समाविष्ट करण्यांत आली असून त्याअन्वयें अहमदनगर जिल्ह्यांतील वनांच्या सीमेवर कुंपणवजा पन्नास मैल लांबीची घायपाताची लागवड करण्यांत येत आहे. १९५६–५७ सालीं अशी दहा मैल लांबीची लागवड करण्यांत आली.

नुकतींच लावलेलीं झाडें नीट वाढवियाचीं झालीं तर रोपें चांगलीं असायला पाहिजेत. तीं जर कां चांगलीं नसतील तर खतपाणी करण्याचे श्रम वांया जाणार. झाडें लावून न लावण्यासारखीच स्थिति होणार. म्हणून उत्कृष्ट रोपटीं तयार करण्यासाठीं अहमदनगर जिल्ह्यांतील दरेक रेंजमध्यें वेगवेगळ्या प्रकारच्या झाडांच्या कायमच्या ओल्या नर्सरीज् तयार केल्या जात आहेत. कोरड्या जागेंत तयार केलेल्या कनिष्ठ प्रतीच्या रोपांपेक्षां ओल्या नर्सरींतील रोपें अधिक फलदायी ठरत असल्यानें १९५६–५७ सालीं जिल्ह्यांत चार ओल्या नर्सरी स्थापन करण्यांत आल्या असून त्यांतून साग, सदडा, सीलम, अडुळसा इ० जातीचीं रोपें पुरविलीं जात आहेत.

लोकांना भूसंरक्षण व वनसंवर्धनाच्या कार्याची उपयुक्तता पटविण्याच्या हेतूनें अहमदनगर जिल्ह्या मध्यें प्रात्यक्षिकाची योजना हातीं घेण्यांत आली आहे. त्य साठीं राहुरीजवळ असलेल्य धर्माडी टेकडीची निवड करण्यांत आली असून १०० एकराच्या या पट्ट्यांतील ५० एकर रानावरच वनें तयार करण्याच्या उद्देशानें झाडें लावण्यांत आलीं असून तेथें लोकांना प्रात्यक्षिकाद्वारें माहिती दिली जाते आणि त्याचा इष्ट तो परिणाम होत असल्याचें दिसून येत आहे.

महसूल खात्याच्या ताब्यांतील पडीक जमिनींतील झाडांचा जोरानें ऱ्हास होत असल्याचें दिसून येतें. मग तो शेजारच्या खेड्यांतील लोक तेथें आपली गुरें चरायला सोडीत असल्यामुळें असो किंवा जळणासाठीं तेथील लांकूड बेकायदेशीरपणें तोडलें जात असल्यामुळें असो. एवढ्याचसाठीं खेड्यांकरितां छोटीं वनें राखून ठेवणें आवश्यक वाटल्यानें समाज विकास व राष्ट्रीय विस्तार योजना क्षेत्रांत जेथें जेथें चराऊ रानें आहेत तेथें-तेथें त्यांची सुधारणा करून त्यांचा उपयोग वनवाढीकडे करण्याचा प्रयत्न होतो आहे.

सहकार

सहकारी चळवळीच्या बाबतींत अहमदनगर जिल्हा हा आघाडीवर असलेला जिल्हा आहे. तेथें सहकार आंदोलन पन्नासाहून अधिक वर्षे चालूं असून त्या बाबतींत त्यानें जेवढी कामगिरी बजाविली आहे तेवढी नव्या महाराष्ट्र राज्यांतीलच नव्हें तर जुन्या मुंबई राज्यांतील दुसऱ्या कोणत्याहि जिल्ह्यानें बजाविली असेल असें वाटत नाहीं. या जिल्ह्यांतील सर्वच्या सर्व शेतकरी समाज सहकारी क्षेत्राच्या कक्षेंत आणण्याचे प्रयत्न सुरू असून जवळ जवळ प्रत्येक खेडचांतून सहकारी संस्था सुरू होत आहेत आणि त्याबरोबर त्यांचें भांडवल वाढत असून त्यांच्या सभासदांच्या संख्येंतहि जोराची वाढ होत आहे.

साल	सहकारी संस्था संख्या	संस्थेचे सभासद.
१९५०–५१	६१७	६१९२४
१९५१–५२	७१६	७०१०२
१९५४–५५	८३३	८१७४६
१९५५–५६	८५४	८८३१८
१९५७–५८	९०३	१००९९७
१९५८–५९	९६६	११२२५४

१९५९ अखेर जिल्ह्यांतील १३१९ खेडचांपैकीं १२५० खेडचांमध्यें सहकारी संस्था स्थापन झाल्या असून त्यांचें शेअर भांडवल तीन कोटी छपन्न लक्ष रु. चें व खेळतें भांडवल अठरा कोटी असून गंगाजळी व इतर फंडामध्यें दोन कोटी चौदा लक्ष रु. गुंतविले गेले आहेत.

सभासद संख्येमध्यें व खेळत्या भांडवलामध्यें गेल्या नऊ दहा वर्षांत बरीच वाढ झाली आहे.

साल	संस्था सभासद	प्रत्येक सभासदामागें खेळतें भांडवल.
१९५१–५२	९८	३०३
१९५५–५६	१०४	८०३
१९५८–५९	१२६	१४६३

अहमदनगर जिल्ह्यामध्यें विविध प्रकारच्या सहकारी संस्था आहेत. त्यांची तशीच त्यांच्या सभासदांची संख्या किती आहे आणि त्यांचें खेळतें भांडवलहि केवढें आहे याची कल्पना खालील तक्त्यावरून येईल.

संस्थाप्रकार	संस्थासंख्या	एकूण संस्थासंख्येशीं असलेलें प्रमाण	सभासद संख्या	एकूण सभासद संख्येशीं असलेलें प्रमाण	खेळतें भांडवल	एकूण खेळत्या भांडवलाशीं असलेलें प्रमाण
शेतकी पतपेढ्या	७००	७२.५	६११७७	५०.२	६२९२७०००	३४.३
बिगर शेतकी पतपेढ्या	५०	५.२	२४६०५	२०.२	१३१२५०००	७.४
शेतकी नॉन	१११	११.५	२४४४७	२०.९	१००४९००००	५६.४
क्रेडिट सोसायटीज	१०४					
नॉनक्रेडिट सोसायटिज		१०.८	१०६३१	८.७	१५४५०००	०.९
एकूण	९६६	१००	१२१९५०	१००	१७७८७०००	१००

या जिल्ह्यामध्यें शेतकी क्रेडिट व नॉन्क्रेडिट सोसायटीज् ८११ असून त्यांच्यांत गेल्या ८–९ वर्षांमध्यें कशी वाढ होत गेली तें पहाः–

साल	संस्था संख्या	सभासद संख्या	खेळतें भांडवल.
१९५१–५२	६०१	४८०६३	१९८२००००
१९५५–५६	७१४	६०१०७	५७९४६०००
१९५७–५९	८८१	८६६२४	१६३४१७०००

तसेंच बिगर शेतकी क्रेडिट व नॉन् क्रेडिट सोसायटीज् ची संख्या १५५ असून त्यांच्यांतहि गेल्या ८–९ वर्षांत कशी वाढ होत गेली हें पहाणें उचित ठरेल.

साल	संस्था संख्या	सभासद संख्या	खेळतें भांडवल
१९५१–५२	११५	२२०३९	११३९८
१९५५–५६	१४०	२८२११	१२७६५
१९५८–५९	१५५	३४३२६	१४६७०

आतां जिल्ह्यांतील एकूण ९६६ सहकारी संस्थांची तालुकावार वर्गवारी खालीलप्रमाणें करतां येईल.

तालुका	संस्था संख्या	एकूण संस्थेशीं प्रमाण
अहमदनगर	१३६	१४.१
पारनेर	७१	७.४
श्रीगोंदा	५६	५.८
कर्जत	४३	४.४
जामखेड	४२	४.४
राहुरी	८१	८.४
नेवासा	६८	७
शेवगांव	६०	६.२
पाथर्डी	६०	६.२
संगमनेर	८३	८.६
अकोला	७८	८.१
श्रीरामपूर	८४	८.७
कोपरगांव	१०४	१०.७
एकूण	९६६	१००

समाज विकास योजना क्षेत्रामध्यें तर सहकारी चळवळीनें अधिकच जोर धरला असून तेथें फार मोठें कार्य झालें आहे. सहकारी क्षेत्रामध्यें न आलेलें असें एकहि गांव तेथें आढळणार नाहीं. जामखेड तालुक्यामध्यें तर १०० टक्के खातेदार सहकारी चळवळीमध्यें सहभागी झाले आहेत.

अहमदनगर जिल्ह्यांतील सहकारी चळवळीची सुरुवात १९०९ सालीं भिंगार येथें नागरी पतपेढी काढून झाली. त्यानंतर लगेच एक वर्षानें अर्बन सेंट्रल को–ऑपरेटिव्ह बँकेची स्थापना झाली. या जिल्ह्यांतील सहकारी चळवळीचा पहिला टप्पा १९४७ पर्यंतचा समजतां येईल. त्या वेळेपर्यंत जिल्ह्यांतील सहकारी संस्थांची संख्या ३८० झाली होती. तेव्हां मुख्यतः प्राथमिक शेतकी पतपेढ्या, नागरी पतपेढ्या व तालुका विकास मंडळें अस्तित्वांत होतीं. कांहीं तालुक्यांत खरेदी विक्री संघ व ग्राहक संस्थाहि दिसत होत्या.

येथें सहकारी चळवळीचा सर्वांगीण विकास स्वातंत्र्यप्राप्तीनंतर झाला. दुसऱ्या महायुद्धामुळें निर्माण झालेली आर्थिक पोकळी भरून काढण्याच्या दृष्टीनें आणि जनहितावर नजर ठेवून सहकारी चळवळीनें बराच प्रयत्न केला आहे. १९४७ सालीं मुंबई सरकारनें सावकारी नियंत्रण कायदा पास करून शेतकी पतपेढ्यांना आपलें कार्य जोमानें करण्याची संधि प्राप्त करून दिली आणि या संधीचा सर्वांत अधिक फायदा कुणी घेतला असेल तर तो नगर जिल्ह्यानें. त्यानें सन १९४८ सालीं प्रवरानगर येथें पहिला सहकारी साखर कारखाना सुरू करून सहकारी क्षेत्रांतील नवीन पर्व सुरू केलें. महाराष्ट्रांतील एकूण पंधरा सहकारी साखर कारखान्यांपैकीं पांच नगर जिल्ह्यांत आहेत. १९५१–५६ या पहिल्या पंचवार्षिक योजनाकाळांत सामुदायिक व खंडकरी शेतकी संस्था, शेती सुधार संस्था, धान्य डेपो, पाणीपुरवठा संस्था, तालुका खरेदीविक्री संघ, वगैरे संस्था स्थापन झाल्या. दुसऱ्या पंचवार्षिक योजनाकाळांत संगमनेर तालुक्यांतील सहकारी तेल गिरणी, नगर व शेवगांव येथील सहकारी कापूस जिनिंग व प्रेसिंग सोसायट्या आणि अकोला तालुक्यांतील शेतकी माल विक्री संघ,

स्थापन करून सहकारी चळवळीनें शेती मालाची नवी प्रक्रिया करण्याच्या दृष्टीनें नवीन दालनांत प्रवेश केला आहे.

जिल्ह्यांतील सहकारी संस्थांची गेल्या कांहीं वर्षांत कशी वाढ होत गेली हें खालील आंकडेवारीवरून कळून येईल

क्रमांक	सहकारी संस्थेचा प्रकार	१९५७–५८ सालीं	१९५८–५९ सालीं	१९५९–६० सालीं
१	जिल्हा मध्यवर्ति सहकारी बॅंक	१	१	१
२	शेतकी सोसायटचा व विविध कार्यकारी सहकारी सोसायटचा	६६७	६९९	८९५
३	नागरी बॅंका	२	२	३
४	नागरी पतपेढचा	४६	४८	५४
५	तालुका खरेदी विक्री संघ	१०	१२	१३
६	इतर सेल सोसायटचा	२	३	४
७	धान्य बॅंन्का किंवा सोसायटचा	५	५	५
८	लॅन्ड मार्गेज बॅंक	—	—	१
९	सहकारी साखर कारखाने	५	५	५
१०	सहकारी तेल गिरणी	१	१	१
११	कापूस जिनिंग प्रेसिंग सोसायटचा	—	—	२
१२	टोमॅटो प्रोसेसिंग सोसायटी	—	—	१
१३	शेती संस्था			
	(अ) शेती सुधार	५	५	५
	(ब) संयुक्त शेती	३	३	६
	(क) सामुदायिक शेती	५	५	९
१४	पाणीपुरवठा	४	५	६
१५	दूध पुरवठा करणाऱ्या संस्था	६	६	१२
१६	ग्राहक संस्था	१८	१९	१६
१७	घरें बांधणाऱ्या संस्था.	२९	३२	३७
१८	मच्छीमारी सोसायटी	१	१	१
१९	डिस्ट्रिक्ट को-ऑपरेटिव्ह बोर्ड	१	१	१
२०	सुपरवायझिंग युनियन्स व तालुका विकास मंडळें	२८	२८	२८
२१	औद्योगिक संस्था			
	(अ) विणकर सोसायटचा	२७	२७	३०
	(ब) जंगल कामगार व कामगार पुरवठा संस्था	१८	१९	२५
	(क) इतर औद्योगिक संस्था	३४	३७	४९
	एकूण	९२०	९६६	१२११

यावरून अहमदनगर जिल्ह्यामध्यें गेल्या कांहीं वर्षांत सहकारी संस्थांची वाढ झपाट्यानें होत गेल्याचें दिसून येईल. यंदाच्या १९५९–६० सालीं तर दोनशें एक्कावन संस्था रजिस्टर करण्यांत आल्या आणि ३०–६–६० रोजीं सहकारी संस्थांची संख्या १२११ वर गेली. हा जिल्हा सहकारी क्षेत्रांत भरीव कामगिरी करीत असल्याचें पाहून १९५९–६० सालीं तो विशेष प्रगती-साठीं निवडला गेला. त्यामुळें सहकारी संस्थांनीं आपली प्रगति कशी साधली व त्यांना सरकारी मदत किती आणि कशी मिळाली हें आतां आपण पाहूं.

(१) शेतकी पतपुरवठा.

अहमदनगर जिल्ह्याकरितां स्वतंत्र अशा मध्यवर्ती सहकारी बॅन्केची फार आवश्यकता होती. म्हणून १९५८ सालीं नगर जिल्हा मध्यवर्ती बॅन्क स्थापन करण्यांत आली. सुरुवातीला या बॅन्केचें कार्यक्षेत्र फक्त पांच तालुक्यांपुरतें मर्यादित होतें पण अवघ्या बारा महिन्यांच्या काळांत सर्व तेरा तालुक्यांचा व्यवहार बॅन्केनें आपल्या हातीं घेतला. त्याचबरोबर कोपरगांव व राहुरी येथील सहकारी साखर कारखान्यांना लागणारा पैसा पुरविण्याची जबाबदारीहि तिनें पत्करली. सध्यां बॅन्केच्या २२ शाखा अस्तित्वांत असून बॅन्केला सरकारकडून १६ लाख रुपयांचें शेअर भांडवल मिळालें आहे. ३०–६–१९६० रोजीं पुऱ्या होणाऱ्या वर्षांत बॅन्केनें सहकारी संस्थांना साडेतीन कोटी रु. चें कर्ज दिलें असून बॅन्केकडे सव्वादोन कोटींहून अधिक रु. ठेवीरूपानें जमा आहेत. सहकारी संस्थांना इतकें कर्ज देणारी बॅन्क महाराष्ट्रांतच नव्हे तर अखिल भारतांत दुसरी नाहीं.

(अ) मध्यवर्ती सहकारी बॅन्क

जमिनीची सुधारणा करणें, शेतीसाठीं लागणारीं यंत्रें खरेदी करणें, नव्या विहिरी खोदणें किंवा जुन्या विहिरी दुरुस्त करणें, बांधबंदिस्ती करणें, वगैरे आवश्यक बाबींसाठीं शेतकऱ्यांना लांब मुदतीच्या कर्जाची नेहमींच आवश्यकता भासते. यापूर्वी या गरजा मुंबई राज्य सहकारी लॅन्ड मॉर्टगेज बॅन्केतर्फे पुरविल्या जात होत्या. पण अहमदनगर जिल्ह्यासाठीं नुकतीच एक स्वतंत्र अशी जमीन गहाण बॅन्क स्थापन झाली असून तिचे व्यवहार लवकरच सुरू होणार आहेत.

(आ) लॅन्ड मॉर्ट्गेज बॅन्क

या वर्षी शेतकी पतपेढ्यांची संख्या ६९९ वरून ८९५ वर गेली आहे. जिल्ह्यांतील सर्वच्या सर्व गांवें या संस्थेच्या कार्यक्षेत्रांत आलीं आहेत आणि सभासदांची संख्या ६०,००० वरून १ लाखावर गेली आहे. प्रत्यक्ष शेती करणाऱ्या शेतकऱ्यांपैकीं ६१ टक्के लोक सहकारी संस्थांचे सभासद झाले आहेत ही विशेष ध्यानांत घेण्याजोगी गोष्ट आहे.

(इ) शेतकी पतपेढ्या

जिल्ह्यांत ७० संस्था मोठ्या आकाराच्या विविध कार्यकारी सहकारी सोसायट्या असून त्यांनीं कर्ज-व्यवहाराव्यतिरिक्त सुधारलेली खतें, बीं-बियाणें वगैरे शेतकऱ्यांना नेहमीं लागणाऱ्या वस्तूंचा पुरवठा करणें इ० कामें हातीं घेतलीं आहेत. कांहीं ठिकाणीं सभासदांच्या मालाची विक्री देखील या संस्थांमार्फत होते. या संस्थांना सरकारकडून तीन वर्षें सेक्रेटरी खर्चासाठीं ६०० रु. मदत देण्यांत येते. इतकेंच नव्हें तर त्यांचे कांहीं शेअर्स देखील सरकारनें खरेदी केले आहेत.

१९५९–६० सालीं १९३ नवीन सेवा सोसायटचा रजिस्टर करण्यांत आल्या आणि पूर्वी अस्तित्वांत असलेल्या ४७७ संस्थांनीं सेवा सोसायटचांचे पोटनियम स्वीकारले. तेव्हां या जिल्ह्यांतील सेवा सोसायटचांची संख्या आतां ६७० वर गेली आहे. सरकारनें या संस्थांना देखील सेक्रेटरी खर्चासाठीं पांच वर्षेपर्यंत उतरत्या प्रमाणांत मदत देण्याचें ठरविलें आहे. यांतील बहुतेक संस्था कर्जव्यवहाराव्यतिरिक्त साखर व रॉकेल वांटप करणें आणि स्वस्त धान्य दुकानें चालविणें, यांसारखीं कामें करीत आहेत. या योजनेखालीं सरकारनें केलेल्या मदतीची खालील कोष्टकावरून कल्पना येईल.

(ई) सेवा सोसायटचा

तपशील	१९५६–५७	१९५७–५८	१९५८–५९	१९५९–६०.
मध्यवर्ति सहकारी बॅन्केस दिलेलें सरकारी शेअर भांडवल.	---	३०००००	१२०००००	१००००
मोठचा आकाराच्या सोसायटचांमधील सरकारी शेअर भांडवल.	१००००	१००००	३११५००	१३६०००
मध्यवर्ति सहकारी बॅन्केस सेक्रेटरीखर्चा–साठीं मदत	---	७५००	८३३३	५०००
मोठचा आकाराच्या सोसायटचांना सेक्रेटरीखर्चासाठीं मदत.	---	१३२००	२५८००	३४८००
सेवा सोसायटचांना सेक्रेटरीखर्चासाठीं मदत	---	---	---	१६५०००

(२) खरेदीविक्री संघ

३० जून १९५७ अखेर अहमदनगर जिल्ह्यांतील १३ तालुक्यांपैकीं फक्त आठ तालुक्यांत खरेदी विक्री-संघ होते. त्यानंतर १९५७ ते ६० या काळांत राहिलेल्या पांच तालुक्यांत संघ स्थापन झाले. या संघांमार्फत शेतकऱ्यांना सुधारलेलीं बीं-बियाणें, खतें, शेतकी अवजारें आदि मालांचा पुरवठा केला जातो. तसेंच या संघांच्याकडे ठोक साखर व रासायनिक खतांच्या वांटपाचेंहि काम देण्यांत आलें. त्याचप्रमाणें शेतकऱ्यांच्या शेतमालाची विक्रीहि या संघांमार्फत केली जाते. या संस्थांचा कारभार व्यवस्थित चालावा म्हणून सरकारनें त्यांच्यांत भागिदारी पत्करली आहे. इतकेंच नव्हें तर नवीन अस्तित्वांत असलेल्या संस्थांना त्या तोटचांत आल्यास मदत म्हणून वर्षाकाठीं हजार रु. प्रमाणें तीन वर्षें मदत दिली आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणें:–

तपशील	१९५६–५७	१९५७–५८	१९५८–५९	१९५९–६०
शेअर भांडवल	१७७०५(१)	१३९००(१)	६१०८५(४)	५६२४०(६)
व्यवस्थापक खर्चास मदत	---	---	१०००(१)	२०००(२)

कोठारें बांधणें:–

या योजनेखालीं खरेदीविक्री करणाऱ्या संस्था व विविध कार्यकारी सहकारी सोसायटया यांना कोठारें बांधण्यासाठीं सरकारकडून कर्ज व मदत देण्यांत आली. त्याचा तपशील खालीलप्रमाणें:–

क्रमांक	सोसायटीचा प्रकार	सोसायटयांची संख्या	कोठाराचा प्रकार	कर्ज	मदत	आर्थिक वर्ष
१	खरेदीविक्री संघ	१	मोठें	३००००	१००००	१९५७–५८
२	वि. का. स. सोसायटया	४	लहान	३००००	१००००	१९५७–५८
३	"	७	–"–	५२५००	१७५००	१९५८–५९
४	"	अ ६	–"–	२२५००	७५००	१९५८–५९
५	खरेदी विक्री संघ	अ १	मध्यम	७५००	२५००	—"—
६	वि. का. स. सोसायटया	अ २	—"—	१५०००	५०००	१९५९–६०
७	खरेदी विक्री संघ	–"–	मोठें	३००००	१००००	—"—
८	वि. का. स सोसायटया	अ-२६	लहान	११६२५०	३८७५०	—"—
९	"	ब–५	"			
	एकूण	४९ कोठारें				

अः–या संस्थांना कोठाराच्या एकूण रकमेच्या निम्मी रक्कम पहिला हप्ता म्हणून मिळाली आहे.

बः–या संस्थांना निम्म्या रकमेचा दुसरा हप्ता देण्यांत आला आहे. १९५९–६० सालीं दिलेलीं तीस कोठारें सोडलीं तर पूर्वीच्या १९ कोठारापैकीं १६ चें बांधकाम पूर्ण झालें आहे व राहिलेल्या तीन कोठारांचें पुरें होत आलें आहे. या कोठारांतून शेतमाल ठेवला जातो आणि त्यावर तें पिकविणाऱ्यांना ६०–७० टक्के-पर्यंत ॲडव्हान्स दिला जातो आणि मालाला योग्य भाव येण्याचा जेव्हां संभव असतो तेव्हां तो विकला जातो. कोठारांचा उपयोग इतर वस्तु ठेवण्यासाठींहि होतो.

(३) धान्य दुकानें चालविणें:–

अहमदनगर जिल्ह्यांत एकूण पांच धान्य सोसायटया आहेत. सुगीच्या हंगामांत धान्य खरेदी करून पावसाळयांत वगैरे इतर वेळीं तें गरीब शेतकऱ्यांना माफक दरांत पुरविण्याचें कार्य या संस्था करीत असतात. म्हणून विविध कार्यकारी संस्थांना देखील सरकारीरीत्या मदत देण्यांत आली.

साल	रक्कम	संस्थांची संख्या
१९५७–५८	१५०००	३
१९५८–५९	६०००	३
१९५९–६०	८०००	२

(४) सहकारी शेती करणाऱ्या संस्था

१९५९ सालापूर्वी नगर जिल्ह्यामध्यें १३ सहकारी संस्था होत्या. १९५९–६० सालीं ७ संस्थांची भर पडून आतां एकूण संख्या २० झाली आहे आणि लवकरच ५ नवीन संस्था निघण्याची शक्यता आहे. निघालेल्या २० संस्थांपैकीं ५ शेतीसुधारणा सोसायटचा, ६ संयुक्त शेती करणाऱ्या सोसायटचा आणि ९ सामुदायिक शेती करणाऱ्या सोसायटचा आहेत. या संस्थांना दुसऱ्या पंचवार्षिक योजनेखालीं खालीलप्रमाणें आर्थिक सहाय्य देण्यांत आलें.

तपशील	साल १९५६–५७	१९५७–५८	१९५८–५९	१९५९–६०
भाग भांडवल	–	७०००(२)	१२०००(३)	–
कर्ज	–	–	४८००(२)	–
मदत	–	६७४(१)	१७८०(३)	८९००(३)

३०–६–५९ रोजीं या सोसायटचांची सभासद संख्या १०३४ असून त्यांचें शेअर भांडवल २७७८३५ रुपयांचें होतें. सोसायटचांच्या ताब्यांत असलेल्या एकूण २५०० एकर जमिनींपैकीं १९१८ एकर जमीन प्रत्यक्ष लागवडीखालीं आलेली होती आणि त्यांतून ६५००० रुपयांचा माल निघाला होता.

(५) सहकारी पाणीपुरवठासंघ.

१९५९–६० सालीं अशी एक संस्था उक्कलगांव, तालुका श्रीरामपूर, येथें स्थापन होऊन त्यानंतर ६ सोसायटचा निघाल्या आहेत. उक्कलगांव येथें स्थापन झालेल्या संस्थेस सरकारी खर्चानें मॅनेजर नेमण्यांत आलेला आहे. त्याशिवाय या संस्थांना सरकारीरीत्या खालील मदत मिळाली आहे.

तपशील	१९५६–५७ सालीं	१९५७–५८	१९५८–५९	१९५९–६०
कर्ज	–	५९५८	७१५००	२१७५०
मदत	–	–	२४४००	१०८७५

(६) सहकारी साखर कारखानेः–

नगर जिल्ह्यांत एकूण ५ सहकारी साखर कारखाने असून त्यांपैकीं २ कोपरगांव तालुक्यांत, २ श्रीरामपूर तालुक्यांत व १ राहुरी तालुक्यांत आहेत. याशिवाय कोपरगांव तालुक्यांत एक व श्रीगोंदा तालुक्यांत एक याप्रमाणें २ नवीन सहकारी साखर कारखाने काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत. सध्यां चालू असलेल्या पांचहि

कारखान्यांना शेअर भांडवल म्हणून प्रत्येकीं १० लाख रुपये मिळाले असून इंडस्ट्रिअल फायनान्स कॉर्पोरेशनकडून कर्जहि मिळालें आहे. चालूं वर्षी या कारखान्यांतून ९२६८२३ पोतीं साखर तयार झाली. या कारखान्यांची ३०-६-१९५९ अखेरची सांपत्तिक परिस्थिति व इतर बाबींची कल्पना खालील तक्त्यावरून येईल. त्याचबरोबर त्यांचेकडे महाराष्ट्र राज्यांतील इतर ठिकाणच्या सहकारी साखर कारखान्यांबरोबर तुलनात्मक दृष्टीनें पहातां येईल.

(७) इतर प्रक्रिया करणाऱ्या संस्था

शेतकऱ्यांना व सहकारी संस्था सभासदांना गळीताचा फायदा मिळावा म्हणून १९५८–५९ सालीं संगमनेर तालुक्यांत सहकारी तेलगिरणीची स्थापना करण्यांत आली. सरकारनें या गिरणीचे १ लाख रुपयांचे शेअर्स खरेदी केले आहेत. इतकेंच नव्हें तर १९५९–६० सालीं व्यवस्थापकखर्चास आर्थिक मदतहि केली आहे. पहिली व्यवस्थापक समिती ही सरकारनियुक्त असून तिनें आतांपर्यंत जागा व यंत्रसामुग्री खरेदी केली असून लवकरच कामकाजाला सुरुवात करण्यांत येईल.

(१) सहकारी तेलगिरणी

नगर जिल्ह्यांत बराच कापूस पिकत असल्यानें अशा संस्थेची फार आवश्यकता होती. सभासदांना त्यांच्या शेतांतील कापूस पिंजून व गठ्ठे बांधून विकल्यानें अधिक पैसा मिळणार होता. ही गोष्ट जाणून नुकत्याच अशा दोन संस्था स्थापन झाल्या असून त्यांचे कांहीं शेअर्सहि सरकारनें खरेदी केले आहेत. नगर कापूस जिनिंग व प्रेसिग सोसायटी लि. या संस्थेचें सरकारी शेअर भांडवल २०००० रुपयांचें असून शेवगांव जिनिंग व प्रेसिंग सोसायटी लि. या संस्थेचें ५९०७५ रुपयाचें आहे.

(२) सहकारी कापूस जिनिंग व प्रेसिंग सोसायटी.

अकोला तालुका टोमॅटोच्या लागवडीसाठीं प्रसिद्ध आहे. तेव्हां टोमॅटो उत्पादन करणाऱ्या लोकांच्या हितावर नजर ठेवून हा संघ अकोला येथें नुकताच रजिस्टर करण्यांत आला आहे. सरकारनें त्याचे २७६० रुपयांचे शेअर्स खरेदी करून त्यास कार्यप्रवृत्त होण्यास संधि दिली आहे.

(३) फळफळावळ प्रक्रिया व विक्री संघ

(८) सहकारी दूध सोसायट्या

नगर जिल्ह्यांत दूध सोसायट्या काढून सहकारी तत्त्वावर दूधव्यवसाय करण्याच्या कल्पनेला मूर्तस्वरूप येऊन नुकताच नगर येथें एक सहकारी दूधउत्पादक संघ स्थापन करण्यांत येऊन नगर तालुक्यांत दूध पुरवठा करणाऱ्या ५ संलग्न संस्था सुरू करण्यांत आल्या आहेत. अशा रीतीनें १९५९–६० सालीं निघालेल्या ६ दूध संस्थांपैकीं श्रीरामपूर येथील संस्था सोडून इतर सर्व जिल्हा दूधउत्पादक, संघास दूधपुरवठा करतात. या संस्थांनाहि सरकार प्राथमिक यंत्रसामुग्री खरेदी करण्यासाठीं व सेक्रेटरीचा खर्च भागविण्यासाठीं मदत करीत आहे. १९५९–६० सालीं अहमदनगर जिल्ह्याकरितां एक दूध योजना मंजूर झाली असून त्याप्रमाणें दूधउत्पादक संघास कर्ज व मदत देण्यांत आली आहे.

तपशील	१९५७–५८ सालीं	१९५८–५९	१९५९–६०
युनियनला कर्ज	२३१२४	—	११०४८९
युनियनला मदत	७६७५	१६५०	१४९२५६
फीडर सोसायटयांना कर्ज	२५००	—	—
फीडर सोसायट्यांना मदत	६०००	३०००	२४००

सध्यां सोसायटयांमार्फत दूध गोळा करून तें नगर शहरांतील लोकांना पुरविण्यांत येत आहे. त्याच-बरोबर मुंबईच्या आरे मिल्क कॉलनीसहि दुधाचा पुरवठा करण्यांत येतो. दररोज सुमारें २५ मण शुद्ध व सकस दुधाचें वांटप केलें जातें.

(९) हाऊसिंग सोसायटीज्

मागासलेल्या वर्गासाठीं घरें बांधणाऱ्या दोन संस्था नुकत्याच रजिस्टर करण्यांत आल्या आहेत.

पंचवार्षिक योजनांतर्भूत संस्थांव्यतिरिक्त इतर प्रकारच्या सहकारी सोसायटयांचें कामकाजहि व्यव-स्थित चालू आहे. त्यांचा अल्पपरिचय करून देणें उचित ठरेल.

(१) तालुका विकासमंडळें

अहमदनगर जिल्ह्यांतील साऱ्या तालुक्यांत आणि महालांत आतां विकास मंडळें सुरू झालीं आहेत. त्यांचें मुख्य कार्य सुधारलेल्या शेतीच्या पद्धतीचा शेतकऱ्यांमध्यें प्रचार करणें, उत्कृष्ट बीं-बियाणें, खतें, अव-जारें, वगैरे मालाचा पुरवठा शेतकऱ्यांना करणें हें आहे. नवीन सरकारी धोरणा-नुसार तालुका विकास मंडळांचें विलीनीकरण तेथील खरेदी विक्री संघांत करावयाचें आहे. नगर येथील विकास मंडळाचें विलीनीकरण केव्हांच झालें असून नेवासे व पारनेर येथें त्या दिशेनें जोरांत प्रयत्न सुरू आहेत. कोपरगांव तालुका विकास मंडळाच्या वतीनें भरणारें नगर जिल्हा महात्मा गांधी औद्योगिक व शेतकी प्रदर्शन बरेंच लोकप्रिय झालें असून सदर मंडळानें प्रायोगिक शेतीकरितां स्वतंत्र जमीन घेऊन त्यावर शेतकऱ्यांना शेतीचें प्रात्यक्षिक दाख-विण्याचा उपक्रम सुरू केला आहे.

(२) घरें बांधणाऱ्या संस्था

३०–६–६० रोजीं नगर जिल्ह्यामध्यें ३७ घरें बांधणाऱ्या संस्था होत्या. त्यांचें वर्गीकरण खालील-प्रमाणें करतां येईल.

(१) पूरग्रस्त भागांत असणाऱ्या संस्था २१ (२) मागासलेल्या वर्गाकरितां असणाऱ्या संस्था १० व (३) मध्यमवर्गीय लोकांकरितां असणाऱ्या संस्था ६. राहुरी तालुक्यांतील नदीच्या पुरामुळें घरांस मुकलेल्या लोकांसाठीं सरकारनें स्वतंत्र योजना तयार करून तेथें एक सहकारी संस्था स्थापन केली असून ती निराश्रित लोकांसाठीं बांधल्या जाणाऱ्या घरांसाठीं कर्ज व मदत रूपानें पैसा देते. मागासलेल्या वर्गासाठीं आणि मध्यम वर्गीय लोकांसाठीं घरें बांधणाऱ्या सहकारी संस्थांनाहि आर्थिक मदत करण्यांत येत आहे.

(३) नागरी पतपेढ्या व बँका

१९५९–६० सालीं नगर जिल्ह्यामध्यें एक नागरी बँक व ७ नागरी पतपेढ्या नव्यानें रजिस्टर कर-ण्यांत आल्या आहेत. तर जुन्यापैकीं एक नागरी पतपेढी बंद करण्यांत आली आहे. ३०–६–६० रोजीं जिल्ह्यांत एकूण ५४ नागरी पतपेढ्या व ३ नागरी सहकारी बँका होत्या.
नगर जिल्हा अर्बन सेंट्रल को–ऑपरेटिव्ह बँकेप्रमाणेंच कोपरगांव पीपल्स् को–ऑपरेटिव्ह बँकेचें कामकाजहि समाधानकारक रीतीनें चाललें आहे. राहुरी येथें नुकत्याच स्थापन झालेल्या बँकेच्या कामकाजांत नजीकच्या काळांत बरीच वाढ होण्याची शक्यता आहे. राहिलेल्या ५४ नागरी पतपेढ्यांपैकीं ४५ पगारदार नोकरांच्या असून त्यांपैकीं १० साखर कारखान्यांच्या परिसरांतील आहेत.

याखेरीज अहमदनगर जिल्ह्यामध्यें जून १९६० मध्यें ६० सहकारी ग्राहक संस्था होत्या. त्यांपैकीं साखर कारखान्यांतील संस्थांचें कार्य समाधानकारक रीतीनें चालत असून मच्छिमारी सोसायटीला आर्थिक सहाय्य देण्याची सरकारी योजना आहे.

(४) इतर प्रकारच्या संस्था व सुपरवायझिंग युनियन्स

तालुक्यांतील प्राथमिक सहकारी शेतकी सोसायटच्या, विविध कार्यकारी सोसायटच्या व सेवा सोसायटचांच्या कामकाजावर लक्ष ठेवणें, त्यांच्या सेक्रेटरींच्या नेमणुका करणें, याद्या करणें, दप्तरांची तपासणी करणें, वगैरे कामाकरितां प्रत्येक तालुक्यांत एक या प्रमाणें १३ सुपरवायझिंग युनियन्स् आहेत. सरकारी सुपरवायझर्स या युनियन्सला जोडलेले असून तें त्यांचे सेक्रेटरी म्हणून काम करतात.त्याचबरोबर ते सोसायटचांची तपासणी करणें वगैरे कामेंहि करतात. डिस्ट्रिक्ट को–ऑपरेटिव्ह बोर्ड ही संस्था सहकारी शिक्षण देण्याचेंहि कार्य करते. सेक्रेटरीवर्गास तसेंच सहकारविषयक ज्ञान मिळवूं इच्छिणाऱ्या व त्या क्षेत्रांत काम करूं इच्छिणाऱ्या लोकांना शिक्षण देण्यासाठीं को–ऑपरेटिव्ह ट्रेनिंग इन्स्पेक्टर्सकडून स्वतंत्र वर्ग घेतले जातात.

औद्योगिक सोसायटचा

३०–६–१९५९ रोजीं औद्योगिक सोसायटचांची संख्या ८३ होती. त्यानंतर २१ सोसायटचा रजिस्टर होऊन त्यांची संख्या १०४ वर गेली. त्यांचें वर्गीकरण खालीलप्रमाणें आहे.

(अ)	विणकर संस्था	३०
(ब)	जंगल कामगार सोसायटी	१
(क)	कामगार पुरवठा सोसायटचा	२४
(ड)	इतर औद्योगिक सोसायटचा	४९
	एकूण	१०४

(१)	तेलघाण्याच्या सोसायटचा	९
(२)	बांबू सोसायटी	१
(३)	चर्मकार सोसायटचा	१२
(४)	सुतार सोसायटी	१
(५)	धातुकाम सोसायटचा	३
(६)	विटा तयार करणाऱ्या सोसायटचा	५
(७)	शिंपीकाम सोसायटचा	३
(८)	तागकाम सोसायटचा	७
(९)	इतर सोसायटचा	८
	एकूण	४९

उद्योगधन्दे

उद्योगधंद्यांच्या बाबतींत अहमदनगर जिल्हा हा अतिशय प्रगतिपथावर असणारा जिल्हा आहे. फळफळावळ, धान्यें, औषधें, यंत्रें, कापड, वगैरे नित्योपयोगी वस्तूंचे बरेच धंदे जिल्ह्यांत ठिकठिकाणीं सुरूं असून ते व्यवस्थितपणें चालले आहेत.

कारखान्यांच्या बाबतींत तर साऱ्या महाराष्ट्र राज्यामध्यें अहमदनगर जिल्ह्याचा पहिला क्रम लागतो. मुंबई-पुण्याच्या खालोखाल नगर येथेंच कारखाने असलेले आढळतात. १९५७ सालीं राज्यांतील ४५.३ टक्के कारखाने अहमदनगर येथें होते.

गेल्या कांहीं वर्षांत येथील कारखान्यांच्या संख्येंत आणि तेथें काम करणाऱ्या कामगारांच्या संख्येंत कसा फरक पडत गेला हें खालील आंकड्यांवरुन कळून येईल.

वर्ष	कारखाने	कामगारांची सरासरी संख्या
१९५२	४५०	१५०००
१९५६	५०९	१३४११
१९५७	४५३	१३९८३
१९५८	४६०	२४२६५

या ४६० कारखान्यांची तालुकावार वर्गवारी खालीलप्रमाणें करतां येईल.

तालुका	कारखाने	कामगारांची सरासरी संख्या
अहमदनगर	६४	५०१२
पारनेर	—	—
श्रीगोंदा	१	५००
जामखेड	२	५०
कर्जत	—	—
राहुरी	४९	१८९२
नेवासा	९	२८३
पाथर्डी	३	६३
शेवगांव	१५	४२१
अकोला	१२	९४६
श्रीरामपूर	११७	५४४७
कोपरगांव	१२४	५८८४
संगमनेर	६४	५५३
एकूण	४६० —	२५२६५

जिल्ह्यांतील १३ तालुक्यांत एकुण ४६० कारखाने असून त्यापैकीं कोपरगांव १२४ व श्रीरामपूर ११७ येथें जास्तींत जास्त कारखाने असून पारनेर व कर्जत तालुक्यांत एकहि कारखाना नाहीं. जिल्ह्यांतील ६० टक्के कारखाने साखर व गुळाचें उत्पादन करणारे आहेत. साखर कारखाने ११ असून त्यांची विभागणी खालीलप्रमाणें करतां येईल.

कोपरगांव........................ ५
श्रीरामपूर........................ ४
राहुरी........................ १
श्रीगोंदा........................ १

एकूण ११

बहुतेक सारे गूळ कारखाने श्रीरामपूर, कोपरगांव व राहुरी येथें आहेत. कॉटन जिनिंग व प्रेसिंग फॅक्टरींची संख्या ३७ असून त्यांची विभागणी खालीलप्रमाणें करतां येईल.

अहमदनगर........................ ९
राहुरी........................ ३
नेवासा........................ ३
पाथर्डी...... .... ३
शेवगांव........................ १४
श्रीरामपूर........................ ५

एकूण ३७

खालील कारखानें मोठ्या प्रमाणावर सुरू करण्याचे जोरदार प्रयत्न सुरू आहेत.

कारखान्याचें नांव	भांडवल.
सहकारी कापड गिरणी	५० लाख रुपये
सहकारी साखर कारखान्यासाठीं लागणारे सुटे भाग व तेलयंत्रें तयार करण्याचा कारखाना	५० लाख रुपये
सहकारी स्टील रिरोलींग मिल	७ लाख रुपये
दोन सहकारी जिनिंग कारखाने	३ लाख रुपये
सहकारी तेल गिरणी	४ लाख रुपये
सहकारी सुपर फॉस्फेट कारखाना	६४ लाख रुपये
	२५ लाख रुपये
कागद कारखाना	१० लाख रुपये
सहकारी छापखाना	२ लाख रुपये
मेणाचा कारखाना	

आरोग्य

दुसऱ्या पंचवार्षिक योजना काळामध्यें आजारी लोकांना ताबडतोब वैद्यकीय मदत मिळून त्यांच्या रोगांचें निवारण कसें होईल या गोष्टीकडे जसें लक्ष देण्यांत आलें आहे, तसेंच कॉलरा, प्लेग सारख्या सांथीच्या रोगांना तात्काळ आळा घालणें आणि शक्य तों त्या रोगांचा उगमच होऊं न देणें याचीहि खबरदारी घेण्यांत आली आहे. म्हणूनच रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता दिसतांच त्या ठिकाणीं जाऊन रोगप्रतिबंधक लस टोंचण्यांत येते. खेडोपाडीं जाऊन तेथील लोकांना भेटून त्यांना आरोग्यविषयक माहिती दिली जात असल्या-मुळें व रोग होऊं नयेत म्हणून काय खबरदारी घेतली पाहिजे आणि ते झालेच तर त्यांचें निवारण करण्यासाठीं काय केलें पाहिजे हें सांगितलें जात असल्यामुळें गेल्या कांहीं वर्षांत अहमदनगर जिल्ह्यांतील रोगांचें प्रमाण बरेंच कमी झालेलें आपल्याला दिसून येईल.

गेल्या कांहीं वर्षांत कॉलऱ्याच्या केसेस कशा कमी होत गेल्या आणि नंतर शून्यावर येऊन ठेपल्या तें खालील आंकड्यांवरून दिसून येईल.

साल	लागण	मृत्यु
१९५७	५५८	२२०
१९५८	५११	१७८
१९५९	---	---

म्हणजे १९५७ सालीं ज्या कॉलऱ्यानें ५५८ लोक लागण झाले होते आणि त्यांपैकीं २२० लोक मृत्यु-मुखी पडले त्याच कॉलऱ्यानें १९५९ सालीं एकहि लागण होऊं नये ही खरोखरच समाधानाची गोष्ट नाहीं असें कोण म्हणेल ? त्यासाठीं खरोखरच तितकी खबरदारी. घेण्यांत आली होती. १९५७ सालीं कॉलरा प्रति-

बंधक लस १६२४७६ लोकांना, १९५८ सालीं १४८६७५ लोकांना आणि १९५९ सालीं २८५५१०९ लोकांना टोंचण्यांत आली. याचा इष्ट तो परिणाम झाल्यावांचून कसा राहील ?

मलेरियाच्या बाबतींतहि फार दक्षता घेण्यांत आली. पहिल्या पंचवार्षिक योजना काळाप्रमाणेंच दुसऱ्या पंचवार्षिक योजना काळांतहि मलेरिया प्रतिबंधक उपाय योजले जात असून एकूण एक घर वर्षातून दोनवेळां डी. डी. टी. फवाऱ्यानें साफ धुतलें जातें आणि याचा परिणाम म्हणजे १९५९ सालीं अहमदनगर जिल्ह्यामध्यें मलेरियानें एकहि इसम दगावला नाहीं.

देवीच्या बाबतींत मात्र हा प्रकार आढळत नाहीं. १९५८ सालचा लागणांचा आंकडा आदल्या वर्षाच्या तिप्पटीनें वाढला इतकेंच नव्हें तर मृत्यूचें प्रमाणहि चारपट झालें. पण त्यानंतरच्या वर्षी मात्र तें एकदम निम्म्या-वर आलें. खालील आंकडे या गोष्टीची खात्री पटवून देतील.

साल	लागण	मृत्यु	प्रमाण
१९५७	७०४	९२	१२टक्के
१९५८	२३३४	३७४	१६टक्के
१९५९	१२८४	१६३	१२.७टक्के

अहमदनगर जिल्ह्यांतून देवीनें अद्यापि पाय काढलेला नसला तरी येथें बरींच वर्षे आपलें आसन स्थिर करून बसलेल्या प्लेगनें मात्र पळ काढलेला आहे. गेल्या वर्षी प्लेगनें एकहि इसम दगावला नाहीं.

क्षय रोगाच्या बाबतींत जरी असें म्हणतां आलें नाहीं तरी गेल्या कांहीं वर्षांत क्षयी लोकांची संख्या वरीच कमी होत गेली आहे हें निश्चित. प्लेगचें मात्र संपूर्ण निर्मूलन झालें आहे.

क्षय रोगाचेंहि निर्मूलन व्हावें म्हणून १९४५ सालच्या ऑगस्ट महिन्यामध्यें बी. सी. जी. ही क्षय प्रति-बंधक लस टोंचण्याची मोहिम सर्व जिल्हाभर सुरू झाली. त्याचबरोबर क्षय निवारण केंद्रांच्या संख्येंतहि वाढ करण्यांत आली आणि ठिकठिकाणीं क्षयरोग शुश्रूषागृहें उघडून तेथें प्रतिबंधक लस टोंचण्याची सोय कर-ण्यांत आली. अशी सोय सरकारी दवाखान्यांतूनच करण्यांत आली असें नव्हें तर खाजगी दवाखान्यांतूनहि करण्यांत आली.

अहमदनगरनजीक असलेल्या अरणगांव या गावीं एक टी. बी. सॅनिटोरियम असून तें क्षय-रोग्यांना फार उपयोगी पडत आहे. श्री. मो. कुं. फिरोदिया हे या संस्थेला अध्यक्ष म्हणून लाभल्यामुळें तिचें कार्य व्यव-स्थितपणें होत असून तिची वाढहि झपाट्यानें होत आहे. ७०००० चौरस फूट जागेवर २१०००० रु. खर्च करून दवाखान्याच्या इमारती बांधण्यांत आलेल्या असून तेथें ११० रोग्यांची सोय करण्यांत आली आहे. आतांपर्यंत या दवाखान्यांत १६०१ रोग्यांना दाखल करून घेण्यांत येऊन त्यांतले १५१८ बरे होऊन गेले आहेत.

अहमदनगर जिल्ह्यामध्यें उपरिनिर्दिष्ट रोगांप्रमाणेंच महारोगाच्या बाबतींतहि फार दक्षता बाळ-गल्यामुळें या रोगाचें प्रमाणहि फारसें आढळत नाहीं. महारोगानें पछाडलेला रोगी प्रथमावस्थेंत असतांना जर त्याच्यावर औषधोपचार केला तर तो साफ बरा होत असल्याचें दिसून आल्यानें दुसऱ्या पंचवार्षिक

योजना काळामध्यें प्रथमावस्थेंतील महारोग्यांना जास्तींतजास्त वैद्यकीय मदत मिळावी म्हणून महारोग्यांच्या दवाखान्यांच्या संख्येंत बरीच वाढ करण्यांत आली आहे. इतकेंच नव्हें तर खाजगीरीत्या चालविल्या जाणाऱ्या महारोग्यांच्या दवाखान्याला सरकारकडून आर्थिक मदतहि दिली जाते. त्या दृष्टीनें अहमदनगर येथील कळकळीचे कार्यकर्ते डॉ. बोरा यांच्या नेतृत्त्वाखालीं काम करीत असलेल्या अहमदनगर जिल्हा कुष्ठनिवारण समितीचें कार्य भरीव आणि उल्लेखनीय असें आहे.

अशा रीतीनें लोकांच्या उपयोगी पडणाऱ्या बऱ्याच संस्था अहमदनगर जिल्ह्यामध्यें आहेत. अहमदनगर येथील सरकारी दवाखाना, आयुर्वेदिक दवाखाने, बूथ दवाखाना, नगर पालिकेचे दवाखाने यांतूनहि आजारी लोकांना फार मोठ्या प्रमाणांत मदत मिळते. त्या खेरीज जिल्हा लोकल बोर्डानेंहि आपल्या दवाखान्यांच्या संख्येंत वाढ केली असल्यानें जनतेला त्यांचा चांगलाच फायदा मिळतो.

अहमदनगर जिल्ह्यामध्यें हळूंहळूं कां होईना पण दवाखान्यांची वाढ होत आहे. त्याची कल्पना खालील आंकड्यावरून येईल.

साल	दवाखान्यांची संख्या
१९५१	२८
१९५२	२५
१९५३	३४
१९५४	३४
१९५५	३६
१९५७	३८

१९५७ सालीं दवाखान्यांत १६५ खाटांची सोय होती. त्या वेळीं ७००० आंतल्या रोग्यांनीं व ११५००० बाहेरच्या रोग्यांनीं दवाखान्याचा फायदा घेतला. आतां तर या संख्येंत बरीच वाढ झाली आहे.

याशिवाय राहाता, वांबोरी व पिंपळगांव पिसा येथें उघडण्यांत आलेल्या आरोग्य केंद्रांचा फायदा अनुक्रमें १२, १६ व १८ गांवच्या २१३००, २१२१६ व २३५३२ लोकांना मिळत आहे.

याखेरीज एक फिरती दवाखान्याची गाडी सर्व जिल्हाभर हिंडून आजारी लोकांच्या उपयोगी पडत असते. नेहमीं लागणाऱ्या औषधोपचारांनीं युक्त अशा गाडीबरोबर सांथीच्या रोगाविषयींची विशेष माहिती असणारा एक डॉक्टर व एक सॅनिटरी इन्स्पेक्टर रहात असल्यानें त्या फिरत्या दवाखान्याचा खेड्यापाड्यांतील लोकांना फार उपयोग होत आहे. सांथीच्या वेळीं तर फारच. सांथीचे रोग नसतात तेव्हां ही गाडी गांवोगांव हिंडून आजारी माणसांवर औषधोपचार करणें, जंतुनाशक औषधें टाकून विहिरींचें, तलावांचें पिण्याचें पाणी स्वच्छ करणें वगैरे कामें करते.

आरोग्यरक्षणाचा पाया म्हणजे पिण्याचें पाणी स्वच्छ असणें हा होय. हें जाणून नुसत्या शहरांतूनच नव्हे तर खेड्यांतूनहि निर्मळ पाणी पुरविण्याच्या योजना सरकारनें हातीं घेतल्या आहेत. त्यांतल्या कांहीं सरकारीरीत्या होणार असून कांहीं सरकारी मदतीनें नगरपालिका करीत आहेत.

खेड्यापाड्यांतील लोकांनाहि स्वच्छ व निरोगी पाणी प्यावयाला मिळावें म्हणूनहि सरकारनें विविध योजना आंखलेल्या आहेत. त्यांत विहिरी व तलाव यांची संख्या वाढविणें, ते नीट बांधून काढणें व शक्य असेल तेथें नळांतून पाणी आणून तें गांवांत सोडणें इ० गोष्टींचा अंतर्भाव होतो. प्रत्येक खेड्यांत पिण्याच्या पाण्याची आणि व्यवस्थितपणें बांधलेली स्वच्छ अशी एक तरी विहीर असली पाहिजे असें सरकारी धोरण असल्यानें खेड्यांतील पहिली पिण्याच्या पाण्याची विहीर सरकारी खर्चानें बांधण्यांत येते. आणि त्यानंतर बांधल्या जाणाऱ्या पिण्याच्या पाण्याच्या विहिरींच्या खर्चापैकीं चौथाई रक्कम सरकारकडून मिळते. या सवलतीचा फायदा या जिल्ह्यांतील बऱ्याच गांवांनीं घेतला आहे.

पिण्याच्या पाण्याच्या बाबतींत सरकार जसें लक्ष देतें तसेंच गर्भवती स्त्रिया व नवीन जन्माला येणाऱ्या अर्भकांच्या प्रकृतीकडेहि बारीक लक्ष पुरवितें. म्हणूनच ठिकठिकाणीं बालसंगोपन केंद्रें आणि प्रसूतिगृहें उघडण्यांत आलीं आहेत. १९५५ सालीं पारनेर येथें व १९५६ सालीं जामखेड येथें सुरू करण्यांत आलेल्या प्रसूतिगृह व बालसंगोपन केंद्रांचा त्या-त्या भागांतील बाळंतिणींना व अर्भकांना चांगलाच उपयोग होत आहे. पारनेर केंद्राचा, भोंवतालच्या ८ ते १० मैलांच्या परिसरांतील १९२३० लोकवस्ती असलेल्या २३ खेड्यांना व जामखेड केंद्राचा, १९२९५ लोकवस्ती असलेल्या १७ खेड्यांना फायदा मिळतो. या केंद्रांतून बाळंतपणाचें कार्य व शिशु आरोग्य रक्षणाबरोबर रोगप्रतिबंधक उपायांची लोकांना माहिती देऊन त्यांवर औषधोपचारहि केला जातो. येथील परिचारिका व दाई यांना प्रत्येकीं ११ गांवें वांटून देण्यांत आलीं असून त्या वरचेवर त्या गांवांना जाऊन घरोघर हिंडून गर्भवती, बाळंत स्त्रिया व मुलें यांना तपासून वैद्यकीय सल्ला देतात. तसेंच तेथील अशिक्षित सुईणींना बाळंतपणाचें शास्त्रोक्त शिक्षणहि देतात.

या केंद्रांतून दूध व नित्योपयोगी औषधें मोफत वांटण्यांत येतात. त्याचबरोबर या केंद्रांच्या कक्षेंत येणाऱ्या गांवांतील शाळकरी मुलांची तपासणी करून त्यांना जीवनसत्त्वयुक्त गोळ्या व औषधें देण्यांत येतात.

बालकांच्या व मातांच्या उपयोगी पडणारी अहमदनगर येथील शिशुसंगोपन संस्था ही एक प्रमुख संस्था आहे. सुप्रसिद्ध समाज सेवक डॉ. भि. मु. बोरा व मुंबई राज्याचे माजी सभापति श्री. कुं.सो. फिरोदिया यांच्या नेतृत्वाखालीं ही संस्था भरीव असें कार्य करीत आहे.

संस्थेच्या दूध केंद्राचा सुमारें १५० मुलें फायदा घेत आहेत. या संस्थेमधून मुलांना मोफत वैद्यकीय मदतहि मिळत असल्यानें त्याचाहि बरींच मुलें फायदा घेतात. संस्थेच्या क्रीडा केंद्रांत मुलें विविध प्रकारचे खेळ खेळतात. गरीब कुटुंबातील स्त्रियांना प्रसूतिपूर्वी व नंतर आरोग्याच्या बाबतींत मार्गदर्शन मिळावें व नवीन जन्माला आलेल्या मुलाचें उत्तम प्रकारें संगोपन व्हावें म्हणून संस्थेनें घरोघर जाऊन सल्ला देण्यासाठीं व प्रसंगीं बाळंतपणाच्या वेळीं मदत करण्यासाठीं तज्ज्ञ अशा हेल्थ व्हिजिटर बाईची नेमणूक केली आहे. डॉ. बोरा यांनीं चालविलेली त्वचा रोग चिकित्सालय ही आणखी एक लोकोपयोगी संस्था अहमदनगर येथें आहे. वैद्यकीय क्षेत्रांत दिवसेंदिवस झपाट्यानें प्रगति होत असली तरी असाध्य अशा त्वचा रोगांसाठीं अद्याप खात्रीशीर उपाय फारसे आढळत नाहींत. कोड, सोरायसिस्, इसब, अशा रोगांवर हमखास उपचार होऊं शकत नाहीं. त्यावर निरनिराळे प्रयोग चालू आहेत.

त्वचा रोगांमध्यें पांढरा कोड हा आरोग्याच्या दृष्टीनें अपायकारक नसूनहि त्याबद्दल लोकांच्या मनामध्यें अतिशय तिरस्काराची भावना वसत असलेली आढळते. चेहऱ्यावर कोड असलेल्या मुलींचीं लग्नें होणें कठीण होऊन बसतें. तेव्हां वैतागून आत्महत्त्या करणाऱ्या महिलाहि आढळतात. म्हणून या रोगाचें निर्मूलन

करणें हें एक सामाजिक पवित्र कार्य आहे आणि तें डॉ. बोरा गेलीं कित्येक वर्षे करीत आहेत. गेल्या तीन वर्षांत त्यांनीं पांढऱ्या कोडाच्या ५०० च्या वर लोकांवर उपचार केले आहेत आणि बहुतेक साऱ्या लोकांना गुण आला आहे. डॉ. बोरा यांच्याकडे नुसत्या महाराष्ट्र राज्यांतीलच नव्हें तर भारतांतील सर्व भागांतून रोगी येतात; फार काय भारताबाहेरचेहि लोक त्यांच्याकडे औषधोपचारासाठीं येतात.

सर्व प्रकारच्या रोगांचें निर्मूलन करण्याचा प्रयत्न जसा अहमदनगर जिल्ह्यामध्यें होत आहे तसेंच दारूचे दुष्परिणाम लोकांच्या नजरेस आणून त्यामुळें शरीराला धोका असल्याची गोष्ट त्यांना पटवून देऊन दारू पिण्यापासून त्यांना परावृत्त करण्याचे प्रयत्नहि जोरांत सुरू आहेत. त्यासाठीं विविध प्रकारच्या प्रचारी साधनांचा आणि करमणुकीच्या कार्यक्रमांचा उपयोग केला जात आहे. गेल्या वर्षी २७२सार्व जनिक सभा घेण्यांत आल्या. ८५ कला पथकांचे, ३० पोवाड्यांचे, २९३ भजन कीर्तनांचे आणि २०५ संगीतांचे कार्यक्रम झाले. दारूबंदीवरील नाटकांचे ३३ प्रयोग होऊन प्रसिद्धि खात्यामार्फत १९४ चित्रपटदर्शनाचे कार्यक्रम घेण्यांत आले. जिल्ह्यांत ४ ठिकाणीं संस्कार केंद्रें सुरू करण्यांत आलीं असून तीं व्यसनी लोकांना चांगल्या मार्गा-वर आणण्याचे विविध प्रकारें प्रयत्न करीत आहेत. दारूबंदीचें कार्य खेड्यापाड्यांतून अधिक जोरानें व्हावें म्हणून सर्व तालुक्यांच्या गांवीं दारूबंदी समित्या स्थापन करण्यांत आल्या. गट विकास भागांतहि दारूबंदी उपसमित्या स्थापण्यांत आल्या. इतकेंच नव्हें तर दरेक ग्रामपंचायतीमध्यें दारूबंदी उपसमिति स्थापन करण्यांत येऊन तिच्याद्वारें त्या खेड्यांती लदारूला आळा घालण्याचा प्रयत्न करण्यांत आला.

दिनांक ६-४-१९५९ ते १३-४-५९ अखेर दारूबंदी सप्ताह सर्व जिल्हाभर मोठ्या उत्साहानें साजरा करण्यांत आला. प्रभातफेऱ्या काढण्यांत आल्या, सभामिरवणुका घेण्यांत आल्या आणि कलापथक, कीर्तन, भजन, चित्रपटदर्शन वगैरे करमणुकीच्या कार्यक्रमांच्या द्वारें लोकांना दारूच्या दुष्परिणामांची माहिती देण्यांत आली. अहमदनगर, श्रीरामपूर व कोपरगांव येथें जीं नीरा केंद्रें उघडण्यांत आलीं होतीं त्यांचाहि दारूला आळा घालण्याच्या बाबतींत चांगला उपयोग होतो. कांहीं दारूडेही दारु पिण्याचें बंद करून नीरा पिऊं लागल्याचें कळतें. दारुचें निर्मूलन करण्याच्या दृष्टीनें हीं चांगलीं पाऊलें पडताहेत असेंच म्हटलें पाहिजे.

अशारीतीनें अहमदनगर जिल्ह्यांत आरोग्यविषयक भरीव कार्य होत असल्यानें येथील मृत्यूच्या प्रमा-णांत गेल्या कांहीं वर्षांत घट झालेली आढळते. १९५६ सालीं तें हजारीं १४.६ होतें. पुणें विभागाचें सरा-सरी मृत्यूचें प्रमाण जवळजवळ तेवढेंच म्हणजे १४.१ होतें. बालमृत्यूचें प्रमाण मात्र अहमदनगर जिल्ह्याचें पुणें विभागाहून बरेंचसें अधिक होतें. अहमदनगर जिल्ह्याचें बालमृत्यूचें प्रमाण हजारीं ११० होते तर पुणें विभागाचें ९५.

जन्माचें प्रमाण अहमदनगर जिल्ह्याचें व पुणें विभागाचें जवळजवळ सारखें होतें.अहमदनगर जिल्ह्याचें जन्माचें प्रमाण हजारीं ३४.१ होतें तर पुणें विभागाचें ३४.५.

अहमदनगर जिल्ह्यांतील जन्म-मृत्यूच्या प्रमाणाकडे पहातां एक गोष्ट चटकन लक्षांत येण्याजोगी आहे. ती म्हणजे येथील जन्माच्या व मृत्यूच्या प्रमाणांत बरेंच अंतर असल्यामुळें लोकसंख्येत झपाट्यानें वाढ होत आहे. आणि ही गोष्ट योग्य नसल्याचें जाणून वाढत्या लोकसंख्येला आळा घालण्याच्या हेतूनें संतति नियम-नाची जोरदार मोहिम सुरू करण्यांत आली आहे.

अहमदनगर जिल्ह्यांतील कुटुम्ब नियोजनाचें कार्य

३–४ महिन्याच्यां पूर्वीची गोष्ट. अहमदनगर जिल्ह्यांतील भूमिहीन हरिजनांत सरकारी जमिनींचें वांटप व्हावयाचें होतें. त्याविषयींची यादी तयार होऊन पुढील गोष्टींची आंखणी करण्यासाठीं संबंधित मुलकी अधिकाऱ्यानीं कर्जत तालुक्यांतील एका खेडयांत लोकांची सभा बोलाविली असतां फाटक्या-तुटक्या कपडयांतील एक म्हातारा उभा राहिला. आणि आपलें नांव त्या यादींत घालण्याविषयीं दीन वदनानें सांगू लागला. यादी तयार झाली असल्यानें त्यांत बदल करणें शक्य नसल्याचें त्याला फिरफिरून सांगितलें असतांहि तो आपला आग्रह सोडण्यास कांहीं तयार नव्हता. आपल्याला १३ मुलांच्या प्रपंचाचा गाडा हांकावयाचा असल्यानें आपल्याला थोडी कां होईना जमीन मिळायला पाहिजे असा त्याचा दावा होता.

या १३ पोरांच्या निर्धन बापानें तेथील अधिकाऱ्यांचें लक्ष आपल्याकडें वेधून घेतलें. त्यानें त्यांच्या विचारांना चालना दिली. त्यांनीं गांवांत तसेंच आजूबाजूच्या खेडयांत चौकशी केली असतां त्याच्यासारखे बरीच मुलें असलेल्या पोरांचे बाप तेथें बरेच असल्याचें त्यांच्या नजरेला आलें. घर कच्च्याबच्च्या पोरांनीं भरलेलें आहे आणि त्यांना पोटभर खायला नाहीं कीं अंगभर ल्यायला नाहीं तरीही दरवर्षी एका मुलाची भर पडतेच आहे, अशीं दुर्दैवी कुटुंबें गांवोगांव शेंकडयांनी आढळत असल्याचें दिसून आल्यानें त्यावर इलाज म्हणून अधिक धान्योत्पादनाच्या मोहिमेबरोबर अधिक प्रजोत्पादनाला आळा घालण्याचें कार्यहि हातीं घेणें आवश्यक आहे असें कल्पून त्यांनीं संतति नियमन शस्त्रक्रिया शिबिरें घडवून आणलीं. त्यांतील पहिलें शिबिर कर्जत येथें घेतलें. त्या विषयींचा प्रचार आजूबाजूच्या खेडयांत करून शस्त्रक्रिया करून घेणारे लोक अधिकाधिक संख्येनें यावेत म्हणून जवळपासच्या एका खेडयांत एक सभा घेऊन त्यांनीं आपली योजना त्यांच्यापुढें मांडली. शस्त्रक्रिया मोफत आणि तीहि तज्ज्ञ अशा डॉक्टरांच्याकडून केली जाणार असल्याची गोष्ट त्यांनीं त्यांच्या मनावर बिंबविण्याचा प्रयत्न केला.

पण ती गोष्ट लोकांच्या गळीं उतरविणें तितकीशी सोपी गोष्ट नव्हती. परंतु सुदैवानें त्या सभेला गांवांतील एक वजनदार गृहस्थ हजर होते. त्यांनीं वर्षांपूर्वीच ५० रु. खर्च करून संतति प्रतिबंधक शस्त्रक्रिया करून घेतली होती. त्यामुळें त्यांना कुठल्याहि प्रकारचा अपाय न झाल्याचें लोकांना सांगतांच त्यांच्या मनाचा तराजू शस्त्रक्रिया करून घेण्याच्या बाजूला झुकला आणि कांहींनीं तर शस्त्रक्रिया करून घेण्याचें ठरवून फॉर्मस् भरून दिले. त्यांच्या बायकांची संमति मिळतांच ते फॉर्मस् घेऊन अधिकारी इतर गांवीं गेले आणि तेथील लोकांनाहि आपल्या शिबिराची माहिती देऊन कांहींच्याकडून शस्त्रक्रिया करून घेण्यास तयार असल्याचे फॉर्मस् भरून घेतले. अशा रीतीनें १४० फॉर्मस् हातीं पडतांच अहमदनगर येथील प्रसिद्ध शस्त्रक्रिया विशारद, जिल्हा आरोग्याधिकारी व त्यांच्या हाताखालची मंडळी, राज्य कुटुंब नियोजनाधिकारी, गट विकासाधिकारी व स्थानिक कार्यकर्ते यांच्या मदतीनें दिनांक २।५।१९६० रोजीं कर्जत येथें शस्त्रक्रिया शिबिर घेण्यांत आलें.

अधिकाऱ्यांच्याबरोबर लोकांचा उत्साहहि दांडगा होता. संतति प्रतिबंधक शस्त्रक्रियेची कल्पना नवीन असूनहि प्रमाणाबाहेर संतति झाल्यानें किती त्रास सहन करावा लागतो याची लोकांना पुरेपूर जाणीव झाली असल्याकारणानें शस्त्रक्रिया करून घेण्यासाठीं जवळपासचे लोक तर आलेच पण १५–१६ मैलांवरुनहि कांहीं-जण आले. ७ डॉक्टरांनीं पहिल्या दिवशीं ७९ व दुसऱ्या दिवशीं २७ अशा एकूण १०६ पुरुषांवर शस्त्रक्रिया केल्या. १४०लोकांनीं फॉर्म भरून दिले होते तरी प्रत्यक्ष शस्त्रक्रियेकरितां आले १०६ जण ! यावरून बाकीच्या लोकांनीं आपला विचार नंतर बदलला असला पाहिजे. कारण शस्त्रक्रिया करण्यानें अमका अपाय होतो, तमका त्रास होतो म्हणून खोटी भीति घालणारी मंडळी आहेतच कीं समाजांत ! अशाच लोकांच्या सांगण्याला ते बिचारे बळी पडले असले पाहिजेत. तरीहि २ दिवसांत १०६ शस्त्रक्रिया ही कांहीं वाईट सुरुवात

नव्हती. गेल्या वर्षी प्रवरानगर येथें ४–७–१९५९ रोजीं घेण्यांत आलेल्या शिबिरामध्यें ४५ लोक दाखल झाले होते. तर कोपरगांव येथें २७–११–१९५९ व २८–११–१९५९ या दोन दिवशीं घेतलेल्या शिबिरांचा फायदा ७५ लोकांनीं घेतला होता. कर्जत येथील शिबिरांत येऊन यशस्वी शस्त्रक्रिया करून गेलेल्या लोकांची संख्या १०६ वर जातांच उत्तेजित होऊन अधिकारी पुढच्या शिबिराच्या तयारीला लागले.

दुसरें शिबिर नंतर तीनच आठवड्यांनीं कर्जत तालुक्यांतील मिरजगांव गांवीं दिनांक २४–७–६० रोजीं घेण्यांत आलें. त्याचा ८६ पुरुषांनीं फायदा घेतला. त्यांत स्थानिक व कर्जत तालुक्यांतील नजीकच्या गांवांतील लोकांबरोबर श्रीगोंदा तालुक्यांतील घोगरगांव व पिंपळगांव पिसा येथील लोकहि होते आणि विशेष समाधानाची गोष्ट म्हणजे बहुतेक सारेजण शेतकरी होते.

अशा रीतीनें एका महिन्यांत १९१ शस्त्रक्रिया करून कर्जत तालुक्यानें नवा उच्चांक प्रस्थापित केला. आतां सर्वांचें लक्ष येथें चाललेल्या कार्याकडे वळलें.

यानंतर अहमदनगर येथें दिनांक २–८–१९६० व ३–८–१९६० रोजीं दोन शस्त्रक्रिया शिबिरें घेण्यांत आलीं. त्यावेळीं लोकांची अक्षरशः रीघ लागली होती. एकूण २२३ लोकांवर शस्त्रक्रिया करण्यांत आली. त्यांतले ८५ टक्के लोक १०–१५ मैलांवर असलेल्या खेड्यापाड्यांतून आले होते. त्यांच्यांत कांहींजण १०-१०, १२–१२ मुलांचे बाप होते तर एकाला २४ मुलें झालीं होतीं आणि पांचांहून कमी असलेला एकहि नव्हता. तसेंच शस्त्रक्रिया करून घेतलेल्या लोकांत अहमदनगर शहरांतील मंडळी फारच थोडी होती. पांढर-पेशा समाजांतील तर त्याहूनहि कमी.

त्यानंतरचें शिबिर श्रीरामपूर येथें ९–८–१९६० व १०–८–१९६० रोजीं भरून त्याचा फायदा ११० लोकांनीं घेतला. दिनांक २८–८–१९६० व २९–८–१९६० रोजीं भरलेल्या जामखेड येथील शिबिरांत १२९ लोकांवर शस्त्रक्रिया करण्यांत आली. त्या नंतरचें शिबिर पारनेर येथें दिनांक २९–१०–६० रोजीं घेतलें गेलें. त्याचा फायदा १०६ लोकांनीं घेतला. यानंतर दिनांक ६–११–१९६० रोजीं राहुरी येथें, दिनांक १३–११–१९६० रोजीं कोळगांव येथें, दिनांक १८–११–१९६० रोजीं चिंचोडी पाटील येथें आणि २०–११–१९६० व २१–११–१९६० रोजीं कोपरगांव येथें अशीं चार शिबिरें भरलीं आणि तेथें अनुक्रमें ८६, ७६,१९ व १३० लोकांवर शस्त्रक्रिया करण्यांत आल्या. अशा रीतीनें आतांपर्यंत ११९१ लोकांनीं सरकारी-रीत्या मोफत घेण्यांत आलेल्या शस्त्रक्रिया शिबिरांचा फायदा घेतला. येथील अधिकाऱ्यांनीं किमान २००० लोकांवर शस्त्रक्रिया करण्याचा संकल्प केला आहे. म्हणून दिनांक २५–११–१९६० रोजीं टाकळी ढोके-श्वर येथें, दिनांक २७–११–१९६० रोजीं संगमनेर येथें, दिनांक २९–११–१९६० रोजीं अकोला येथें, दिनांक ३०–११–१९६१ रोजीं गोदावरी साखर कारखाना येथें, दिनांक ४–१२–१९६० रोजीं शेवगांव येथें, दिनांक ५–१२–१९६० रोजीं मिरी येथें, दिनांक १८–१२–१९६० रोजीं पाथर्डी येथें व दिनांक २५–१२–१९६० रोजीं नेवासा येथें अशीं ८ शिबिरें घेतलीं जाणार आहेत.

अहमदनगर जिल्ह्यांतील संततिनियमन शिबिराच्या बाबतींतला प्रयोग यशस्वी झाला आहे. इतक्या अल्पावधींत एवढ्या शस्त्रक्रिया इतरत्र क्वचितच झाल्या असतील. अहमदनगर येथें तर दोन दिवसांच्या शिबि-मध्यें २२३ शस्त्रक्रिया करून महाराष्ट्र राज्यामध्यें नवीन उच्चांक प्रस्थापित केला गेला आहे. आणि या वर्षा-अखेर अपेक्षित २००० ची संख्या पुरी होईल यांत मुळींच संदेह नाहीं.

दर वर्षी हजारीं ५ याप्रमाणें संततिप्रतिबंधक शस्त्रक्रिया केल्या गेल्या तर दहा वर्षांच्या शेवटीं लोक-संख्येची वाढ शें. ५० टक्क्यांनीं थांबेल असें तज्ज्ञांचें म्हणणें आहे. या हिशोबानें १४ लाख वस्ती असलेल्या अहमदनगर जिल्ह्यामध्यें वर्षाकाठीं ७००० शस्त्रक्रिया कराव्या लागतील.

समाज कल्याण

आपल्या या खंडप्राय देशामध्यें गरीब, श्रीमंत हा जसा प्रकार आढळतो तसा उच्च नीच हा भेदभावहि दिसून येतो. आपल्या समाजाला अस्पृश्यतेचा कलंक तर फार प्राचीन काळापासून लागलेला आहे आणि सुधारलेल्या व सुसंस्कृत जगापासून दूर रहाणारे आदिवासी, गिरीवासी, वनवासी–ते जसे अशिक्षित आहेत तसेच असंस्कृतहि आहेत आणि ही गोष्ट भारताच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीनें योग्य नसल्याचें जाणून सुधारलेल्या समाजाच्या जोडीला मागासलेल्या वर्गाला आणून बसविणें हें आपल्या सरकारचें धोरण आहे. मागासलेल्या वर्गाची आर्थिक परिस्थिति सुधारावी, शिक्षणाच्या व प्रचाराच्या योगें त्यांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देऊन त्यांना त्यांच्या कर्तव्याची भूमिकाहि समजावून द्यावी आणि त्यायोगें आपल्यांतील सामाजिक विषमता नष्ट पावून आपल्या येथें एकजिनसी समाज निर्माण व्हावा या हेतूनें आपल्या सरकारकडून समाज कल्याणाच्या वेगवेगळ्या योजना आंखण्यांत आल्या आहेत. पहिल्या पंचवार्षिक योजनेंत मागासलेल्या वर्गांतील अज्ञान, अंधश्रद्धा आणि परंपरागत चालत आलेल्या गोष्टींना चिकटून रहाण्याची प्रवृत्ति नष्ट करण्यावर भर देण्यांत आला होता. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्याद्वारें मागासलेल्या वर्गांना जास्तीं तजास्त शैक्षणिक सवलती तर मिळाल्या आहेतच पण त्यांचे उद्योगधंदे किफायतशीर होऊन त्यांची आर्थिक स्थिति सुधारण्यासाठीं त्यांना मदत करण्याची तरतूदहि केली आहे. म्हणून अहमदनगर जिल्ह्यांतील मागासलेल्या वर्गाचा मागासलेपणा नाहींसा करण्यासाठीं त्यांच्यांत शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक सुधारणा घडवून आणण्याचा सर्वतोपरी प्रयत्न केला जात आहे.

शैक्षणिक सुधारणा

माणसें शिकलीं सवरलीं म्हणजे तीं मागें न रहातां पुढें गेलींच समजा. ही गोष्ट जाणून मागासलेल्या वर्गांतील मुलांना जेवढ्या म्हणून शैक्षणिक सवलती देतां येतील तेवढ्या देण्यांत आल्या आहेत. त्यांना शाळा-कॉलेजांत फी तर द्यावी लागत नाहींच पण त्याबरोबर त्यांना पुस्तकें, पाट्या व कपडेहि मोफत पुरविले जातात. त्यांना शिष्यवृत्त्याहि मिळतात. आतांशा मागासलेल्या वर्गाच्या वस्तींत त्यांच्या मुलांसाठीं बाल-वाड्या व प्राथमिक शाळा सुरू करण्यांत आल्या आहेत. त्यांच्यासाठीं सरकारी मदतीवर वसतिगृहेंहि चालविण्यांत येत आहेत.

अहमदनगर जिल्ह्यामध्यें अशीं खालील ४१ वसतिगृहें आहेत.:–(१) बालिकाश्रम, अहमदनगर (२) सर्वोदय कन्या निवास, राजूर (३) संत गाडगे महाराज कन्या छात्रालय, कर्जत (४) संत गाडगे महाराज कन्या छात्रालय, शेवगांव (५) भीम गौतमी विद्यार्थिनी आश्रम, भिंगार (६) नवभारत कन्या निवास, अहमदनगर (७) कन्या छात्रालय, पाथर्डी (८) सर्वोदय विद्यार्थी वसतिगृह, राजूर (९) सर्वोदय विद्यार्थी निवास, कोतूळ (१०) सर्वोदय छात्र निवास, अकोला (११) संत गाडगे महाराज छात्रालय, अहमदनगर (१२) संत गाडगे महाराज छात्रालय, शेवगांव (१३) संत गाडगे महाराज छात्रालय, पाथर्डी (१४) हिंद वसतिगृह, पाथर्डी (१५) सिद्धार्थ बोर्डींग, संगमनेर (१६) सिद्धार्थ बोर्डींग, पारनेर (१७) सिद्धार्थ बोर्डींग, कर्जत (१८) महात्मा फुले वसतिगृह, जामखेड, (१९) डॉ. आंबेडकर बोर्डींग, कोपरगांव (२०) आर्. एस्. एस्. स्टुडंट्स् होस्टेल, कर्जत (२१) नवभारत छात्र निवास, अहमदनगर (२२) अनाथ विद्यार्थी गृह, अहमदनगर (२३) नवभारत छात्र निवास, जामखेड (२४) दलीत छात्रालय, श्रीरामपूर (२५) गिरीजन विद्याश्रम, खिरविरे, तालुका अकोला (२६) जयहिंद वसतिगृह, खरवंडीकासार, तालुका पाथर्डी (२७) नवभारत छात्र निवास, राहुरी (२८) महादजी शिंदे वसतिगृह, श्रीगोंदा (२९) नवभारत छात्र निवास, राजूर , तालुका अकोला (३०) महात्मा विद्यार्थी वसति-

गृह, अहमदनगर (३१) महात्मा गांधी छात्रालय, संगमनेर (३२) सरदार वल्लभभाई छात्रालय, शेवगांव (३३) आदिवासी प्रवरा विद्याश्रम, वारंगुशी, तालुका अकोला (३४) महात्मा फुले छात्रालय, श्रीगोंदा (३५) शेतकरी विद्यार्थी वसतिगृह, कोपरगांव (३६) अमृतवाहिनी विद्यार्थी वसतिगृह, मेहेंदुरी, तालुका अकोला (३७) वाल्मिकी विद्याश्रम, वांबोरी, तालुका राहुरी (३८) विद्यार्थी वसतिगृह आश्वी, तालुका संगमनेर, (३९) ए. ई. सोसायटीची शेतकी शाळा, जामगांव, तालुका पारनेर (४०) श्री. छत्रपति शिवाजी विद्यार्थी वसतिगृह दहिगांवने, तालुका शेवगांव (४१) श्री. एम्. एम्. शिंदे अध्यापन विद्यार्थी वसतिगृह, जामगांव, तालुका पारनेर. यांतील कांहीं स्त्रियांचीं वसतिगृहें असून कांहीं पुरुषांचीं आहेत. येथें विद्यार्थ्यांची रहाण्याची तशीच जेवणाची मोफत सोय होते. आणि ज्या सर्वजातीय वसतिगृहांमध्यें मागासलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो त्यांना इमारतीसाठीं जादा मदत दिली जाते. १९५९–६० सालीं खालील वसतिगृहांची भर पडली आहे.

(१) अमृतवाहिनी विद्यार्थी वसतिगृह, मेहेंदुरी, तालुका अकोला. (२) शेतकी विद्यार्थी वसतिगृह, कोपरगांव (३) महात्मा फुले छात्रालय, श्रीगोंदा (४) आदिवासी विद्याश्रम, वारंगुशी, तालुका अकोला (५) कन्या छात्रालय, पाथर्डी (६) सरदार वल्लभभाई छात्रालय, शेवगांव (७) श्री संत गाडगे महाराज कन्या छात्रालय, कर्जत (८) नवभारत कन्या निवास, अहमदनगर (९) भीम गौतमी विद्यार्थिनी आश्रम, भिंगार (१०) महात्मा गांधी छात्रालय, संगमनेर, (११) वाल्मिकी विद्यार्थी आश्रम, वांबोरी, (१२) श्री छत्रपति शिवाजी विद्यार्थी वसतिगृह, दहिगांव, (१३) ए. ई. सोसायटीचें शेतकी हायस्कूल, जामगण, (१४) विद्यार्थी वसतीगृह, आश्वी.

आर्थिक सुधारणा

मागासलल्या वर्गाची आर्थिक स्थिति सुधारल्याशिवाय त्यांची सामाजिक कुचंबणा होण्याचें थांबणार नाहीं, ही गोष्ट जाणून त्या दिशेनें प्रयत्न करण्यासाठीं खालील योजना आंखण्यांत आल्या आहेत.

शेती

शेती करणाऱ्या मागासलेल्या वर्गांतील लोकांना सरकारनें बऱ्याच सवलती दिल्या आहेत. सरकारी जमिनी वहिवाटीस देते वेळीं प्रथम मागासलेल्या वर्गांतील लोकांना प्राधान्य देण्यांत येतें. म्हणून सरकारी पडीक जमिनीचें वांटप करतेवेळीं त्यांना अग्रहक्क देण्यांत आला इतकेंच नव्हें तर त्यांनीं दिलेल्या जमिनी चांगल्या रीतीनें कसाव्यात आणि त्यायोगें त्यांच्या पोटाचा प्रश्न सुटावा म्हणून त्यांना शेती करण्याच्या बाबतींत इतर मदतहि देण्यांत आली. त्यांना सुधारलेलें बी-बियाणें निम्म्या दरांत पुरविण्यांत आलें. इतकेंच नव्हें तर या पंचवर्षीय योजना काळांत त्यांना शेतीच्या अवजारांचे १० गट, १५ गायी व १२० चांगल्या जातीचीं अंडीं पुरविलीं जाणार आहेत.

सहकार

सहकारी तत्त्वावर लहान मोठे उद्योगधंदे करणाऱ्या मागासलेल्या वर्गांतील लोकांना सरकार सढळ हातानें मदत करतें. याचा फायदा अहमदनगर जिल्ह्यांतील, विशेषतः अकोला तालुक्यांतील मंडळी घेत आहेत. तसेंच हाऊसिंग सोसायटी स्थापन करणाऱ्या संस्थांनाहि सरकार मदत करीत असतें. त्याचाहि त्यांच्याकडून फायदा घेतला जातो. अहमदनगर जिल्ह्यामध्यें १९५६ अखेर मागासलेल्या वर्गांच्या सहा सहकारी सोसायटचा होत्या. त्यापैकीं एका सोसायटीला सरकारकडून १५७५० रु. कर्ज रूपानें देण्यांत आले असून या

संस्थांनीं आपल्या सभासदांसाठीं घरें बाधण्याचा कार्यक्रम हातीं घेतला इतकेंच नव्हें तर तो पुराहि केला. इतर
संस्थाहि जातीनें कामाला लागल्या आहेत.

उद्योगधंदे

मागासलेल्या वर्गातील विद्यार्थ्यांना उद्योगधंद्यांचें शिक्षण देण्याची जशी सोय करण्यांत आली आहे
तशीच त्यांनीं सहकारी संस्था स्थापन करून आपले उद्योगधंदे सुरू केले तर भांडवला अभावीं त्यांचें अडू नये
म्हणून त्यांना तें पुरविण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे. आणि या संधीचा फायदा त्यांच्यातील तरुण
मंडळीं घेत आहेतहि. दुसऱ्या पंचवार्षिक योजना काळामध्यें त्यांना सरकारकडून ८० हजार रुपयांची मदत
मिळणार आहे.

सामाजिक सुधारणा

आपल्या समाजाला लागलेली अस्पृश्यतेची कीड नाहींशी करण्यासाठीं आपल्या सरकारनें कांहीं
कायदे केले आहेत. या कायद्यांचा भंग करणाऱ्यांना शासन करण्यांत येत असल्यानें त्याचा इष्ट तोच परिणाम
होत असलेला दिसतो आहे. तसेंच सरकारनें अस्पृश्यता लौकर नष्ट व्हावी म्हणून कांहीं योजनाहि हातीं
घेतल्या आहेत. अस्पृश्यता निवारणाच्या बाबतींत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या गांवांना बक्षिसें देण्याची योजना
ही त्यांतील एक आहे. पहिलें बक्षिस हजार रुपयांचें असून दुसरें पांचशें रुपयांचें आहे. १९५३–५४, १९५४–
५५ व १९५५–५६ सालीं पहिलें बक्षीस अनुक्रमें कोळगांव, तेलंगशी, वरुडी पठार या गांवांना मिळालें, तर
दुसरें बक्षीस अनुक्रमें कान्हुर, रहाता व करजगांव यांना देण्यांत आलें.

अस्पृश्यता लवकरांत लवकर नष्ट व्हावी म्हणून खेडोपाडीं जाऊन त्याविषयींचा प्रचार करण्यासाठीं
प्रचारकहि नेमलेले आहेत. हे प्रचारक सामुदायिक सहभोजनाचे, मंदिरप्रवेशाचे, पिण्याच्या पाण्याच्या विहिरी
हरिजनांना खुल्या करण्याचे, उपाहारगृहें व केशकर्तनालयांमध्यें हरिजनांना प्रवेश मिळवून देण्याचे इ० कार्य-
क्रम घडवून आणीत असतात. त्यांचें कार्य सुगम व्हावें म्हणून विविध प्रकारच्या करमणुकीचे कार्यक्रमहि ठेवले
जातात. सरकारी प्रसिद्धी खात्यामार्फत चित्रपटहि दाखविले जातात. इतकेंच नव्हें तर कला पथक, पोवाडे,
कीर्तन, नाटक, या सर्व प्रकारांचा अवलंब केला जातो.

तसेंच हरिजनांच्यासाठीं ठिकठिकाणीं बालवाड्या व संस्कार केंद्रें स्थापिलीं जातात. दुसऱ्या पंच-
वार्षिक योजनाकाळांत तीन बालवाड्या व एक संस्कार केंद्र सुरू करण्यांत यावयाचें आहे. त्यासाठीं आपण
होऊन पुढें येणाऱ्या संस्थांना सरकारतर्फे आर्थिक सहाय्य देण्यांत येतें.

कर्मठ स्पृश्यांच्या ताठर धोरणामुळें पिण्याच्या पाण्याच्या बाबतींत हरिजनांचे कांहीं ठिकाणीं हाल
होतांना आढळतात. ही गोष्ट विचारांत घेऊन प्रत्येक खेड्यांत हरिजन वस्तीमध्यें निदान दोन तरी पिण्याच्या
पाण्याच्या विहिरी खोदण्याचें सरकारचें धोरण आहे. तसेंच जुन्या विहिरींच्या दुरुस्तीसाठींहि आर्थिक मदत
करण्यांत येते. अशा रीतीनें दुसऱ्या पंचवार्षिक योजना काळांत सुमारें ४६ नव्या विहिरी बांधल्या जातील.

हरिजनवाड्या म्हटल्या कीं, त्या गांवापासून एका बाजूला असायच्या आणि तेथील रस्ते खराब असा-
यचे हें जवळ जवळ ठरल्यासारखेंच होतें. पण दुसऱ्या पंचवार्षिक योजना काळामध्यें तिकडेहि लक्ष पुरविण्यांत
आलें आहे. हरिजन वस्तींना जोडणारे ४२ मैल लांबीचे रस्ते तयार होत आहेत.

मागासलेल्या वर्गातील लोकांना सरकारी, बिनसरकारी खात्यांतील नोकरीच्या बाबतींतहि बऱ्याच सवलती दिल्या जातात. त्यांच्यासाठीं कांहीं प्रमाणांत जागा राखून ठेवण्यांत येत असून त्यांच्यांतले उमेदवार मिळाले नाहींत तरच त्या इतरांना देण्यांत येतात. मागासलेल्या वर्गातील लोकांना कायद्याची मदतहि मोफत दिली जाते.

समाज कल्याण खात्यामार्फत मागासलेल्या वर्गाच्या उन्नतीकडे जसें लक्ष देण्यांत येतें तसेंच गुन्हेगार लोकांना सुधारण्याच्या आणि स्त्रिया व मुलें यांचा दर्जा वाढविण्याच्या बाबतींतहि पाहण्यांत येतें. हें कार्य करणाऱ्या ज्या सार्वजनिक संस्था असतील त्यांना सरकारकडून आर्थिक मदत मिळते. अशा संस्था अधिकाधिक निघाव्या म्हणूनहि समाज कल्याण खात्यामार्फत प्रयत्न केला जातो.

अहमदनगर जिल्ह्यामध्यें स्त्रिया व मुलें यांच्या विकासाच्या वेगवेगळ्या योजना आंखण्यांत आलेल्या आहेत. त्या राबविण्यासाठीं २० खेड्यांचा एक गट ठरविण्यांत आला असून ३ ते ४ खेड्यांचें एक अशीं उपकेंद्रें केलीं आहेत. त्यांचे कार्य व्यवस्थित व्हावें म्हणून पगारी कार्यकर्त्या स्त्रिया नेमण्यांत आलेल्या आहेत.

श्रीगोंदा तालुक्यांत १९५५ सालींच अशा एका केंद्राची स्थापना करण्यांत आली आहे. तसेंच चिंबळे, मांडवगण, पिसोरे, बनपिंपरी, घोगरगांव या ठिकाणींहि पांच केंद्रें सुरू करण्यांत आलीं असून त्यांच्या कक्षेखालीं २०२९७ लोकवस्तीचीं १६ खेडीं येतात. या केंद्रांतून सकाळीं मुलांना मोफत दूध वांटप, दुपारीं बालसंगोपन, संध्याकाळीं मुलें व महिला यांचे खेळ व करमणुकीचे कार्यक्रम आणि रात्रीं प्रौढ स्त्री-पुरुषांचे शिक्षणवर्ग असा बहुविध कार्यक्रम असतो. शिवाय केंद्रातर्फे आजूबाजूच्या खेड्यांतील लोकांना औषधांची मदतहि देण्यांत येते. केंद्रांत दोन सुशिक्षित दाया व एक स्त्री डॉक्टरबरोबर शिवणकामाची माहिती देणारी एक शिक्षिकाहि आली आहे. तसेंच सहा वर्षांखालील मुलांना माँटेसरी पद्धतीनें शिक्षण देण्याची सोयहि दरेक केंद्रावर करण्यांत आली आहे.

तसेंच अनाथ, उपेक्षित व असहाय्य मुलांसाठीं एक बालवाडी मांडवगण येथें नुकतीच स्थापन करण्यांत आली आहे. त्यासाठीं एक लाख रुपये खर्च करून प्रशस्त अशी एक इमारत बांधण्यांत आली असून १००० माणसें बसूं शकतील एवढें मोठें सभागृह उभारण्यासाठीं सरकारकडून ५०००० रुपयांची मदत मिळणार आहे.

बाल विकासाचें कार्य करण्यासाठीं नगर शहरांत तीन व वाळकी येथें एक अशीं चार बाल कल्याण केंद्रें सुरू करण्यांत आलीं आहेत. तेथील मुलांना दूध, खेळाचें साहित्य व इतर बालोपयोगी वस्तु पुरविल्या जातात.

अहमदनगर जिल्ह्यामध्यें नगर व श्रीरामपूर येथें दोन रिमांड होम्स् असून तेथें बिघडलेल्या, खोडकर व गुन्हेगार मुलांना योग्य तें शिक्षण देऊन त्यांना सुधारण्याचें, चांगले नागरिक बनविण्याचें आणि उद्योगधंद्यांना लावण्याचें कार्य केलें जातें. नगर येथील रिमांड होममध्यें १०० मुलें व मुली आणि श्रीरामपूर येथील रिमांड होममध्यें ५० मुलें आहेत. अनाथ आणि उनाड मुलांना सुधारून, त्यांच्यांतील दुष्ट प्रवृत्ति नाहींशा करून आणि त्यांना चांगलें वळण लावून सज्जन बनविण्यासाठीं मानवी मनोव्यापाराचा सूक्ष्म अभ्यास केलेले त्यांत तज्ज्ञ अधिकारी नेमलेले असून ते आपलें कार्य व्यवस्थितपणें पार पाडीत आहेत.

सर्वोदय योजना

सलग असा एक मागासलेला प्रदेश घेऊन तेथील लोकांचा नुसता सामाजिक व आर्थिक विकासच नव्हे तर त्यांची सर्वांगीण उन्नति घडवून आणण्याच्या हेतूनें सर्वोदय योजना सुरू करण्यांत आली आहे. अधिकांचें अधिक हित साधणें एवढेंच याचें स्वरूप नसून सर्वांचें जास्ती जास्त हित साधणें हें यातमागील तत्व आहे. म्हणूनच ही अतिशय अवघड अशी कामगिरी अनुभवी, क्रियाशील, व आपलें सारें आयुष्य लोक-कल्याणांत खर्चीं घातलेल्या कार्यकर्त्यांवर सोंपविलेली आढळते. अहमदनगर जिल्हा सर्वोदय संचालक, श्री. पाटणकर एक थोर निष्ठावंत कार्यकर्ते आहेत.

सर्वोदयासाठीं अहमदनगर जिल्ह्यांत अकोला तालुक्याचा डोंगराळ व प्रवरा नदीच्या खो-यांतील मागासलेला भाग निवडलेला आहे. या भागांत सर्वोदय योजना सुरू होऊन आतां साडेनऊ वर्षें पूर्ण होत आहेत. या योजनेखालीं एकूण साठ गांवें आहेत. तीं सर्व तालुक्याच्या पश्चिमेकडच्या २०४ चौरस मैलांच्या क्षेत्रांत वसलेलीं आहेत. त्यांची लोकसंख्या ४०,००० असून त्यांत गिरीजन, हरीजन व इतर मागासलेल्या जमाती मोडतात. शैक्षणिक उन्नति, आर्थिक सहाय्य, छोटे उद्योगधंदे, आरोग्य, पाणी पुरवठा, रस्ते, सहकारी चळवळ, आणि मतपरिवर्तन इ. गोष्टींवर योजनेकडून विशेष भर देण्यांत येतो.

राजूर येथें मुख्य केंद्र असून त्याखालीं येणारीं इतर पांच उपकेंद्रें अकोला, शेंडी, गोंडोशी, लाडगांव व शिरपुंजे या ठिकाणीं आहेत. विविध प्रकारचीं कामें करीत असतांनाच तेथील मंडळींच्याकडून गांवांत सहकारी सोसायटच्या स्थापन करणें, अस्पृश्यता न पाळणें, दारूपासून अलिप्त राहाणें, इ. बाबींवर अधिक जोर दिला जातो. त्यामुळें या भागांतील गरीब आदिवासी जनतेची सावकार वर्गाकडून होणारी गांजणूक बंद पडत चाललेली असून त्यांची सामाजिक, आर्थिक, प्रापंचिक व सांस्कृतिक परिस्थितीहि सुधारत आहे.

सन १९५९-६० सालीं ४३६४० रु. अनुदान रूपानें व २०३०० रु. कर्ज रूपानें मंजूर केलेहोते. त्यामधून अनुदानापैकीं ३६१२३ रु. ३८न. पैसे व कर्जापैकीं १८५८३रु. ५५न. पैसे खर्च झाले. या व्यतिरिक्त समाज गृहासाठीं अनुदान म्हणून रु. ४१,७६०-१३ व दारूबंदी सप्ताह साजरा करण्यासाठीं दारूबंदी खात्याकडून

२५० रु. मिळाले आहेत. या दोन्हीहि रकमा त्या त्या कारणासाठीं खर्च करण्यांत आल्या. चालू सालच्या अंदाज पत्रकांत मंजूर असलेल्या सर्व योजनांची पूर्तता झालेली असून त्याविषयींची माहिती खालील प्रमाणें आहे.

शेती विकास

या वर्षी या भागांतील जवळ जवळ ३ हजार एकर जमिनींत जपानी पद्धतीनें भातशेती करण्यांत आली. पुढीलवर्षी यापेक्षांहि जास्त जास्त जमीन या आधुनिक व फायदेशीर पद्धतीनें भातशेतीखालीं आणली जाईल असा अंदाज आहे. पॅडी पायलट योजना या भागांत असल्यानें जपानी भातशेतीच्या योजनेस चालना मिळाली आहे. तसेंच सबंध अकोला तालुक्यास राष्ट्रीय विस्तार योजनाहि लागू झालेली असल्यानें त्या योजनेचाहि उपयोग या कामीं होत आहे.

यावर्षी मुरघास खड्ड्याचें प्रात्यक्षिक करण्यांत आल्यामुळें आसपासच्या खेडचांतील शेतक-यांमध्यें मुरघास खड्डे ठेवल्यापासून होणा-या फायद्यांचा चांगलाच प्रचार झाला. तसेंच कलमें व रोपें खरेदी करण्यासाठीं मूळ किंमतीवर चौथाई रक्कम मदत म्हणून देण्यांत आली आणि अधिक धान्य पिकविणा-या ९ प्रगतिशील अशा शेतक-यांना एकरीं जास्तीत जास्त खरीप व रब्बी पिकें काढलीं म्हणून १५० रु. चीं बक्षिसें वांटण्यांत आलीं.

तसेंच गांवच्या आसपास असलेल्या घाणीची व्यवस्था लागून त्यापासून गांवाला चांगलें खत मिळावें या हेतूनें योजनेंत ६८० रु. खर्च करून मान्होरे, लाडगांव, मवेशी, मुतखेल, बारी, सावरकटे, राजूर, गोंडोशी या आठ गांवीं ४९० कंपोस्ट खड्डे खोदले.

तसेंच शेतांची बांधबंदिस्ती करून ज्या शेतक-यांनी चालू सालीं जमिनी नव्यानें भातशेतीसाठीं उपयोगांत आणल्या अशा २५ शेतक-यांना एकरीं २० रु. प्रमाणें ५६० रु. ची मदत करण्यांत आली आणि शेताला बांधबंदिस्ती करण्यासाठीं ६ शेतक-यांना १८५० रु. चें बिनव्याजी कर्ज देण्यांत आले. यामुळें २० एकर जमिनीची पोत सुधारण्यास मदत होईल.

गोंडोशी, लाडगांव, राजूर, विठेखालील तीन वाडचा, केळूंगण, साकीरवाडी इ. गांवांतील ६३ गरीब शेतक-यांमध्यें कांहींना रोख व कांहींना धान्याच्या स्वरूपांत मिळून रु. ४०३३-५५ न. पै. बी-बियाणें खरेदी साठीं बिनव्याजी कर्ज म्हणून वाटण्यांत आले. त्याचीहि या भागांतील उत्पादन वाढीस मदत झाली आहे.

जनावरांचा दवाखाना.

सन १९५३ पासून सर्वोदय योजनेमार्फत राजूर येथें जनावरांचा एक दवाखाना चालू आहे. त्यामुळें या भागांतील शेतक-यांना नेहमीं भासणारी जनावरांना औषधोपचार करण्याची अडचण दूर झाली आहे. दवाखान्याचे स्टॉकमन हे सरकारी नोकर असून त्यांच्या हाताखालचे अटेंडंट सर्वोदयाचे कार्यकर्ते आहेत. या वर्षीं १७५४ जनावरांवर औषधोपचार करण्यांत आला.

डांगी जनावरांचें प्रदर्शन

डांगी जनावरांच्या पैदाशीला उत्तेजन देण्यासाठीं राजूर येथें प्रत्येक वर्षी डिसेंबर महिन्यांत डांगी गोसेवा-संघ राजूर या संस्थेतर्फे डांगी जनावरांचें प्रदर्शन भरविण्यांत येतें. या वर्षींहि असें प्रदर्शन भरविण्यांत

आलें व त्या प्रदर्शनांतील उत्तम पैदाशीच्या डांगी जनावरांना बक्षिसें देण्यासाठीं म्हणून १५० रु. संघाला मदत करण्यांत आली.

वन-संवर्धन

वनसंवर्धनास उत्तेजन देण्यासाठीं चालू सालीं ज्या ग्रामपंचायतींनीं किंवा संस्थांनीं झाडांची लागवड करून काळजीपूर्वक जोपासना केली अशा ५ ग्राम पंचायतींना व स्थानिक संस्थांना जोपासलेल्या झाडामागें १ रु. प्रमाणें सर्वोदय योजनेकडून ४३० रु. चीं बक्षिसें देण्यांत आलीं.

बालवाडी

सहा वर्षांच्या आंतील मुलांना योग्य वळण लागावें व लहानपणापासून त्यांच्यांत शिक्षणाची गोडी निर्माण व्हावी म्हणून राजूर येथें १९५४ पासून तज्ज्ञ अशा शिक्षिकेच्या देखरेखीखालीं बालवाडी चालविण्यांत येत आहे. या बालवाडींत चालू सालीं ३३ मुलें होतीं. मुलांना दररोज योजनेकडून नास्ता दिला जातो. तसेंच छंद म्हणून त्यांना मातीकाम, कागदकाम, कातरकाम, इ० उद्योग शिकविले जातात. या वर्षीं मुलांकडून २५० हातकागद करून घेण्यांत आले.

वसतिगृहें

सर्वोदयप्रेरित अशी सत्यनिकेतन नांवाची विधायक कार्य करणारी एक संस्था राजूर येथें असून तिच्या मार्फत कोतूळ, अकोला व राजूर येथील पांच वसतिगृहें आदिवासी व मागासलेल्या वर्गांतील मुलांच्यासाठीं चालू आहेत. मुलांच्या वर्तणुकीकडे व अभ्यासाकडे वैयक्तिक लक्ष पुरविण्यांत येतें. तसेंच वस्त्रस्वावलंबनासाठीं त्यांना सूतकताईचें शिक्षणहि दिलें जातें. या वर्षीं या वसतिगृहांतील मुलांची संख्या खालीं नमूद केल्याप्रमाणें होती.

(१)	सर्वोदय छात्रनिवास, कोतूळ	३९
(२)	” ” अकोला	६७
(३)	नवभारत छात्रालय, राजूर	७५
(४)	सर्वोदय वसतिगृह, राजूर	५१
(५)	” कन्या निवास ”	२५
		२५७

या वसतिगृहांना चालू वर्षीं योजनेमार्फत २६०० रु. ची मदत देण्यांत आली. नवभारत छात्रालय, राजूर या इंग्रजी शाळेंतील मुलांच्या वसतिगृहाला ४५ मुलांची सरकारी परवानगी असतांहि कोणत्याहि गरीब व अनाथ मुलाचें शैक्षणिक दृष्टचा नुकसान होऊं नये म्हणून ८० मुलांना वसतिगृहांत प्रवेश देण्यांत आला आणि त्यामुळें सत्यनिकेतनला ७,४१६–९८ रुपयांचा तोटा सहन करावा लागला.

सर्वोदय योजना

१९५९–६० वर्षअखेर प्रगतीचा आढावा

१	शिक्षण–	बालवाडी	मुलें	बसतिगृहें	विद्यार्थी
		१	३३	६	२७२
२	शेती–	जपानी पद्धत	कंपोस्ट खड्डे	शेतकऱ्यांना कर्ज	
		३००० एकर	४९०	रु. ६४४३.५५ न. पै.	
३	गुरांचे दवाखाने–	दवाखाना	औषधोपचार केलेली गुरें		
		१	१७५४		
४	वन–	वन संवर्धनाचीं बक्षिसें			
		रु. ४३०			
५	ग्रामोद्योग–	अंबर चरखा परिश्रमालय	खर्च	चरख्यांसाठीं मदत	
		१	रु. ४०५.५० न. पै.	रु. ३०००	
६	सहकार–	सोसायट्या	सभासद		
		८	१८२		
७	आरोग्य–	दवाखाने	रोग्यांवर उपचार	ग्राम सफाई शिबीर	
		१	९०९५	१	
८	सांस्कृतिक कार्य–	कलापथकें इ०	सहाय्य रु.	वाचनालयें	पुस्तकें.
		३	२२०	१	१६२६
९	दळणवळण–	बांधलेले रस्ते.	खर्च रु.		
		२	४५००		
१०	दुग्ध व्यवसाय–	दूध केंद्रें	दूध वांटप		
		२	शेर. ३२		

ड्राय होस्टेल.

अकोला येथें एक ड्राय होस्टेल चालू आहे. अकोल्याच्या आसपासच्या गांवीं रहाणारीं गरीब मुलें घरून जेवण घेऊन येतात आणि या वसतिगृहांत राहून अभ्यास करतात. चालू सालीं अशीं पंधरा मुलें असून त्यांच्या वागणुकीवर व अभ्यासावर वसतिगृहांतील सुपरिंटेंडेंटची वैयक्तिक देखरेख असते.

समाज शिक्षण

वलठण येथें एक प्रौढ शिक्षणाचा वर्ग चालू करण्यांत आला असून त्यांत एकूण ३० प्रौढ होते आणि त्यांच्यापैकीं २२ जण साक्षर झाले आहेत. तसेंच लोकांना वाचनाची गोडी लागावी म्हणून आणि त्याच बरोबर चालू घडामोडींची माहिती होऊन विविध विषयांचें ज्ञान मिळावें म्हणून केंद्रानें कांहीं नियतकालिकें सुरू केलीं असून तीं गांवोगांव नियमितपणें वांटण्यांत येतात.

तरुणांत कुस्तीची आवड उत्पन्न व्हावी म्हणून कुस्तीगिरांना योजनेकडून दर वर्षी उत्तेजन देण्यांत येतें आणि दर वर्षी गांवोगांव निरनिराळ्या यात्रेच्या वेळीं होणा-या कुस्त्यांना बक्षिसें वांटण्यांत येतात. चालू सालीं मवेशी पेनशेत, वांजूळशे, रंधा, शेणीत, लाडगांव, राजूर आदि गांवांत २१७-६६ रु. त्यासाठीं खर्च करण्यांत आले.

तसेंच खालील सहा गांवांतील शाळांना शिक्षणोपयोगी साहित्य खरेदी करण्यासाठीं खालील प्रमाणें १६०० रु. मदत देण्यांत आली.

क्रमांक	शाळेचें नांव	मदत रक्कम.
१	जीवन शिक्षण मंदीर, राजूर, (मुलांचें)	रु. २००
२	,, ,, ,, (मुलींचे)	रु. ६६
३	,, ,, अकोले	रु. ४०
४	,, ,, रांभोडी	रु. १००
५	मॉडर्न हायस्कूल ,अकोला	रु. ४००
६	सर्वोदय विद्या मंदिर, राजूर	७९४
		१६००

ग्रामोद्योग व जोडधंदे.

या वर्षी राजूर येथें एक अंबर चरखा परिश्रमालय एप्रिलपासून ते जून अखेर चालविण्यांत आलें. त्यांत एकूण १४ स्त्रिया शिक्षण घेत होत्या. शिक्षण काळांत प्रत्येक स्त्रीला रोज ५० न. पैसेप्रमाणें मजुरी देण्यांत आली आणि त्यानंतर हे अंबर चरखे घरोघर चालू रहावेत म्हणून शिक्षण घेतलेल्या स्त्रियांत ते वांटण्यांत आले. यासाठीं योजनेला रु. ४०५-५० न. पै. खर्च आला.

तसेंच चालू सालीं सर्वोदय योजना भागांतील ९ विद्यार्थ्यांना हातकागद धंद्याचें शिक्षण घेण्यासाठीं प्रत्येकीं २० रुपये प्रमाणें शिष्यवृत्त्या देण्यांत आल्या. तसेंच सुधारलेल्या कोंबड्यांच्या प्रचारासाठीं सुधार-लेल्या कोंबड्यांच्या मूळ किंमतीवर ५ लोकांना निम्मी रक्कम म्हणजे रु. १५०-५० न. पै. मदत म्हणून देण्यांत आली. त्याचप्रमाणें अंबर चरखे खरेदी करण्यासाठीं ५ वसतिगृहांना ३००० रु. ची मदत देण्यांत आली.

सर्वोदय औद्योगिक सहकारी मंडळ.

या भागांतील लोकांना हातकागद निर्मितीचा उद्योग मिळावा म्हणून सर्वोदय औद्योगिक सहकारी मंडळ लि. राजूर या नांवाची नवीन सहकारी संस्था उभी करण्यांत आली. या बाबतींत सर्वोदय योजनेनें चालू सालीं बरेच श्रम घेतले. ही संस्था रजिस्टर झाल्यावर योजनेनें तिला १००० रु. ची मदत व १५००रु. भांडवल वाढीस मदत म्हणून बिनव्याजी कर्ज दिलें.

डेअरी विकास व वैयक्तिक धंदे करणा-यांना मदत.

दुभतीं जनावरें विकत घेऊन त्यांची वाढ करण्यासाठीं तसेंच वैयक्तिक कारागिरांना भांडवल देऊन लोहारकी, सुतारकी, चांभारकी, वांबूकाम, इ. लहान लहान धंद्यांत त्यांना उत्तम प्रगति करतां यावी म्हणून १३ धंदेवाईक इसमांना चालू वर्षी योजनेकडून २९००रु. चें बिनव्याजी कर्ज देण्यांत आलें.

आरोग्य अणि सफाई.

राजूर येथें एक दवाखाना चालविला जात असून डॉक्टरांचा पगार सर्वोदय योजनेकडून दिला जातो. तर लागणा-या औषधाचा खर्च सत्यनिकेतन या संस्थेकडून सोसला जातो. या वर्षी या दवाखान्याचा फायदा ९०९५ रोग्यांनीं घेतला. शिवाय या दवाखान्याचे डॉक्टर दर रविवारीं शेंडीला जाऊन, तेथें औषधोपचार करीत असतात. याखेरीज आसपासच्या गांवांना भेटी देऊन तेथील स्त्रीपुरुषांना आरोग्याची व कुटुंब नियोजनाची माहिती देणें, बालवाडी व वसतिगृहें यांना भेटी देऊन तेथील मुलांमुलींच्या आरोग्याची तपासणी करणें इ. कामें डॉक्टरांच्याकडून नेहमीं केलीं जातात.

माता अणि मुलें सप्ताह.

दिनांक १६ नोव्हेंबर १९५९ रोजीं सर्वोदय केंद्रामार्फत माता आणि मुलें सप्ताह कोतूळ, गोंदोशी, राजूर येथें साजरा करण्यांत आला. लहान मुलांमध्यें आरोग्य स्पर्धा ठेवण्यांत येऊन पहिल्या तीन मुलांना बक्षिसें देण्यांत आलीं.

सफाई.


चालू सालीं विहिरीचें पाणी साफ करण्यासाठीं योजनेनें २८० पौंड टी. सी. एल. ही पावडर खरेदी करून क्षेत्रांतील जरुरीच्या गांवीं विहिरींत टाकण्यासाठीं विनामूल्य वांटली.

ग्रामसफाई शिबिर.

यावर्षीं इन्दोरी या गांवीं दिनांक १३–१२–५९ ते १९–१२–५९ अखेर सात दिवसांचें ग्रामसफाई शिबीर घेण्यांत आलें होतें, आणि त्या काळांत त्या गांवीं एक पक्का गोपुरी संडास, दोन आदर्श गोठे, १३ स्नान गृहें, ३४ स्नानासाठीं चौकड्या, ९ आडसफाई, २० भांडीं घासण्याच्या जागा, १३ बालशौचगृहें, १२ तुळशी-वृंदावनें, ११ तोंड धुण्याच्या जागा, १५ सफाईपात्रें, ८ चरांचे संडास, ५ गादकुंड्या, २ पाणी जाण्याचीं गटारें, ८ कच्च्या मुताऱ्या, एक थुंकदाणी, २१ मगन चुली, १२ कंपोस्ट खड्डे आणि २६ शौचखड्डे वगैरे सफाईचीं कामें करण्यांत आलीं. शिबीराचा एकूण खर्च रु. ९३८.४९ झाला.

तसेंच या वर्षीं कोतूळ येथें ३९ मुलांच्या वसतिगृहासाठीं व प्रात्यक्षिक म्हणून तीन पक्के गोपुरी संडास मुलांच्या श्रमदानानें बांधण्यांत आले. सामान व कारागीर मजुरी यांवर रु.४९४-७५ न.पै. खर्च करावा लागला.

दळणवळणाची सोय


मनमाडकडे
निफाडकडे
कोपरगांव
नाशिककडे
श्रीरामपूर
औरंगाबादकडे
अकोला
संगमनेर
नेवासा
राहुरी
पैठणकडे
शेवगांव
जुन्नरकडे
पुण्याकडे
पाथर्डी
पारनेर
अहमदनगर
शिरुरकडे
बीडकडे
जिल्ह्याचें मुख्य ठिकाण
तालुक्याचें मुख्य ठिकाण
तालुक्याच्या सरहद्दी
राष्ट्रीय मार्ग
मोटार रस्ते
रेल्वेमार्ग
श्रीगोंदे
जामखेड
कर्जत
दौंडकडे
करमाळ्याकडे

वळणवळण.

राजूर तोलारखिंडीला मिळणाऱ्या जोडरस्त्याचें काम मवेशी येथील लोकांनीं श्रमदानानें पुरें केलें. या रस्त्याची लांबी ६५६० फूट असून रुंदी २० फूट आहे. बाजूला २–२ फूट रुंदीचीं गटारें आहेत. हें काम ३००० रु. चें झालें असून त्यावर सर्वोदय योजनेची १५०० रु. ची रक्कम खर्ची पडली आहे. मवेशी गांवाला आजपावेतों बैलगाडी व इतर वाहनें जाण्याची सोय नव्हती. गांवांतील सामानाची ने-आण डोक्यावरून किंवा गाढवांवरून करावी लागे. पण आतां हा जोडरस्ता तयार झाल्यानें लोकांची फार मोठी सोय झाली असून त्यांना आपला माल गाडी वगैरे वाहनांतून नेतां येऊं लागला आहे.

याच वर्षी विठे गांवच्या तीन वाड्यांसाठीं दुसरा एक जोडरस्ता तयार करण्यांत आला. निरगुडवाडी, मोचीवाडी, व भोंदरवाडी या तिन्हीहि वाडींतील लोकांनीं श्रमदानानें ९५४० फूट लांब, २० फूट रुंद असा रस्ता तयार केला आहे. बाजूला दोन दोन फूट लांबीचीं गटारें आहेत. या रस्त्यासाठीं सर्वोदय योजनेनें १५०० रु. ची मदत दिली. हा रस्ता जेव्हां पूर्ण होईल तेव्हां अकोला राजूर वाहतुकीचा एक जवळचा मार्ग म्हणून याचें महत्त्व वाढेल.

बी–बियाणें सांठा.

बी–बियाणें व धान्यसांठे करण्यासाठीं चालू सालीं साम्रद धान्य बॅन्केस सांठवणाचीं साधनें घेण्यासाठीं रु. २००, गोंडोशी धान्य कोठारास रु. २०० व भोंदरवाडीस रु. ९२.२५ अशा रकमा मदत म्हणून देण्यांत आल्या.

दूध केंद्रें.

या वर्षी राजूर येथें लहान मुलांसाठीं दोन दूध केंद्रे सुरू करण्यांत आलीं आहेत. त्यांतलें एक हरिजन वस्तींत असून दुसरें गांवांत मध्यवस्तींत आहे. हरिजन वस्तीतील दूध केंद्रांत दररोज ३५ मुलें दूध घेण्यास येतात. तर गांवांतील केंद्रांत ९०. या केंद्रांसाठीं दररोज ३१–३२ शेर दूध लागतें.

कलापथकें, व भजनी मंडळें.

या वर्षी वारी कलापथकास रु. ७०, शेंडी येथील भजनीमंडळास रु. ७० व पिंपरकणे येथील नाटच मंडळास रु. ८० याप्रमाणें मदतीदाखल रकमा देण्यांत आल्या .

वाचनालयें.

सर्वोदय योजनेमार्फत राजूर येथें एक वाचनालय व पुस्तकालय चालूं असून त्यांचा उपयोग तेथील वसतिगृहांतील विद्यार्थी, सत्यनिकेतन व सर्वोदय कार्यकर्ते, औद्योगिक शिक्षणाकरितां आलेले विद्यार्थी, आणि राजूर व जवळपासच्या गांवांतील लोक करीत असतात. वाचनालयांत मराठी, हिंदी अशीं एकूण १६२६ पुस्तकें आहेत.

राजूर गांवापासून दूर असलेल्या खेडेगांवांनाहि वाचनाचा लाभ मिळावा म्हणून चालूं सालीं प्रत्येक उपकेंद्राच्या ठिकाणीं फिरतें पुस्तकालय सुरू करण्यांत आलें आहे. या फिरत्या पुस्तकालयांत एकूण २३२ पुस्तकें असून दरेक उपकेंद्राच्या ठिकाणीं ५८ पुस्तकांची एक पेटी ठेवलेली आहे. जरुरीप्रमाणें उपकेंद्रांतील पेट्या एका केंद्रातून दुसऱ्या केंद्राच्या ठिकाणीं हलविण्यांत येतात.

कार्यकर्ता प्रशिक्षण.

श्री. के. म. देशमुख, श्री. सु. गं. शाळिग्राम व श्री. ग. शं. जगदाळे या तिन्हीं कार्यकर्त्यांना यावर्षीं कोस-बाड येथील सर्वोदय कार्यकर्त्यांच्या चार महिन्यांच्या शिक्षण वर्गाला पाठविलें. ते प्रशिक्षित होऊन आले आहेत. केंद्राचे हिशोबनीस श्री. वैद्य यांनाहि यावर्षीं तीन महिन्यांच्या अकौंटंटच्या कोर्ससाठीं मुंबई व पुणें येथें पाठविलें होतें. ते पहिल्या श्रेणींत उत्तीर्ण झाले. तसेंच कोसबाड येथील महात्मा गांधी आदिवासी जनता विद्यालयांत एक वर्ष मुदतीचें शेतकी शिक्षण घेण्यासाठीं या भागांतील पांच आदिवासी विद्यार्थ्यांना सर्वोदय योजनेमार्फत पाठविण्यांत आलें होतें.

सत्यनिकेतन संस्था.

सत्यनिकेतन ही संस्था सर्वोदयप्रेरित असून ती या भागांत सन १९५२ पासून विधायक कार्य करीत आहे. तिच्यातर्फें राजूर येथें साबण, तेलघाणी, हातसड तांदूळ, हातकागद इ० ग्रामोद्योग चालत असून त्यांत ६० ते ६५ लोक काम करीत आहेत. आदिवासी व मागासलेल्या वर्गांतील मुलामुलींचीं पांच वसतिगृहें चालविण्याची आर्थिक जबाबदारी या संस्थेनें शिरावर घेतली आहे. तसेंच तिनें राजूर येथें हायस्कूल, व त्याला जोडून नवभारत नांवाचें ८० मुलांचें वसतिगृह चालविलें आहे.

सहकारी सोसायट्या.

(१) यावर्षीं सर्वोदय सत्यनिकेतन स्टाफ को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि., राजूर ही संस्था सर्वोदय योजनेच्या प्रेरणेमुळें स्थापन करण्यांत आली आहे. तिच्या सभासदांची संख्या ४२ असून तिचें शेअर भांडवल १२६० आहे. सेवकवर्गाला भासणाऱ्या किरकोळ स्वरूपाच्या आर्थिक गरजा दूर करण्यास या सोसाय-टीचा फार उपयोग होतो.

(२) सर्वोदय औद्योगिक सहकारी मंडळ लि., राजूर ही एक दुसरी सोसायटी सर्वोदय योजने मार्फत चालू सालीं स्थापन करण्यांत आली आहे.

(३) अकोले राजूर जंगल विभाग कामगार सहकारी संघ लि., राजूर या संस्थेचे १४० सभासद असून तिचें शेअर भांडवल १५२० रु. चें आहे. १९५९–६० सालीं संघानें उडदावणे येथील एक व पेणशेत येथील एक अशीं दोन कुपें कोळसा करण्यासाठीं घेतलीं होतीं. उडदावणे येथील कुपांत २४५१ मण व पेणशेत येथील कुपांत २४१७ मण कोळसा तयार करण्यांत आला. जंगलांतील कामें अपुरीं असल्यानें ही संस्था सार्वजनिक बांधकाम खात्याकडून खडीचें काम, मुरुमाचें काम, इमारतीचें बांधकाम अशा प्रकारचीं कामें करवून घेत असते. तसेंच वनांतील कडु निंबाचा पाला गोळा करण्याचें कामहि सोसायटीचे सभासद करीत असतात.

(४) साम्रद सहकारी धान्य सोसायटी लि., साम्रद. साम्रद हें गांव डोंगरांत वसलेलें आहे. तेथील आदिवासी लोकांची आर्थिक परिस्थिती अतिशय बिकट असल्यानें पावसाळ्यांत धान्य विकत घेण्याची त्यांच्यांत ऐपत नसते. त्यामुळें कर्ज काढण्याची प्रवृत्ति फार आढळते. त्यावर उपाय म्हणून तेथील लोकांनी ही सोसायटी काढली आहे. हिच्यामार्फत यावर्षीं १२५० रु. नागली सभासदांना वांटण्यांत आली.

(५) मुतखेल मजूर सहकारी संघ लि., मुतखेल. मुतखेल भागांतील लोकांचा हिरडा गोळा करणें,हा एक प्रमुख व्यवसाय आहे. पण हा वर्ग गरीब असल्यानें तेथील व्यापारीवर्ग हिरडचाच्या पोत्यावर कर्ज देऊन त्यांना पिळून काढीत असे. ही परिस्थिती लक्षांत घेऊन सर्वोदय कार्यकर्त्यांनीं हा संघ काढला. चालू सालीं या संघानें ३७०० रु. चा हिरडा विकला.

याखेरीज प्रवरा को–ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि., शेंडी, विविध कार्यकारी सहकारी सोसायटी लि., गोंडोशी व तेल उत्पादक ग्रामोद्योग सहकारी संघ लि., राजूर याहि संस्था व्यवस्थितपणें काम करीत आहेत.

लोकसंस्थांचा कारभार

ग्रामपंचायती

आपला देश खेडेप्रधान देश असल्यानें त्याचा सर्वांगीण विकास व्हायचा असेल तर आपलीं खेडीं सुधारलीं पाहिजेत आणि तेथील लोकांना समाजसेवेच्या कार्यक्रमांत भाग घेण्यास उद्युक्त केलें पाहिजे; तरच ग्रामीण विकासाच्या कार्यक्रमाला चालना मिळेल ही गोष्ट जाणून सर्व गांवीं ग्रामपंचयाती स्थापण्याचें सरकारनें ठरविले. आणि ही गोष्ट आपल्या महाराष्ट्र राज्यांत सोलापूरबरोबर प्रथम जर का कोणत्या जिल्ह्यानें प्रत्यक्षांत उतरविली असेल तर ती अहमदनगरनें. १९५८–५९ सालींच नगरपालिका येणारीं चार गांवें वगळतां जिल्ह्यांतील सर्व गांवीं ग्रामपंचायती स्थापन झालेल्या आहेत.

अहमदनगर जिल्ह्यांत एकूण ७६४ ग्रामपंचायती असून त्यांपैकीं ७२४ प्रत्येक गांवाच्या अशा स्वतंत्र आहेत; तर ३४० लहानलहान खेड्यांनीं एकत्रित येऊन बनविलेल्या आहेत. या ग्रामपंचायतींच्या संख्येत गेल्या दहा वर्षांत कशी वाढ झाली तें खालील आंकड्यावरुन कळून येईल.

साल	ग्रामपंचायतींची संख्या
१९५१–५२	१५४
१९५२–५३	२२७
१९५३–५४	२२९
१९५४–५५	२३२
१९५५–५६	४४१
१९५७–५८	७५८
१९५८–५९	७६४

ग्रामपंचायतींना आपल्या जबाबदाऱ्या व्यवस्थितपणें पार पाडतां याव्यात म्हणून त्यांच्या क्षेत्रांतील शेतसाऱ्याच्या ३० टक्के इतकी रक्कम सरकारकडून मदतीदाखल देण्यांत येते. शिवाय आदिवासी आणि मागासलेल्या भागांतील ग्रामपंचायतींना जादा मदत दिली जाते. अशा रीतीनें १९५९–६० सालीं सरकारकडून अहमदनगर जिल्ह्यांतील ग्रामपंचायतींना ३४७५० रु. ग्रॅन्ट मिळाली आहे. याशिवाय पंचायतींना घर-

पट्टी, आरोग्यकर, लग्न, दत्तक वगैरे समारंभावरील कर, दुकानें, हॉटेल्स्, गिरण्यांवरील कर, जकात, बाजार कर, यात्रा कर, करमणूक कर इ० स्थानिक कर बसवून आपलें उत्पन्न वाढविण्याची मुभा असल्यानें या जिल्ह्यांतील ग्रामपंचायती त्या बाजूनेंहि आपलें उत्पन्न वाढवून आपल्या गांवाचा विकास करण्याचा प्रयत्न करत आहेत.

सन १९५८ च्या ग्रामपंचायत कायद्याप्रमाणें दिनांक १–६–१९५९ पासून ग्रामपंचायतीचे चिटणीस सरकारी नोकर झाले आहेत. सरकारनें तलाठी कम् चिटणीस हीं नवीन श्रेणी निर्माण केली आहे. तलाठी व ग्रामपंचायत चिटणीस या दोन्हीहि भूमिका यापुढें एकाच माणसाला वठवायच्या आहेत. चिटणीसांना तलाठ्याच्या कामाचें शिक्षण व तलाठ्यांना चिटणीसाच्या कामाची माहिती देण्यासाठीं गौरगांव येथें जो वर्ग सुरूं करण्यांत आलेला आहे, त्याचा फायदा अहमदनगर जिल्हा पूर्णपणें घेत असून येथून दर खेपेला ५० लोकांची तुकडी आपला अभ्यासक्रम पुरा करण्यासाठीं गौरगांवला जाते. तेथील शिक्षणक्रम पुरा करून १०० तलाठी व १०० चिटणीस अहमदनगर जिल्ह्यांत परत आले आहेत. .

सन १९५८–५९ सालापासून सरकार, पंचायतीचे सरपंच व सभासद यांना ग्रामपंचायतीचा कारभार, पंचायतीचा हिशोब, पंचायत कायद्याची ओळख, पंचायतीनें विकास योजनेंत करावयाचीं कामें, पंचायतीनें आपला गांव आदर्श गांव बनविण्यासाठीं करावयाच्या गोष्टी वगैरे विविध प्रकारची माहिती देण्यासाठीं वर्षातून एकदां तालुकावार शिबीर घेते. त्यामुळें सरपंच व सभासद यांना ग्राम पंचायत कारभाराची माहिती मिळून तो हांकतेवेळीं येणाऱ्या अडचणी दूर करण्याच्या बावतींतहि मार्गदर्शन मिळतें. शिवाय तज्ज्ञ मंडळींच्याकडून इतर संबंधित विषयांवर माहिती मिळते.

ग्रामपंचायतींनीं आपल्या पंचायतींचा कारभार व्यवस्थित हांकावा आणि आपल्या गांवांचा विकास करण्याच्या बावतींत झटून प्रयत्न करावा या हेतूनें सरकारनें नुकत्याच पंचायतस्पर्धा सुरूं केलेल्या आहेत. तालुक्याच्या, जिल्ह्याच्या व भागाच्या पातळीवर प्रत्येकीं दोन याप्रमाणें अनुक्रमें २५० व १२५ रु. ची, २००० व १००० रु. ची. आणि ५००० व २५०० रु. चीं अशीं ६ बक्षिसें ठेवलेलीं आहेत.

सध्यां विकास योजनेंतून पंचायतीमार्फत तालीम, शाळा, करमणूक केंद्रें, जोडरस्ते, छोटे बंधारे, गटारें, आड व विहीरी, इ० विविध प्रकारचीं कामें केलीं जात असून त्यावर सरकारकडून ५० टक्के मदत मिळते. कांहीं पंचायतींमार्फत शिवण कामाचे वर्गहि चालू असून नोकरांच्या पगाराप्रीत्यर्थ पंचायत फंडांतून २५ टक्के व सरकारकडून ७५ टक्के मदत मिळते आहे.

नगरपालिका

अहमदनगर जिल्ह्यांत अहमदनगर, संगमनेर, कोपरगांव व श्रीरामपूर येथें नगरपालिका आहेत. रस्ते, दवाखाने, पाणीपुरवठा, स्वच्छता आणि शिक्षण, हीं नगरपालिकांचीं मुख्य कर्तव्यें आहेत. आणि तीं व्यवस्थितपणें पार पाडण्यासाठीं आपल्या हद्दींत प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरीत्या कर बसवून फंड उभारण्याचा अधिकार त्यांना देण्यांत आलेला आहे. सार्वजनिक उपयुक्ततेचीं कामें हातीं घेण्यासाठीं सरकारच्या आगाऊ मंजुरीनें नगरपालिकांना सार्वजनिक अगर सरकारी कर्जें उभारतां येतात. आणि त्यांनीं सरकारकरितां केलेल्या कामाबद्दल सरकारकडून त्यांना मदतहि मिळते. या सर्व सवलतींचा फायदा घेऊन अहमदनगर जिल्ह्यांतील चारहि नगरपालिका आपल्या शहराचा विकास घडवून आणण्याचा प्रयत्न करताहेत.

येथील नगरपालिकांचें सरासरी उत्पन्न महाराष्ट्र राज्यामध्यें दुसऱ्या क्रमांकाचें आहे. त्या बाबतींत सोलापूरच्या खालोखाल अहमदनगर जिल्ह्याचाच नंबर लागतो. गेल्या नऊ दहा वर्षांमधील नगरपालिकांचें उत्पन्न व खर्चाची कल्पना खालील आंकड्यांवरून येईल.

साल	एकूण उत्पन्न	एकूण खर्च
१९५०–५१	२७२६०००	२५५६०००
१९५१–५२	२५५६०००	२३३९०००
१९५२–५३	२३८६०००	२१८१०००
१९५३–५४	२४८७०००	२४२२०००
१९५७–५८	४३१७०००	४२१८०००
१९५८–५९	४७७३०००	५०८५०००

जिल्हा लोकल बोर्ड

अहमदनगर जिल्हा लोकल बोर्डाचें कार्यक्षेत्र नगरपालिकांच्या हद्दी सोडून सर्व जिल्हाभर आहे. अशारीतीनें १२,६१००० लोकवस्ती असलेल्या ६५४६ चौरस मैलांवर बोर्डाचा कारभार चालतो. या भागांतील लोकांना शैक्षणिक व आरोग्यविषयक सोयी उपलब्ध करून देणें, रस्ते सुस्थितींत राखणें, पाणीपुरवठ्याची सोय राखणें इ० कामें बोर्डाकडें सोंपविण्यांत आलेलीं आहेत. वाहनें आणि जनावरें यांच्यावरील कर, जकात करांशिवाय इतर कर सरकारच्या परवानगीनें बसविण्याचा अधिकारहि बोर्डाला मिळालेला आहे. शिवाय शैक्षणिक व आरोग्यविषयक बाबींसाठीं बोर्डाला सरकारकडून भरपूर आर्थिक सहाय्य मिळतें. त्या खेरीज बोर्डाच्या नोकरवर्गाला देण्यांत येणाऱ्या महागाई भत्याच्या ५० टक्के इतके अनुदान सरकारकडून देण्यांत येतें. पाणी करामधून बोर्डाला दर रु. मागें २ ते ३ आणे दिले जातात आणि ग्रामपंचायती व नगरपालिका यांच्या हद्दीबाहेरच्या भागांतील शेतसाऱ्याच्या १५ टक्के इतकी रक्कम सरकार बोर्डांना देते. या सर्व सवलतीचा फायदा घेऊन जास्तींत जास्त लोकोपयागी कामें करण्याचा प्रयत्न अहमदनगर जिल्हा लोकल बोर्ड करीत आहे.

छोटीशीं, बाजूला असलेलीं व तुरळक वस्तीचीं ३२ खेडीं सोडलीं तर प्राथमिक शिक्षणाची सोय बोर्डाच्या क्षेत्रांतील सर्व खेड्यांतून करण्यांत आलेली आहे.

गेल्या दहा वर्षांतील बोर्डाच्या आर्थिक परिस्थितीची कल्पना खालील आंकड्यांवरून येईल.

साल	एकूण उत्पन्न	एकूण खर्च
१९५०–५१	१८५२०००	१९१९०००
१९५१–५२	१६०१०००	१५४९०००
१९५३–५४	२४०५०००	२००७०००
१९५४–५५	१७५००००	१६२३०००
१९५७–५८	२०९१०००	२४०३०००
१९५८–५९	२५४८०००	२६८८०००

अहमदनगर जिल्ह्याची दुसरी पंचवार्षिक योजना

भारताच्या सर्व भागांतील लोकांचा सर्वांगीण विकास व्हावा या हेतूनें पहिल्या व दुसऱ्या पंचवार्षिक योजना आंखण्यांत आल्या. त्यांतील कांहीं कार्यक्रम असे आहेत कीं त्यामुळें देशाचा फायदा झाला तर कांहीं कार्यक्रम असे आहेत कीं त्यामुळें विशिष्ट भागांचा फायदा झाला. अहमदनगर जिल्ह्याच्या हितावर नजर ठेवून अशा ज्या कांहीं योजना दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत घेण्यांत आल्या आहेत त्यांचाच आतां आपण विचार करणार आहोंत.

२०४ कोटी रुपयांच्या महाराष्ट्र राज्याच्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेपैकीं अहमदनगर जिल्ह्याच्या वांटचाला १० कोटी रुपये आले. आणि समाधानाची गोष्ट म्हणजे या जिल्ह्यानें या योजनेच्या कालावधींत ठरविलेलीं सर्वच्या सर्वच्या सर्व उद्दिष्टें गांठलेलीं आहेत.

तरीहि अहमदनगर जिल्ह्यासाठीं आंखल्या गेलेल्या २६ कार्यक्रमांपैकीं योजनेच्या पहिल्या वर्षीं म्हणजे १९५६–५७ सालीं फार थोडे कार्यक्रम सुरू करण्यांत आले. त्यावर्षीं फक्त ३६ कामें पुरीं करण्यांत आलीं तर त्यानंतरच्या दोन वर्षांत ५५ व ७९. त्यांची विषयवार वर्गवारी खालीलप्रमाणें आहे.

विषय	एकूण कामें	पुरीं केलेलीं कामें		
		१९५६-५७सालीं	१९५७-५८सालीं	१९५८-५९ सालीं
शेती,सामाजिक विकास व ग्रामीण विकास	५२	१८	२८	३८
कालवे व वीज	३	३	३	३
व्यापार व खाणी	१६	२	४	९
वाहतुक व दळणवळण	२	२	२	२
सार्वजनिक कामें व शास्त्रीय आणि औद्योगिक संशोधन	५३	११	१८	२७
एकूण	१२६	३६	५५	७९

यावरून दिसून येईल कीं, कालवे व वीज आणि वाहतुक व दळणवळण या खात्याचीं कामें या तीनहि वर्षांत एकसारखीं होत राहिलीं पण इतर कामांची सुरुवात सावकाश, थोड्याशा धिम्मेपणानें झाली तरी

नंतर त्यांना जोराची गति मिळून पहिल्या वर्षांहून तिसऱ्या वर्षी कांहीं कामें दुपटीनें झालीं तर कांहीं कामें चौपटीनें.

कामापायीं खर्ची पडलेल्या रकमेंतहि हाच फरक दिसून येतो. या तीन वर्षांमध्यें जिल्ह्यांतील विविध प्रकारच्या विकासाच्या कामासाठीं खर्च पडलेल्या चार कोटी सात लक्ष रुपयांपैकीं मोठ्या, मध्यम व छोट्या अशा तीनहि प्रकारच्या पाणी पुरवठ्याच्या कामासाठीं जवळजवळ ५२ टक्के रक्कम खर्ची पडली आहे. त्यानंतर क्रम लागतो तो सामुदायिक व ग्रामीण विकासांच्या कामांचा. त्यासाठीं ६६ लाख ६५ हजार रुपये म्हणजे १६.४ टक्के रक्कम खर्च झाली आहे. त्यानंतर भूसंरक्षणाच्या कामाचा क्रम लागत असून त्यावर ५२ लक्ष ५४ हजार रुपये म्हणजे १२·९ टक्के इतकी रक्कम खर्ची पडलेली आहे.

आणि या सर्व रकमा सार्थकीं लागल्याचें खालील विवेचनावरून दिसून येईल.

शेती.

पहिल्या पंचवार्षिक योजना काळामध्यें अधिक धान्योत्पादनाची मोहिम हातीं घेण्यांत आली. म्हणून सुधारलेल्या पद्धतीनें शेती करणें, सुधारलेल्या अवजारांचा वापर करणें, अधिकाधिक जमिनीस पाणीपुरवठा करणें, वगैरे गोष्टींवर भर देण्यांत आला. याचा परिणाम म्हणजे १९५१–५२ सालीं या जिल्ह्यांत लागवडी-खालचें क्षेत्र ३२,६१,२०० एकर होतें तें १९५५–५६ सालीं, ३२,९१,०८६ एकर झालें. याशिवाय खतांच्या वापरांमुळें व तालीबांधाच्या योजनांमुळें जमिनीचा मगदुर सुधारला आणि सुधारलेल्या बी-बियाणांच्या वापरांमुळें तर अन्नधान्याच्या उत्पन्नांत बरीच वाढ झाली.

पहिल्या पंचवार्षिक योजनेप्रमाणेंच दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्यें शेती उत्पादनवाढीवर विशेष भर देण्यांत आला आहे. म्हणूनच शेतीच्या उत्पन्नांत जास्तीत जास्त वाढ कशी करतां येईल या गोष्टीकडे योजना लागू झाल्यापासून विशेष लक्ष देण्यांत आलें आहे. म्हणूनच शेतीच्या सुधारणेपासून तों शेतीला जीवन देणाऱ्या पाणी पुरवठ्याच्यापर्यंतच्या सर्व योजना अधिकाधिक राबविण्यांत आल्या आहेत. कालव्यांच्या योजना, विहीरींच्या योजना, सुधारलेल्या पद्धतीनें शेती करण्याच्या व त्यासाठीं नवीन पद्धतीचीं अवजारें वापर ण्याच्या आणि उत्कृष्ट प्रकारच्या बी-बियाणांचा वापर करण्याच्या योजना यांचा प्रामुख्यानें उल्लेख करतां येईल.

बीं उत्पादन केंद्रें.

साऱ्या जिल्ह्याची बियाची गरज भागवायची म्हटल्यावर वेगवेगळ्या ठिकाणीं आणि मोठ्या प्रमाणा-वर बीं-उत्पादन केंद्रे हीं सुरू केलींच पाहिजेत ही गोष्ट जाणून प्रत्येक तालुका व महालांत तीं सुरू करण्यांत आलीं आहेत. आणि तेथील बी-बियाणांचा व्यवस्थित सांठा करण्यासाठीं सर्व केंद्रांजवळ कोठारांची सोय करण्यांत येत आहे. बी उत्पादन केंद्रें खालील ठिकाणीं आढळतील:–

(१) कोकणगांव, तालुका संगमनेर (२) सावेडी, तालुका अहमदनगर (३) काष्टी, तालुका श्रीगोंदा (४) भाळवणी, तालुका पारनेर (५) आरणगांव, पेठा तालुका जामखेड (६) कर्जत, तालुका कर्जत (७) टाकळीभान, तालुका श्रीरामपूर (८) चिलेखनवाडी, तालुका नेवासा (९) ठाकूर पिंपळ-गांव, तालुका शेवगांव (१०) चिंचोंडी, तालुका पाथर्डी (११) राहुरी, तालुका राहुरी.

या केंद्रांतून आतांपर्यंत अदमासें ६००० बंगाली मण बी-बियाणें वांटण्यांत आलीं आहेत.

शेती संशोधन केंद्रांतून प्रयोगांनीं उपयुक्त ठरलेल्या सुधारलेल्या बी-बियाणांच्या वांटपांमुळें येथील धान्योत्पादनांत बरीच वाढ झाली आहे. किमान दहा टक्के वाढ झाली आहे हें नक्की.

पहिल्या पंचवार्षिक योजनाकाळामध्यें धान्याच्या सुधारलेल्या बियाणांचें भरपूर उत्पादन होऊन त्याचे येथील शेतकऱ्यांमध्यें व्यवस्थितपणें वांटप व्हावें या हेतूनें एक योजना हातीं घेण्यांत आली होती. त्या योजनेनुसार सुधारलेल्या जातीच्या बियाणांचें जादा उत्पादन कांहीं प्रगतिशील शेतकऱ्यांच्या शेतांवर करण्यांत येऊन त्याचें वांटप, अधिकृत विक्रेते व सहकारी संस्था यांच्यामार्फत करण्यांत आलें. सुधारलेली अकोला बाजरी, मालदांडी ३५–१ ज्वारी, केनफाड व निफाड ४ गहूं, चाफा हरबरा, सी. ओ. ४१९ ऊंस, कापूस सी. ओ. २, सी. ओ. ४ बी. ४०, विरनार सी. ओ २, लांबधागा इत्यादि सुधारलेल्या जातीच्या बियाणांचा प्रचार व प्रसार साऱ्या अहमदनगर जिल्ह्यांत करण्यांत आला. पहिल्या पंचवार्षिक योजना काळांत २९,०२२ बंगाली मण सुधारलेल्या बियाणांचे वांटप करण्यांत आले. आणि त्याखालीं १,४३,३०६ एकर क्षेत्र आलें. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या गेल्या चार वर्षांतील काळांत या क्षेत्रांत बरीच वाढ झाली आहे. ऊंसाचें क्षेत्र ३५००० एकरांवरून ७०००० एकरांवर गेलें तर कंबोडिया कापसाचें क्षेत्र ५००० एकरांवरून ३०००० एकरांवर गेलें आहे. अधिक धान्योत्पादनाबद्दल अहमदनगर जिल्ह्याला गेल्या वर्षी १०००० रुपयांचें बक्षीस मिळालें आहे.

सुधारलेल्या पद्धतीची शेती.

जमिनीचें उत्पादन वाढायचें असेल तर सुधारलेल्या पद्धतीनें शेती केली पाहिजे, हें तत्त्व शेती तज्ज्ञांनी मान्य केल्यानें ती गोष्ट शेतकऱ्यांना पटवून देऊन त्यांचीं पाऊलें त्याबाजूंनीं पडावींत इकडे अहमदनगर जिल्ह्यांत फार लक्ष दिलें जात आहे. त्यासाठीं सरकारी प्रयोगभूमीवर व प्रगतिशील शेतकऱ्यांच्या जमिनीवर प्रात्यक्षिकें घेतलीं जाऊन शेतकऱ्यांना माहिती दिली जाते. विशेषत: जपानी पद्धतीची भातशेती, दुष्काळी भागांतील कोरडवाहू शेती वगैरेंचें महत्त्व प्रात्यक्षिकाद्वारें पटविलें जात असल्यानें आतांपर्यंत २५,००० एकर ज़मीन जपानी भातशेतीखालीं आली असून आणखी १०००० एकर जमीन लौकरच येईल असें वाटतें.

पीक-संरक्षण.

इकडे जमिनीची मशागत चांगली केली, बी-बियाणें उत्कृष्ट वापरलें आणि खतपाणीहि चांगलें दिलें आणि भरघोंस पीक आल्यावर त्याला रोगानें पछाडलें आणि किडयांनीं पोखरलें तर हातचें सारें पीक वांया गेल्यावांचून रहायाचें नाहीं. म्हणून अशा वेळीं गंधक, गॅमेक्झिन, डी. डी. टी., कॉपर सल्फेट, झिंक फॉस्फाईट्स् वगैरे खात्रींची जंतुनाशक व रोगनाशक औषधें वापरून पिकांचें संरक्षण करण्यांत येतें.

पीक स्पर्धा.

नवीन पद्धतीच्या लागवडीचा अवलंब करून शेतकऱ्यांना अधिक धान्योत्पादन करण्यास उत्तेजन मिळावें या हेतूनें जिल्हानिहाय व तालुकानिहाय पीकस्पर्धा घेण्यांत येऊन जास्तींत जास्त पीक काढणाऱ्या शेतकऱ्यांना बक्षीसें दिलीं जातात. तसेंच शेतकीविषयक व जनावरांचीं प्रदर्शनें भरवून अधिक धान्योत्पादनाचे सर्व मार्ग शेतकऱ्यांना दाखवून त्यांनीं त्या मार्गांचा अवलंब करावा म्हणून प्रयत्न केला जातो.

शेती संशोधन केंद्रें व प्रात्यक्षिक केंद्रें.

शेती संशोधन केंद्रांच्या द्वारें अधिक धान्योत्पादनाच्या बाबतींत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करतां यावें या हेतूनें अहमदनगर जिल्ह्यांत दोन संशोधन केंद्रें सुरू करण्यांत आलीं आहेत. एक पुणतांबें येथें असून दुसरें कोपरगांव येथें आहे. त्याशिवाय चास येथें कोरडवाहू शेती संशोधन केंद्र, कोपरगांव व देवळाली येथें ऊंस

संशोधन केंद्र आणि शेवगांव येथें कापूस संशोधन केंद्र अशीं केंद्रें स्थापन करण्यांत आलीं आहेत. तसेंच जिल्ह्यांत ३१ शेतकी प्रात्यक्षिक केंद्रें असून तेथें सुधारलेल्या शेतीच्या पद्धतीचीं प्रात्यक्षिकें दाखविलीं जातात. आणि याचा चांगला परिणाम होतांना दिसतो आहे.

कापसाचें अधिक उत्पादनः–

उत्कृष्ट अशा लांब धाग्याच्या कापसाचें अधिक उत्पादन व्हावें म्हणून विविध योजना आंखण्यांत आलेल्या आहेत. त्यानुसार १७० सी. ओ. २, सी. ओ. २ बी, ४० विरनार इत्यादी सुधारलेल्या जातीच्या लागवडीखालीं कपाशीच्या पिकाचें अधिकाधिक क्षेत्र आणण्यांत येत आहे. पहिल्या पंचवार्षिक योजनाकाळांत वरील कापसाच्या जातीचें २५२० बंगाली मण बी-बियाणें शेतकऱ्यांत वांटण्यांत येऊन २४६२२ एकर जमीन त्याच्या लागवडीखालीं आणण्यांत आली आहे. आतां दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटीं या योजनेखालीं १३२५०० एकर क्षेत्र लागवडीखालीं आणण्यांत येणार आहे.

मच्छीमारीः–

नगर जिल्ह्याला समुद्रकिनारा नसल्यानें तेथील तलाव, धरणें व तळीं यांतून लहान माशांची जोपासना करून त्यांची पैदास वाढविणें एवढेंच करतां येण्याजोगें आहे. काटला, रोहू, मिरगाल इ० कांहीं निवडक जातींबरोबर जलद वाढ होणाऱ्या कार्प जातीच्या माशांची कलकत्त्याहून आयात केलेली असून गोड्या पाण्याच्या ठिकाणीं त्यांना सोडलेलें आहे.

माशांच्या धंद्याला उत्तेजन देण्याच्या हेतूनें मासे धरणाऱ्या लोकांच्या सहकारी संस्थेला नगर येथें एक शीतगृह बांधून दिलें जाणार आहे. त्यासाठीं $\frac{1}{3}$ रक्कम मदत व $\frac{2}{3}$ रक्कम कर्ज म्हणून सरकारकडून मिळणार असून तें तीन वर्षांच्या सारख्या हप्त्यांनीं फेडावयाचें आहे. शिवाय शीतगृहांतील दुकानांच्या ६ महिन्यांच्या भाड्यांत निम्मी सूट मिळणार आहे.

जमिनीची मोजणी व आकारणी :–

जमिनीची मोजणी केल्यानें तिचें क्षेत्र व तिच्या मर्यादा ठरविण्यांत येऊन जमीन मालकाच्या हक्कांचें संरक्षण करतां येतें. तसेंच जमिनीची वर्गवारी केल्यामुळें तिच्या तुकड्यांची मूलभूत प्रमाणानुसार आकारणी करण्यांत येते. हें मोजणी व आकारणीचें काम अहमदनगर जिल्ह्यांत पहिल्या पंचवार्षिक योजनाकाळांत हातीं घेण्यांत येऊन १९५५–५६ अखेरीस तें पुरें करण्यांत आलें. आकारणीविषयींच्या चौकशीचें काम जिल्ह्यांतील सर्व तालुक्यांतून हातीं घेण्यांत आलें असून तें पुढच्या वर्षीं पुरें होईल. पोट हिश्श्यांची मोजणी करणें हें पहाणी योजनचेंच अंग असून अशा ५७९४८ पोट हिश्श्यांची मोजणी केली जात आहे.

तुकडेजोड योजना :–

मुंबई सरकारचा १९४७ सालचा तुकडेबंदी व तुकडेजोड कायदा अहमदनगर जिल्ह्यांत १९४९–५० सालापासून लागू करण्यांत आला आहे. त्याअन्वयें शेतजमिनीचे तुकडे आणि पोटहिस्से करण्यास बंदी करण्यांत येऊन झालेल्या तुकड्यांचें एकत्रीकरण करण्यांत येत आहे. हें पहिल्या पंचवार्षिक योजनाकाळांतच सुरू करण्यांत आलेलें तुकडजोडीचें कार्य जोरांत सुरू असून दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळाच्या शेवटीं १७० खेड्यांतील शेत जमिनींचें एकत्रीकरण करण्याचें कार्य पुरें होईल. १९५६–५७ सालीं असें कार्य केलेल्या २१ खेड्यांपैकीं ११ खेड्यांनीं विशेष प्रगति केलेली दिसून येते.

पाणी पुरवठा योजनाः—

शेतीचें उत्पादन चांगलें व्हावयाचे असेल तर पाण्याचा पुरवठा वेळेवर व भरपूर व्हायला पाहिजे. ही गोष्ट जाणून अहमदनगर जिल्ह्यामध्यें पाणी पुरवठ्याच्या वेगवगळ्या योजना हातीं घेण्यांत आल्या आहेत. पहिल्या पंचवार्षिक योजनाकाळांत ९६४ नव्या विहीरी खोदण्यांत आल्या आहेत आणि १६६५ जुन्या विहीरी दुरुस्त केल्या गेल्या आहेत. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या ३ वर्षाच्या काळांत ३६२ जुन्या विहीरी दुरुस्त केल्या जाऊन ७२२ नव्या विहीरी बांधण्यांत आल्या. तसेंच पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस सुरू असलेलीं २१ छोट्या तलावांचीं कामें दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत पुरीं करण्यांत आलीं आहेत. आणि आतां बांधबंदिस्ती झालेल्या भागांत ५०००नवीन विहीरी खोदण्याचें काम जोरांत सुरू असून त्यासाठीं सरकारीरीत्या ९० लाख रुपये खर्च होणार आहेत.

सुपा, गुरवपिंपरी, कानडगांव, कोळगांव, कोंकणगांव, कामरगांव, गुणवडी, भावडी, बहिरोबावाडी, धुलेवाडी, निंबोडी, दूरगांव, पिंपरणे, गुंजाळा, चिचोंडीपाटील, जवळेकडलग, वरुडीपाठार, सुकीनाला,खलु-पिंप्री, वाडेगव्हाण, कमळाई, बेलवंडी इ० तलाव व बंधाऱ्याचीं कामें दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या गेल्या चार वर्षांच्या काळांत पुरीं करण्यांत आलीं. त्यामुळें १५००० एकर क्षेत्राला पाणी मिळूं लागलें आहे. आतां पान-वडी, मोहोरीपेठा, जामखेड व चिंचोली येथील योजना हातीं घेण्यांत आल्या असून इतर बऱ्याच योजनांची पहाणी व आंखणी करून ठेवण्यांत आली आहे.

अहमदनगर जिल्ह्यांत सध्यां दोन मोठ्या कालव्यांच्या योजना सुरू आहेत. त्या म्हणजे मुळा धरण योजना व घोड धरण योजना.

मुळा धरण योजनाः—

अहमदनगर जिल्ह्याच्या राहुरी, नेवासा, श्रीगोंदा, पाथर्डी व शेवगांव तालुक्यांतील कांहीं भागांना मुळा धरण योजनेमुळें कालव्याचें पाणी मिळून तेथील दुर्भिक्ष्य नाहींसें होणार आहे. बारागांव, नांदूर येथें १८०० फूट लांब व १५० फूट उंच मातीच्या धरणाचें काम जोरांत सुरुं असून त्यासाठीं साडेपांच कोटी रुपये खर्च होणार आहेत. उजव्या बाजूचा कालवा ४५ मैल लांबीचा होणार असून २२ मैलांचें काम पूर्ण झालेलें आहे. डाव्या बाजूचा कालवा १४ मैल लांबीचा होणार आहे. मुख्य कालव्याबरोबरच इतर छोटे पाटबंधा-ऱ्यांचें कामहि हातीं घेण्यांत येणार आहे. त्यासाठीं स्वतंत्र विभाग उघडण्यांत आलेला आहे. या कालव्यामुळें राहुरी तालुक्यांतील ३३००० एकर, नेवासा तालुक्यांतील १९३००० एकर, शेवगांव तालुक्यांतील ९७००० एकर, पाथर्डी तालुक्यांतील ५००० एकर अशी एकूण ३२८००० एकर जमीन पाण्याखालीं येणार आहे. या योजनेसाठीं १३२०००००० रुपये खर्च होणार आहेत.

घोड धरण योजनाः—

घोडधरणापासून अहमदनगर व पुणें या दोन्हीं जिल्ह्यांचा फायदा होणार आहे. डाव्या बाजूच्या ५४ मैलांच्या कालव्यापासून अहमदनगर जिल्ह्याच्या श्रीगोंदा व कर्जत तालुक्यांतील ४४००० एकर जमिनीला पाणीपुरवठा होणार आहे तर उजव्या बाजूच्या कालव्यापासून पुणें जिल्ह्याच्या शिरूर तालुक्यांतील १७००० एकर जमिनीला जीवन मिळणार आहे. धरण व उजवीकडचे कालवे हे पुणें जिल्ह्यांत असून डावीकडचे कालवे हे अहमदनगर जिल्ह्यांत आहेत. या कालव्यांचें काम जोरांत सुरू असून १९६१ पर्यंत तें पूर्ण होईल. ५४ मैल लांबीच्या नगर जिल्ह्यांतील मुख्य कालव्यापैकीं ४५ मैल लांबीचें काम पूर्ण झालें असून राहिलेल्या कालव्याच्या खोदाईचें काम सुरू आहे. काम जसजसें होत गेलें तसतसें भोंवतालच्या जमिनींना पाणीपुरवठा

केला गेला. यावर्षी २०००० एकर रब्बी क्षेत्रास पाणी मिळेल. ही ५ कोटी रुपयांची योजना पुरी झाल्यानें नेहमीं दुष्काळानें ग्रासल्या जाणाऱ्या नगर जिल्ह्याच्या दक्षिण भागाचें दुर्भिक्ष्य नाहींसें होणार आहे.

भूसंरक्षण

जमिनीला ताली घातल्यानें जमिनीची धूप तर थांबतेच पण पडलेल्या पावसाच्या पाण्याचा जमिनीसाठीं जास्तींत जास्त उपयोग करून घेतां येतो. शिवाय त्यामुळें पिकाच्या उत्पादनांत आणि विहीरीच्या पाण्यांत वाढ होण्यास मदत होते. ही गोष्ट जाणून अहमदनगर जिल्ह्यानें तालीबांधाची योजना जास्तींत जास्त राबविण्याचा प्रयत्न केला आहे. नगर जिल्ह्यांत तालीबांध घालण्याजोगी अदमासें ९६३ लक्ष एकर जमीन आहे. त्यापैकीं ४३००० एकर जमिनीच्या तालीबांधाचें काम पहिली पंचवार्षिक योजना सुरू होण्यापूर्वीं झालें होतें. ७६००० एकराचें काम पहिल्या पंचवार्षिक योजनाकाळांत झालें असून दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या ३ वर्षांच्या काळांत १ लाख १४ हजार एकरांचें काम झालें आहे. पारनेर व कर्जत तालुक्यांनीं तर १९५८–५९ सालाच्या अखेरीसच तेथील सर्वच्या सर्व क्षेत्रांत म्हणजे अदमासें दीड लक्ष एकर जमिनीस बांधबंदिस्ती करून आपलें काम पुरें केले. आणि पाथर्डी तालुक्यानें १९६० च्या मार्च महिन्यांत २१५०० एकर जमिनीला ताली घालून भारतांतील तालीबांधकामाचा उच्चांक प्रस्थापित केला आहे. यामुळें महाराष्ट्रांतील इतर भागांचेंच नव्हें तर साऱ्या भारताचें लक्ष या तीन तालुक्यांकडे लागलें. आणि भारताच्या पंतप्रधानांपासून तों इकडे येऊन गेलेल्या मोठमोठाल्या परदेशी पाहुण्यांपर्यंत बऱ्याच जणांनीं अहमदनगर जिल्ह्यानें तालीबांधाच्या बाबतींत बजावलेल्या थोर कामगिरीबद्दल प्रशंसोद्‌गार काढले.

तण निर्मूलन

जमिनींत खोलवर रुजलेल्या तणांमुळें अहमदनगर जिल्ह्यांतील बरीच जमीन नापीक झाली आहे. अशा जमिनींतील तण यंत्राच्या सहाय्यानें काढण्यांत येत असून त्या जमिनी लागवडीखालीं आणल्या जाताहेत. पहिल्या पंचवार्षिक योजनाकाळांत अहमदनगर जिल्ह्यामध्यें ४–६ ट्रॅक्टर व बुलडोझर यांच्या सहाय्यानें जमिनीची नांगरट करणें, जमिनीला पाणी घालणें व जमीन सारखी करणें वगैरें कामें करण्यांत आलीं. परंतु ट्रॅक्टरच्या सहाय्यानें जमीन नांगरण्यास पुरेशी मागणी नाहीं असें दिसून आल्यानें दुसऱ्या पंचवार्षिक योजनाकाळांत बुलडोझरच्या कामापुरतीच ही योजना मर्यादित करण्यांत आली.


वनें

पहिल्या तसेंच दुसऱ्या महायुद्धाच्या वेळीं जळण व इतर कारणांसाठीं अहमदनगर जिल्ह्यांतील निबिड अरण्यांतील बरेंचसें लांकूड कापलें गेलें आणि अरण्यें उघडीं पडलीं. म्हणून योजनाकाळामध्यें वनें वाढविण्याची मोहिम हातीं घेण्यांत आली. आणि ती कार्यान्वित झाली म्हणूनच अकोला व राजूर भागामध्यें फिरून वनें दिसूं लागलीं आहेत. तसेंच राखीव अरण्यांची सुधारणा करण्याच्या योजनेखालीं नगर जिल्ह्यामध्यें आतांपर्यंत अदमासें ११०० एकर रानांमध्यें नवीन वृक्षारोपण करण्यांत आलें आहे. गवताचें उत्पादन वाढावें म्हणून १८०० एकर गांवरान व २०० एकर लष्करी रानाचें कुरण तयार करण्यांत आलें आहे.

जनावराचे दवाखाने

गाई-म्हशींचा दूध-दुभत्यासाठीं, बैलरेड्यांचा शेतीच्या कामासाठीं व इतर जनावरांचा इतर कामासाठीं नेहमींच उपयोग होतो. म्हणून या मुक्या प्राण्यांचा रोगराईपासून बचाव करणें आवश्यक आहे. ही गोष्ट लक्षांत घेऊन जनावरांच्या दवाखान्यांत वाढ करण्याची योजना दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत समाविष्ट केली गेली आहे. योजना सुरू होण्यापूर्वींच अहमदनगर जिल्ह्यामध्यें १५ जनावरांचे दवाखाने, व एक मदत केंद्र होतें.

सार्वजनिक आरोग्य व पशुवैद्यकाच्या सोयी.



पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत एक नवीन दवाखाना सुरू करण्यांत आला तर दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या तीन वर्षांच्या काळांत दवाखान्यांच्या दोन शाखा व ७ मदत केंद्रें उघडण्यांत आलीं.

सहकार

योजना काळांतील अहमदनगर जिल्ह्यांतील सहकारी क्षेत्रांतील कामगिरी वाखाणण्याजोगी आहे. येथील सहकारी सोसायटचांची संख्या हजाराच्यावर गेली आहे. ९४ टक्के खेडीं प्राथमिक सहकारी संस्थांच्या कार्यक्षेत्राखालीं आलीं आहेत. बऱ्याच प्राथमिक सहकारी सोसायटचांचें रूपांतर सेवा सोसायटचांमध्यें झालेलें आहे. गेल्या कांहीं वर्षांत ४०० च्या वर सेवा सहकारी सोसायटचा स्थापन करण्यांत आल्या आहेत. नगर जिल्ह्यामध्यें ५ सहकारी साखर कारखाने असून त्यांनीं अल्पावधींत एवढी प्रगति केली आहे कीं, राज्यांत इतर ठिकाणीं भराभर सहकारी साखर कारखाने सुरुं होत आहेत. खुद्द नगर जिल्ह्यामध्यें टाकळी, श्रीगोंदा, व संगमनेर येथें साखर कारखाने काढण्याचे प्रयत्न होत असून टाकळीच्या कारखान्याला मंजुरीहि मिळाली आहे.

साखरकारखान्याच्या धर्तीवर शेंगदाण्याचें तेल उत्पादन करणारा सहकारी कारखाना संगमनेर येथें नुकतांच सुरू करण्यांत आलेला आहे. नगर येथें कांहीं दिवसांपूर्वीं स्थापन झालेल्या अहमदनगर जिल्हा दूध-उत्पादन संघ लि., या संस्थेनें दूध पुरवठ्याचें व वांटपाचें काम हातीं घेतलेलें आहे. तसेंच सहकारी तेलगिरणीच्या धर्तीवर कापसाचें उत्पादन करणाऱ्या, शेतकऱ्यांच्या हितावर नजर ठेवून जिनिंग व प्रेसींग करणाऱ्या संस्था नगर, श्रीरामपूर व नेवासा येथें स्थापन झालेल्या आहेत. एक सहकारी छापखाना लौकरच सुरू होणार आहे. शिवाय अकोला येथें एक सहकारी टोमॅटो रस कारखाना, प्रवरानगर येथें सहकारी औद्योगिक कारखाना व श्रीरामपूर येथें सहकारी कापड गिरणी निघणार आहे.

नगर जिल्ह्यामध्यें सहकारी पतपेढ्यांची वाढहि झपाट्यानें होते आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजना-काळांतील या जिल्ह्याच्या ७७ सहकारी पतपेढ्यांच्या लक्ष्यापैकीं १९५६–५७ व ५७–५८ सालीं ३१ मोठ्या आकाराच्या विविध कार्यकारी सहकारी संस्था स्थापन झाल्या तर ५८–५९ सालीं १८.

बी. सी. लोकांसाठीं धान्य कोठारें:–

दुसऱ्या पंचवार्षिक योजनाकाळांत बी. सी. लोकांसाठीं १० धान्य कोठे तयार व्हावयाचे आहेत. प्रत्येक कोठ्याच्या मागें सरकारकडून ५०००रु. चें देणें मिळतें. या सवलतीचा फायदा घेऊन अहमदनगर जिल्ह्यांत १९५६–५७ व १९५७–५८ या दोन सालीं ३ धान्य कोठे आणि ५६–५९ सालीं दोन कोठे बांधण्यांत आले. आणि त्यासाठीं सरकारकडून २५००० रु. चे कर्ज मिळालें.

सहकारी मार्केटिंगचा विकास

शेतकरी राबराबून जमीन पिकवितो, मालही काढतो, पण त्याच्या मालाला चांगला भाव येऊन त्याच्या हातांत सारी रक्कम पडली तरच त्याच्या श्रमाचें चीज होईल. सहकारी मार्केटिंगच्या कल्पनेचा उगम मुख्यत्वें करून यांतूनच झाला. अहमदनगर जिल्ह्यांत दुसऱ्या पंचवार्षिक योजना काळामध्यें १९५६–५७ सालीं २ व ५७–५८ सालीं एक अशा तीन मार्केटिंग संस्था नोंदविल्या जावयाच्या होत्या. तसेंच सरकारी मदतीवर विविध कार्यकारी संस्थांच्याकडून या योजनाकाळांत ३ मोठ्या आकाराचे, ५ मध्यम आकाराचे आणि १५ लहान आकाराचें धान्य कोठे उभारले जायचे आहेत.

या बाबतींत येथें कांहीं कार्य झालें नाही असें नाहीं. १९५७–५८ सालीं एका मोठ्या आकाराच्या व ५ छोट्या आकाराच्या धान्य कोठारासाठीं सरकारकडून कर्ज व सबसिडीदाखल ७० हजार रुपये मंजूर झाले आहेत आणि १९५८–५९ सालीं १२ सोसायटचांना १ लाख २० हजार रुपये मिळणार आहेत. शिवाय १९५८–५९ सालीं ३ मार्केटिंग सोसायटचांना शेअर भांडवल म्हणून ४५२०० रु. ची रक्कम मंजूर करण्यांत आली आहे.

फार्मिग सोसायटीज

चालूं योजनाकाळामध्यें ४ फार्मिंग सोसायटचा स्थापन व्हायच्या होत्या. त्याप्रमाणें पहिल्या तीन वर्षांत दरसाल एक याप्रमाणें ३ संस्था स्थापन झाल्या असून त्यांना १९५७–५८ सालीं ६७४ रुपयांची सबसिडी आणि ७००० रुपयांचें शेअर भांडवल मंजूर करण्यांत आलें. त्यानंतर १९५८–५९ सालीं ३ सोसा-यटींना १७८० रुपयांची सबसिडी, दुसऱ्या ३ संस्थांना १२००० रुपयांचें शेअर भांडवल आणि २ संस्थांना ४८००० रुपयांचे कर्ज मंजूर झाले आहे.

अहमदनगर जिल्ह्यांत सहकारी क्षेत्रांत गेल्या कांहीं वर्षांत बरीच प्रगति झाली असल्याकारणानें विकास कार्यास्तव या जिल्ह्याची निवड करण्यांत आली. सहकारी क्षेत्राखालीं सर्वच्या सर्व शेतकऱ्यांना आण-ण्याचे प्रयत्न सुरू असून जामखेड तालुक्यानें हे यश केव्हांच संपादन केलें आहे.

शिक्षण

प्राथमिक शिक्षण सक्तीचें करण्यांत आल्यानंतर विद्यार्थ्यांची संख्या वाढली. तेव्हां शाळांच्या इमारतीं-तहि वाढ होणें क्रमप्राप्त होतें. म्हणून दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या तीन वर्षांच्या काळांत अहमदनगर जिल्ह्यामध्यें ७३ खोल्यांच्या २७ शाळा बांधण्यांत आल्या. आणि त्यासाठीं २ लाख रुपये खर्च करण्यांत आले.

तसेंच प्राथमिक शाळांचें बेसिक शाळांमध्यें रूपांतर करण्याच्या योजनेखालीं दुसऱ्या पंचवार्षिक योज-नेच्या पहिल्या तीन वर्षांच्या काळांत १६८ शाळांचें रूपांतर बेसिक शाळांमध्यें करण्यांत आले. आतां प्राथ-मिक शाळांची संख्या १६४२ झाली असून प्राथमिक जिल्हा शिक्षण मंडळाचा वार्षिक खर्च ४२ लाखांवर गेला आहे.

अलिकडच्या काळांत माध्यमिक शाळांच्या संख्येंतहि वाढ झाली आहे. ती ५४ वरून ७२ वर गेली आहे. अहमदनगर येथें एक टेक्निकल हायस्कूल उघडलें गेलें असून संगमनेर येथील ज्ञानमाता विद्यालयानें शेती शिक्षणाची सोय असलेली विविध कार्यकारी शाळा सुरू केलेली आहे. गेल्या वर्षी इमारतीसाठीं ८ शाळांना २ लाख रुपयांची ग्रॅन्ट देण्यांत आली. तसेंच पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटीं दुय्यम शाळांतील ए. सी. सी. विभागांची संख्या २६ होती. ती त्यानंतर ३ वर्षांनीं ३३ वर गेली. १९५८–५९ सालीं विद्या-र्थ्यांचीं दोन व विद्यार्थिनींचें एक अशीं तीन युवक सेवा शिबीरें घेण्यांत आलीं.

स्थानिक विकासाचीं कामें.

अहमदनगर जिल्ह्यांत स्थानिक विकास योजना १९४५ सालींच लागू करण्यांत आली असून त्याखालीं आतांपर्यंत ३१५ कामें हातीं घेऊन २७९ पुरीं करण्यांत आलीं आहेत. त्यासाठीं सव्वाबारा लाख रुपये खर्च करण्यांत आले असून त्यांपैकीं १ लाख ५ हजार रुपये १९५६–५७ सालीं, १ लाख ६००० रु. १९५७–५८ सालीं आणि १ लाख ९००० रुपये १९५८–५९ सालीं खर्चीं पडले असून त्यांचा विनियोग पिण्याचें पाणी पुरवठा–योजना, शेती सुधारणा, ग्राम सफाई वगैरे कामांसाठीं करण्यांत आला. १९५८–५९ सालीं ग्रामीण भागांत पाणी पुरवठा करणाऱ्या चार योजना पुऱ्या करण्यांत आल्या असून १८ योजनांचें कार्य जोरांत सुरू आहे.

ग्राम पंचायती:–

आतां अहमदनगर जिल्ह्यांतील प्रत्येक गांवांसाठीं ग्राम पंचायत स्थापन झाली असून त्यांची संख्या ७६४ वर गेली आहे. सर्वच्या सर्व गांवें ग्राम पंचायतीच्या कक्षेखालीं आणणारा राज्यांतील पहिला जिल्हा हाच असावा. पंचायतीचा वार्षिक कारभार सव्वाचौदा लाख रुपयांचा असून त्यांतले सव्वासहा लाख रुपये सर-कारकडून मदत रूपानें दिले जातात.

पिकें व कारखाने



कोपरगांव
अकोला
संगमनेर
श्रीरामपूर
राहुरी
नेवासा
शेवगांव
पाथर्डी
अहमदनगर
पारनेर
श्रीगोंदे
कर्जत
जामखेड
ऊंस
गहूं
ज्वारी
कापूस
तांदुळ
बाजरी
भुईमुग
मोसंबी
आंबे
सहकारी साखर कारखाने
खाजगी साखर कारखाने
विडीचे कारखाने
कापसाच्या गासंड्या बांधण्याचे कारखाने

व्यापार व उद्योगधंदे:–

पहिल्या पंचवार्षिक योजना काळाप्रमाणेंच दुसऱ्या पंचवार्षिक योजना काळामध्यें अहमदनगर जिल्ह्यांत उद्योगधंद्यांची झपाट्यानें वाढ होत आहे. नवीन नवीन साखर कारखान्यांबरोबर साखर उत्पादनासाठीं लागणारी यंत्रसामुग्री तयार करणाऱ्या कारखान्याची, प्रवरानगर येथें उभारणी केली जात आहे. सुमारें दीड-कोटी रुपये खर्चून चितळी रेल्वे स्टेशनजवळ ऊंसाच्या मळीपासून पॉवर अल्कोहोल तयार करण्याचा कार-खाना लवकरच सुरू होणार आहे.

मोठमोठाल्या कारखान्यांबरोबर छोट्या उद्योगधंद्यांना प्रोत्साहन देण्याचें आपल्या सरकारचें धोरण आहे. त्या दिशेनें जेवढे म्हणून प्रयत्न करतां येतील तेवढे केले जाताहेत. धंदेशिक्षण घेणाऱ्या कारागिरांना मदत करणें, त्यांना लागणारीं अद्यावत् पद्धतीचीं हत्यारें तयार करण्याच्या बाबतींत हातभार लावणें व कुटीर उद्योगांची अधिकाधिक वाढ होऊन ते जास्तींत जास्त किफायतशीर कसे होतील इकडे बारकाईनें लक्ष दिलें जात आहे.

येथील कुटीरोद्योगामध्यें हातमागाच्या धंद्याला प्रमुख स्थान द्यावें लागेल. विणकरांच्या सहकारी सोसायट्यांना सरकारकडून कर्ज व इतर रूपानें मदत मिळत असल्यानें त्या बऱ्या चालल्या आहेत. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या तीन वर्षांच्या काळांत छोट्या धंद्यासाठीं खर्च पडलेल्या १४ लाख २६००० रुपयांपैकीं १३ लाख १२००० रुपये एकट्या हातमागाच्या धंद्याच्या विकासासाठीं खर्च केले गेले आहेत.

रस्त्यांचा विकास:–

अहमदनगर जिल्हा हा महाराष्ट्र राज्यांत मध्य भागीं वसत असल्यानें महत्त्वाचे प्रांतिक रस्ते या जिल्ह्यांतून जातात. त्यांपैकीं बहुतेक रस्त्यांची व त्यावरील पुलांची दुरुस्ती करण्याचें काम जोरांत सुरुं आहे. १९५२–५३ च्या दुष्काळांत झालेले कच्चे रस्ते पक्के करण्याच्या कामाबरोबर साखर कारखान्यांच्या परि-सरांतील रस्ते पक्क्या खडीचे करण्याचें कामहि सुरुं आहे. नगर-पुणें हा ८० मैल लांबीचा रस्ता सिमेंट काँक्रीट करण्यांत आला असून नगर-मनमाडचा ८७ मैल लांबीचा रस्ताहि सिमेंटकाँक्रीट केला जात आहे. त्यासाठीं ६० लक्ष रुपये खर्च होणार आहेत. नगर ते औरंगाबाद व नगर ते पैठण हे दोन रस्ते डांबरी होणार आहेत. साखर कारखान्यांच्या क्षेत्रांत साडेसतरा लाख रुपयांचीं पक्क्या सडकांचीं कामें सुरू असून कर्जत-ऐंबी, बेलवंडी-देवदैठणे, आढळगांव-भांबोरा, कोळगांव-देऊळगांव, जामखेड-नान्नज, खडकी-काळेगांव आणि इतर कित्येक रस्त्यांचीं कामें पुरीं झालीं आहेत.

कोपरगांव येथें गोदावरी नदीवर अठरा लाख रुपये खर्चून पक्का पूल बांधण्यांत आला आहे. प्रवरा-संगम यथील पुलाचें काम जोरांत सुरू असून ऑक्टोबर १९६१ अखेर तें पुरें होईल. याशिवाय १२ लाख रुप-यांचे नेवासें येथील, ८लाख रुपयांचे बेलापूर येथील, व ९ लाख रुपयांची कोल्हार व राहुरी येथीर कामें लव-करच हातीं घेण्यांत येणार आहेत. त्याशिवाय किती तरी छोट्या पुलांची व फरशांचीं कामें सुरुं होणार आहेत, तीं निराळीं.

अल्पबचत योजना

विकास कार्याच्या बाबतींत अहमदनगर जिल्हा ज्याप्रमाणें आघाडीवर आहे त्याप्रमाणें विकास कार्यासाठीं लागणारा पैसा अल्प बचत योजनेच्या द्वारें देण्याच्या बाबतींतहि अग्रेसर आहे. गेल्या दोनवर्षी तर

अहमदनगर जिल्ह्यानें ठरवून दिलेलें लक्ष्य तर पुरें केलेंच पण त्याहूनहि बरीच अधिक रक्कम जमा करुन त्यासाठीं राज्य पातळीवर ठेवलेलीं दोन मोठीं बक्षिसें मिळविलीं. गेल्या तीन वर्षांतील आंकडे खालील-प्रमाणें आहेत.:—

साल	लक्ष्य	गुंतविलेली रक्कम	टक्के
१९५७—५८	२५लाख	१६२८१५५	६५
१९५८—५९	२५लाख	३८४२२७०	१५४
१९५९—६०	३०लाख	४३६७१४७	१४५

१९५८—५९ सालाप्रमाणेंच गेल्या वर्षींहि जवळजवळ १५० टक्के रक्कम अल्पबचत योजनेंत गुंतविल्याबद्दल लाख रुपयाचें बक्षीस जिल्ह्यानें मिळविलें. या वर्षीं हें लक्ष्य आणखी २ लाखांनीं वाढविलें असून तें ३३ लाख करण्यांत आलें आहे. त्याची तालुकावार विभागणी गेल्या वर्षाच्या लक्ष्यासह खालीं दिली आहे.

तालुका	गेल्या वर्षांचें लक्ष्य	निव्वळ जमा	टक्के	या वर्षांचें लक्ष्य.
अकोला	५००००	८३६३५.०८	१७९	६००००
संगमनेर	२५००००	३२८६०२.८२	१३१	२५००००
कोपरगांव	६०००००	९८३२७०.८६	१६३	६५००००
श्रीरामपूर	६२५०००	८६२१६३.०३	१३७	६५००००
राहुरी	१५००००	३९१०२७.९७	१९४	२०००००
नेवासा	२०००००	५४७९.१२	०	१५००००
शेवगांव	१०००००	११९५३३.५५	१९९	१२५०००
पाथर्डी	७५०००	४०६८३.४७	५४	७५०००
नगर शहर	५७५०००	८१३६१७.३३	१२६	६०००००
नगर तालुका	७५०००			८००००
पारनेर	७५०००	२२३८८५.२९	३०६	१०००००
श्रीगोंदा	१०००००	३०८३१३.९२	३०९	१०००००
कर्जत	७५०००	२४०८१८.८७	३२१	१०००००
जामखेड	५००००	८४५५५.६२	१६९	६००००
एकूण	३०,०००००	४३७६६१७.५९	१४५	३२०००००

अल्प बचत योजनेचा लोकांत अधिकाधिक प्रसार व्हावा म्हणून स्मॉल सेव्हर चें ७२७वर्गणीदार करण्यांत आले आहेत. लोकांना अल्प बचत योजनेचें महत्त्व पटलें असून जून १९६० अखेर खालील प्रमाणे रकमा गुंतविल्या गेल्या आहेत.

नॅशनल प्लॅन सर्टिफिकिटे	९९२४४.४४
१० वर्षांचें सेव्हिंग डिपॉझिट	१६४९५०
क्युम्युलेटिव्ह टाईम डिपॉझिट	११६४०
पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बॅन्क डिपॉझिट	११७०९१.७९
१५ वर्षांची ॲन्युईटि सर्टिफिकेट	१९९५०
सेव्हिंग्ज् स्टॅम्प्स्	२६७८.७५
प्राईज् बॉन्डस्	१४८९४५

गेल्या तीन वर्षांत नगर जिल्ह्यामध्यें ९७ बचत ग्रामें झालीं असून त्यांची वर्गवारी खालीलप्रमाणें आहेः—

साल	बचत ग्राम
१९५७—५८	२०
१९५८—५९	२४
१९५९—६०	३५

राहुरी तालुक्यांतील बारागांव नांदूर हें पहिलें बचत ग्राम असून आतां बचत ग्रामांची संख्या ४८ वर गेली आहे. त्यांची तालुकावार वर्गवारी त्यांना घालून दिलेल्या लक्ष्यांसह खालीलप्रमाणें आहेः—

तालुका	लक्ष्य	बचत ग्रामांची संख्या
अकोला	८	३
संगमनेर	७	१२
श्रीरामपूर	४	६
कोपरगांव	५	—
राहुरी	४	२
नेवासा	६	१०
शेवगांव	६	—
पाथर्डी	५	१
नगर	६	८
कर्जत	४	५
श्रीगोंदा	४	१
पारनेर	६	०
जामखेड	३	—
एकूण	६८	४८

बचत ग्रामांची कल्पना मोठ्या प्रमाणांत सर्व जिल्हाभर पसरावी आणि जास्तीत जास्त गांवांना बचत-ग्राम होण्याचा मान मिळवितां यावा म्हणून अधिकारी, कार्यकर्ते व एजंट्स् जोरानें प्रयत्न करताहेत. एजंटांची संख्या वाढविण्याचे प्रयत्न होत असून सध्यां ५८३ एजंटस् आहेत. त्यांची वर्गवारी खालीलप्रमाणें आहे.

नगर शहर	६८
नगर तालुका	१७
श्रीरामपूर	३९
कोपरगांव	७२
शेवगांव	४३
राहुरी	३३
श्रीगोंदा	४३
नेवासा	३१
पाथर्डी	४३
अकोला	३७
पारनेर	४९
संगमनेर	४६
कर्जत	२१
जामखेड	३१
एकूण	५८३

जिल्ह्यांत एकूण ३७० बचत गट स्थापन केलेले असून त्यांची वर्गवारी खालील प्रमाणें आहे:—

भाग		बचत गट	सभासद	रक्कम
(अ)	नागरी विभाग			
१.	गिरण्या, कारखाने वगैरे	४२	१६७९	३३७७
२.	सरकारी कचेऱ्या	७८	३१२६	६९५८
३.	शैक्षणिक संस्था	२१४	२१४५०	४०८९०
४.	इतर संस्था	४	६१७	११७०
५.	इतर	१७	५७०	१०४९
(ब)	ग्रामीण विभाग	१५	४०३	७९४
	एकूण	३७०	२७८४५	५४२३८

अहमदनगर जिल्ह्यांत अल्प बचत योजनेच्या बाबतींत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या एजंटांना व जास्तीत-जास्त रक्कम गुंतविणाऱ्या तालुक्यांना प्रोत्साहन देण्याच्या हेतूनें कांहीं दानशूर गृहस्थांनीं पांच ढाली ठेवलेल्या आहेत. त्यांतली गिरमे ढाल ही अधिकाधिक रक्कम गोळा करणाऱ्या एजंटांना, बार्शीकर ढाल दुसऱ्या क्रमांकाची रक्कम जमा करणाऱ्या एजंटांना, बोरावके ढाल सर्वांत जास्त रक्कम दिलेल्या तालुक्याला, बिहाणी ढाल दुसऱ्या क्रमांकाची रक्कम जमा करणाऱ्या तालुक्याला आणि गिरमे ढाल अधिकाधिक रक्कम गुंतविणाऱ्या बचत ग्रामाला दिली जात आहे.

याचा इष्ट तोच परिणाम होत असून अल्प बचत योजनेंत अधिकाधिक रक्कम गुंतविण्याची लोकांची प्रवृत्ति वाढते आहे. सारा संगमनेर तालुकाच बचत तालुका करण्याचे जोरदार प्रयत्न सुरू आहेत. प्रवरा-नगर सहकारी साखर कारखान्यानेंहि बचत कारखाना होण्याच्या दृष्टीनें पाऊलें टाकायला सुरुवात केली आहे. या कारखान्यांतील प्रत्येक शेअर होल्डर तेथें गाळल्या जाणाऱ्या ऊंसाच्या दर टनामागें एक रुपया प्रमाणें गेलीं तीन वर्षें बचत करून अल्प बचत योजनेंत रक्कम गुंतवितो. तसेंच गणेश सहकारी साखर कारखाना, रहाता, या कारखान्यांतहि गेल्या वर्षांपासून दर टनामागें ४ आणे याप्रमाणें रकम बचत योजनेंत गुंतविली जाते.

अहमदनगर येथील रेसिडेंशिअल हायस्कूल व भिंगार येथील ए. सी. हायस्कूल हीं बचत विद्यालयें झालीं आहेत. अहमदनगर येथील शुक्लेश्वर हातमाग विणकर सहकारी संस्थेनें आणि विणकर हातमाग सोसायटी, भिंगार, या सहकारी संस्थेनें एक चांगला उपक्रम सुरू केला आहे. विणलेल्या साडीच्या मागें ०६ नवे पैसे बाजूला काढून तें अल्प बचत योजनेंत गुंतविले जाताहेत. संस्थेचा नोकरवर्गहि नियमितपणें अल्प बचत करून अल्प बचत योजनेंत आपला पैसा गुंतवितो आहे. गोदावरी शुगर मिल्स् लि., काणेगांव हा कारखाना बचत कारखाना झाला आहे. अहमदनगर येथील प्रसिद्ध व्यापारी पेढी रिजुमल ठाकूरदास कराचीवाला ही बचत पेढी झाली आहे. संगमनेर तालुक्यांत तर १८००० पोस्टल सेहिंग्ज्चीं खातीं उघडलीं गेलीं आहेत.

अहमदनगर जिल्ह्यांतील सैन्यांतील लोकांनीहि अल्प बचत योजनेच्या बाबतींत बहुमोल अशी कामगिरी बजाविली आहे. माणसीं एक रुपया प्रमाणें बचत करून त्यांनीं दीड लाखांवर रक्कम अल्प बचत योजनेंत गुंतविली आहे.

अहमदनगरच्या जिल्ह्याधिकाऱ्यांनीं तर एक अभिनव उपक्रम सुरू केला आहे. सार्वजनिक समारंभाच्या वेळीं हारतुरे व गुच्छाच्या बाबतींत खर्च केला जाणारा पैसा अल्प बचत योजनेंत गुंतवावा आणि तो त्या मान्यवर व्यक्तीनें योग्य अशा सार्वजनिक संस्थेला द्यावा अशी पद्धत त्यांनीं पाडली आहे.

संगमनेर तालुक्यांतील नांदूर खंदरमाळ या गांवानें तर अल्प बचत योजनेच्या बाबतींत अनुकरणीय अशी कामगिरी बजाविली आहे. विकास कार्यासाठीं ज्यांची जमीन काढून घेण्यांत आली त्यांना मोबदल्यादाखल दिलेली रक्कम त्यांनीं अल्प बचत योजनेंत गुंतविली. आदिवासी मंडळींनीहि या थोर कार्याला हातभार लावून ६८००० रुपये गुंतविले.

ऐतिहासिक, सांस्कृतिक व प्रेक्षणीय स्थळें

महाराष्ट्राचें काश्मीर-भंडारदरा

नैसर्गिक सौंदर्यानें नटलेल्या भंडारदऱ्याची बरोबरी करूं शकेल असें महाराष्ट्र राज्यांत तरी दुसरें नयनरम्य ठिकाण नाहीं. तीं हिरव्यागार वनराजींनीं युक्त अशी निळींकाळीं आणि उंचउंच गिरीशिखरें, संध्याकाळच्या प्रशांत समयीं विविध छटांनीं शोभणारें तें आकाश, खालच्या बाजूची ती रंगीबेरंगी पर्णफुलांनीं युक्त अशी वर्तुळाकृति बाग आणि समोर ताठ उभें असलेलें तें उंचच्या उंच धरण–तिकडे पहात असतां मन प्रसन्न बनल्यावांचून रहावयाचें नाहीं.

असें हें नयनरम्य ठिकाण घोटी रेल्वे स्टेशनापासून अवघ्या २० मैलांवर आहे. तेथून नाशिक ४० मैलांच्या अंतरावर आहे. पुणें व अहमदनगर जवळ जवळ १०० मैलांवर तर मुंबई १२० मैलांच्या अंतरावर आहे. भारतांतील सर्वांत उंच धरण, सर्वांत मोठा तलाव आणि महाराष्ट्र राज्यांतील सर्वांत उंच शिखर कळसूबाई हीं सर्व या ठिकाणीं आहेत.

भंडारदरा धरण

अहमदनगर जिल्ह्याच्या वायव्येस अकोला तालुक्यांत प्रवरा नदीवर भंडारदरा धरण दोन टेकड्या सांधून बांधण्यांत आलें आहे. त्याची लांबी १६६३ फूट असून उंची २७० फूट आहे. धरणाच्या भोंवतालीं सह्याद्रीच्या रांगा असून त्यांवरील दाट झाडीमुळें या ठिकाणाला विशेष सौंदर्य प्राप्त झालें आहे.

भंडारदरा हॉलीडे कॅम्प

धरणाच्या कांठावर वरच्या बाजूला टेकडीवर सुटीसाठीं येणाऱ्या मध्यम स्थितींतील लोकांच्यासाठीं एक भव्य अशी इमारत बांधली असून तेथें कुटुंबवत्सल लोकांना रहातां येण्याजोगे दहा गाळे व दोन हॉल आहेत. ते फर्निचर, भांडींकुंडीं, वगैरेंनीं युक्त आहेत. येणाऱ्या अधिक लोकांची सोय करण्याच्या हेतूनें खालच्या बाजूला आणखी एक इमारत बांधण्यांत येत असून त्यांत वरच्याप्रमाणेंच सहा गाळे आणि एका हॉलची सोय करण्यांत आली आहे. ही इमारत पुरी होण्याच्या मार्गावर आहे. जवळपासच उपाहारगृहाची सोय करण्यांत आली आहे.

प्रेक्षणीय स्थळें, हॉलिडे कॅम्प्स् इ०



रंधा धबधबा

भंडारदऱ्याहून प्रवरा नदीच्या पात्रांत सोडलेलें पाणी धरणापासून ६ मैल अंतरावर असलेल्या कड्या वरून २०० फूट खालीं पडतें. बाराहि महिने चालू असलेला हा धबधबा पहाण्यासाठीं हौशी प्रवासी नेहमींच येत असतात. तो नयनमनोहर देखावा पहातांना लोक मंत्रमुग्ध झाले नाहींत तरच नवल. या धबधब्या-पुढच्या उघड्या शिलापटाभोंवतीं कठडा तयार करण्यांत येणार असल्यानें खालीं पडण्याची भीति नाहींशी होऊन आतांपेक्षां अधिक पुढून धबधबा पहातां येणार आहे.

अहमदनगर किल्ला

१४८९ सालांतील गोष्ट. बहामनी राज्याचें जूं झुगारून देऊन स्वतंत्र झालेल्या सुभेदार अहमद निजा-मशहाचें पारिपत्य करण्यासाठीं बलिष्ठ सेनापती जहांगीरखान याला मोठ्या सैन्यानिशीं पाठविण्यांत आलें. तो भिंगार येथें तळ देऊन बसला.

पावसाळ्याचे दिवस असल्यानें आणि यशाची खात्री वाटत असल्यानें जहांगीरखान ऐषआरामांत मग्न झाला. त्याच्या हाताखालच्या लोकांनीहि त्याचेंच अनुकरण केलें. गाण्याबजावण्याला ऊत आला.मद्याचें प्याले भराभर रिते होऊं लागले. धूर्त अहमद या संधीचा फायदा घेतल्यावांचून का रहाणार होता ? त्यानें २८ मे १४९० रोजीं आपल्या निवडक सैन्यानिशीं जहांगीरखानाच्या सैन्यवार अचानकपणें निकराचा हल्ला केला आणि बेसावध असलेल्या शत्रूचा फडशा उडविला. अशा रीतीनें यश मिळवून देणारी ती जागा अहमदच्या मनांत भरली आणि त्यानें मिळविलेल्या विजयाचें द्योतक म्हणून " बाग निजाम " या नांवाची एक सुरेखशी बाग तयार केली. तेथें त्यानें " कोटेबाग निजाम " या नांवाचा राजवाडा बांधला आणि त्या भोंवती एक भुई कोट किल्ला उभारला. १४९४ सालीं बांधला गेलेला हाच अहमदनगरचा इतिहासप्रसिद्ध किल्ला.

नंतर या किल्ल्यांत कांहीं फेरफार करण्यांत आले ते बुऱ्हाणच्या दुसऱ्या निजामशहाच्या कारकीर्दींत. भोंवतालचा दगडी तट, अर्धचंद्राकृति २४ बुरुज व तटाभोंवतालचा खोल खंदक वगैरे कामें त्याचवेळीं कर-ण्यांत आलीं.

या किल्ल्याचा सुरुवातीचा इतिहास पाहिला तर त्याच्या भोंवतालीं घनघोर युद्धें व त्याच्यावर एका-मागून एक हल्ले होत गेलेलेआढळतील. मोंगल बादशहा अकबर याचा मुलगा मुराद यानें १५२५ सालीं या किल्ल्याला पहिल्यांदा वेढा दिला. त्यावेळीं हुसेन निजामशहाची शूर कन्या चांदबिबी हिनें मोठ्या हिरीरीनें किल्ला लढवून मोंगलांना तोंड दिलें. तुंबळ युद्ध सुरू झालें तरीहि न डगमगतां चांदबिबी मोठ्या धैर्यानें लढत राहिली असतां मोंगलांनीं दारूगोळ्याच्या सहाय्यानें किल्ल्याचा एक तट पाडला.

पण यामुळें चांदबिबीनें धीर सोडला नाहीं. तिनें सैन्याच्या कांहीं तुकड्या शत्रूच्या मार्गावर ठेवल्या आणि एका रात्रींतून ९० फूट उंच व ६ फूट रुंद अशी भिंत पक्क्या चुन्यांत बांधली आणि फिरून शत्रूंशीं दोन हात करण्यास सुरुवात केली. पण अंतस्थ दुहीमुळें मोंगलांपुढें चांदचा टिकाव लागला नाहीं. लढत असतांना रणांगणावर तिनें देह ठेवला आणि अहमदनगर किल्ल्यावर १६०० सालीं मोंगलांचें निशाण फडकलें. १७५९ सालीं हा किल्ला मराठ्यांच्या ताब्यांत आला. आणि त्याचा उपयोग राजकीय कैदी ठेवण्यासाठीं मुख्यत्वें-करून होऊं लागला. १७२८ सालीं मोरोबादादा फडणीस यांना येथें ठेवण्यांत आलें. हाच या किल्ल्यांतला पहिला राजकीय कैदी.

पुढ १७९७ सालीं बाजीरावास शिंद्यांनीं मदत केल्यामुळें त्या मदतीच्या मोबदल्यांत शिंद्यांना नगर-भाग मिळाला. तेव्हां या किल्ल्याचा ताबा त्यांच्याकडे गेला. नंतर थोडयाच दिवसांनीं थोर मुत्सद्दी नाना फडणवीस यांना याच किल्ल्यांत कैद करून ठेवण्यांत आलें. नानांच्या जोडीला बाजोबा तात्या हा दौलतराव शिंद्यांचा एक प्रमुख सरदारहि होता.

यानंतर १२ सप्टेंबर १८०३ रोजीं इंग्रजांनीं हा किल्ला मराठयांच्याकडून काढून घेतला. किल्ल्याच्या ईशान्येस आजहि एक तोफ ठेवलेली दिसेल. इंग्रजांचा सेनापति वेलस्ली यानें हा किल्ला जिंकल्यावर येथें न्याहारी केली. त्या प्रसंगाची आठवण म्हणून ती तोफ तेथें ठेवली आहे.

यानंतर या किल्ल्याला फारशा लढाया पहाव्या लागल्या नाहींत. तरी राजबंदी ठेवण्यासाठीं त्याचा उपयोग केला गेलाच. मागच्या महायुद्धाच्या वेळीं पकडलेल्या कांहीं जर्मन सैनिकांना या किल्ल्यांत कैदेमध्यें ठेवण्यांत आलें होतें. १९४२ च्या राष्ट्रीय चळवळीच्या वेळीं काँग्रेस वर्किंग कमिटीचे सभासद येथें ३ वर्षे स्थानबद्ध होते. पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनीं आपला " डिस्कव्हरी ऑफ इंडिया " हा जगविख्यात ग्रंथ याच वेळीं लिहिला.

चांदबिबीचा महाल

अहमदनगरच्या पूर्वेस ६ मैलांवर असलेल्या एका उंच टेकडीवर एक भव्य अशी अष्टकोनी दगडी इमारत आहे. ती चांदबिबीचा महाल म्हणून ओळखली जात असली तरी ती निजामशाहींतील एक थोर सरदार सलाबतजंग याची कबर आहे. ऐतिहासिक काळीं टेहळणीसाठीं म्हणून या इमारतीचा उपयोग केला जात असे. अतिशय उंचवटयावर असलेल्या या इमारतीवरून ६०–७० मैलांतील टापू दिसू शकतो. ही इमारत ६ मजली करावयाचा सलाबतखानाचा विचार होता. पण १५८० पर्यंत तीन मजले बांधले गेले आणि काम अर्धवट राहिलें. आतां आपल्याला ही इमारत या स्थितींतच पाहावयाला मिळते.

अहमदनगर पहाण्यासाठीं एखादा प्रवासी आला आहे आणि त्यानें किल्ल्यानंतर ही इमारत पाहिली नाहीं असें सहसा कधीं व्हायचें नाहींच. किती शांत आणि रम्य आहे हें ठिकाण. तिसऱ्या मजल्यावरून दिसणारें भोंवतालचें दृश्य अतिशय नयनरम्य असें असतें.

दमडी मशिद

अहमदनगर येथील किल्ल्यानजिक दमडी मशिद व टोली मशिद या नांवाच्या एकसारख्या घडवणुकीच्या दोन दगडी मशिदी आहेत. कांहीं कारागिरांनीं त्यांना मिळणाऱ्या मेहनताऱ्यांतून दमडी दमडी बाजूला सारून व खूप मेहनत घेऊन या मशिदी बांधल्या असें सांगण्यांत येतें. समोरासमोर असलेल्या या मशिदीचें वैशिष्ठय म्हणजे त्यांचा आकार व त्यांची घडण याबाबतींत एकसारखेपणा आढळतो. या मशिदीतलें कलाकुसरीचें नक्षीकाम तर अतिशय प्रेक्षणीय असें आहे.

शिर्डीचें साईबाबा

अहमदनगर शहरापासून ५२ मैलांवर कोपरगांव तालुक्यामध्यें नगर-मनमाड रस्त्यावर शिर्डी हें गांव असून तेथें संत साईबाबा यांची समाधी आहे. साईबाबा यांचा भक्तगण दूरदूरवर पसरलेला आहे. तेव्हां बाबांच्या दर्शनासाठीं स्त्री-पुरुषांच्या झुंडीच्या झुंडी लोटत असतात. सकाळीं १२ वाजतां व रात्रीं ८ वाजतां आरती असते. तेव्हां सारा सभामंडप भक्तगणांनीं भरून जातो. गुरुवारीं व रामनवमीस येथें विशेष यात्रा असते.

साईबाबांच्या समाधीवर एक सुरेखसें मंदीर उभारले असून तेथें साईबाबांची पांढरीशुभ्र मूर्ति बसविलेली आहे.

याखेरीज अहमदनगर जिल्ह्यामध्यें धार्मिक, ऐतिहासिक व प्रेक्षणीय अशीं किती तरी स्थळें आहेत.

कर्जतपासून आठ मैलांवर राशिन या गांवीं देवीचें प्रसिद्ध देऊळ असून त्याच्या आवारांत उंच अशी एक दीपमाळ आहे. आंतल्या पायऱ्या चढून वर जातां येतें, आणि तिथून ती हातानें हालवितां येते. हा चमत्कार कशामुळें घडतो हें अद्यापि कुणाला सांगतां आलें नाहीं.

अहमदनगरपासून १२ मैलांच्या अंतरावर दोन डोंगरांच्या दरीमध्यें डोंगरगण या नांवाचें एक अतिशय रम्य असें ठिकाण आहे. तेथें महादेवाचें देऊळ असून दर श्रावण महिन्यांत तिसऱ्या सोमवारीं तेथें मोठी यात्रा भरते. एरव्हीं विद्यार्थ्यांच्या सहलींमुळें हें ठिकाण गजबजलेलें आढळतें. प्रभु रामचंद्र व सीतामाई यांचें वास्तव्य या ठिकाणीं होतें असें बोललें जातें. त्या वेळच्या बऱ्याच दंतकथा उपलब्ध आहेत. अहमदनगर शहरांपासून १७ मैलांच्या अंतरावर असलेल्या जामगांव येथें ग्वाल्हेरच्या शिंद्यांचा इतिहासप्रसिद्ध वाडा आहे तर ३२ मैलांवर असलेल्या मढी या गांवीं नवनाथांपैकीं एक कानिफनाथ यांची समाधी आहे. दर रंगपंचमीस येथें मोठी यात्रा भरते. अहमदनगर पासून ५४ मैलांवर असलेलें पैठण ही तर एकनाथ महाराज यांची कर्मभूमि. ज्ञानदेवांनीं रेड्याच्या तोंडून वेद वदविला तो याच ठिकाणीं. दर नाथ षष्ठीस येथें मोठ्या प्रमाणावर यात्रा भरते.

कर्जत तालुक्यामध्यें सिद्धटेक नांवाचें एक रम्य स्थळ असून भीमा नदीच्या कांठावर गणपतीचें जुनेंपुराणें मंदिर उभारलेलें आहे.

साकोरी हें उपासनी महाराजांचे स्थान शिर्डीपासून फक्त ३ मैल अंतरावर असून तेथें सति गोदावरी या साध्वीचा आश्रम आहे.

ज्ञानेश्वराचा खांब आणि मोहिनीराजाचें मंदीर, नेवासा

अहमदनगरच्या वायव्येस ३५ मैलांवर प्रवरा नदीच्या कांठी नेवासा हें तीर्थक्षेत्र वसलेलें आहे. आजच्या नवासा गावांपासून २–३ फर्लांगाच्या अंतरावर ज्ञानोबाचा खांब म्हणून ओळखला जाणारा एक दगडी खांब आहे. थोर संतकवि ज्ञानेश्वर यांनी आपली ज्ञानेश्वरी या खांबाला टेकून लिहिली, असें सांगण्यांत येतें. या ठिकाणीं आतां एक सुरेखसें संगमरवरी मंदीर उभारण्यांत येत असून येथें स्थापिलेल्या ज्ञानदेवांच्या दर्शनासाठीं महाराष्ट्रांतील सर्व भागांतून लोक येत असतात. हें एक आतां तीर्थयात्रेचें ठिकाण झालें आहे.

या ज्ञानोबाच्या खांबावर सात ओळींचा एक लेख कोरलेला असून तेथें दोन संस्कृत श्लोकहि लिहिलेल आहेत. त्यांतील एका श्लोकांत नेवासा हें मोहिनीराजाचें एक निवासस्थान असल्याचा उल्लेख आहे. मोहिनी राज हें महाराष्ट्रांतील बऱ्याच लोकांचें कुलदैवत असून देवदर्शनासाठीं खानदेश, मराठवाडा, विरार वगैरे भागांतून लोक येतात.

मोहिनीराजाविषयीं खालील कथा उपलब्ध आहे

समुद्र मंथनाच्या वेळीं अमृत कलश मिळाल्याचें पाहून देव आणि दैत्य या दोघांनाहि आनंद झाला. पण त्यांतील अमृत प्राशन करण्याचा प्रश्न निघाला तेव्हां मात्र त्यांच्यांत खटके उडूं लागले. देवांबरोबर दानवहि

अमृत पिऊन अमर होऊं पहात होते. आणि ही गोष्ट का देवांना रुचणार होती ? तेव्हां भगवान विष्णु देवांच्या मदतीला धांवले. त्यानीं तारुण्यानें मुसमुसणाऱ्या व अनुपम लावण्यानें नटलेल्या मोहिनीचें रुप धारण केलें. आणि सुंदरशी वेशभूषा करुन ते नाचत मुरडत देवदैत्यांच्यापुढें येतांच त्यांनीं कल्पना केल्याप्रमाणें दैत्य मुग्ध होऊन त्यांच्याकडे पाहूं लागले. मोहिनीच्या मादक सौंदर्यानें त्यांना मोहिनी घातल्याचें स्पष्ट दिसत होतें. या संधीचा फायदा घेऊन मोहिनीरूप विष्णूनें अमृतकलश उचलला आणि त्यांतील अमृत वांटण्याचें निमित्त करून एका बाजूला देवांना व दुसऱ्या बाजूला दैत्यांना बसविलें आणि देवांना अमृत तर दैत्यांना पाणी वाढले.

या विष्णूच्या अर्धनारी नटेश्वराच्या रूपाला मोहिनीराज असेंहि संबोधण्यांत येत असून त्याचीच मूर्ति नेवासा येथें स्थापिलेली आहे.

या तीर्थक्षेत्रानें बऱ्याच ऐतिहासिक घडामोडी पाहिलेल्या आहेत.

निजामशाहीच्या काळांत राजे शहाजी भोसले यांची वेरुळ येथें नेमणूक झाली असतां त्यांचा नेवासा गांवीं बरेच वेळां मुक्काम पडत असे. त्यावेळीं त्यांनीं मोहिनीराज मंदिराला देणग्या दिल्या होत्या. त्यानंतर शिव छत्रपतीनें महाराष्ट्रांत आपलें आसन स्थिर केल्यावर त्यांचा उजवा हात म्हणून समजला जाणारा नेताजी पालकर यानें नेवासा भाग मराठा राज्याला जोडला.

मोगल बादशहा औरंगजेबाच्या मृत्यूनंतर या भागावर होळकरांचें वर्चस्व प्रस्थापित झालें. आणि गंगाधर यशवंत चंद्रचूड या नांवाच्या होळकराच्या एका सरदारास नेवासा हें गांव जहागीर म्हणून देण्यांत आलें. त्या वेळीं तो वाईचा दिवाण असून त्यानें खूप धनदौलत जमा केली होती. पुढें त्याचें मल्हारराव होळकरांशीं बिनसल्यानें त्याची दिवाणगिरी काढून घेण्यांत आली व त्याला वाईतून हद्दपार करण्यांत आलें. तेव्हां तो नेवासा येथें येऊन राहिला असतां मोहिनीराज हें जागृत दैवत असल्याची गोष्ट त्याच्या निर्दशनाला आली. तेव्हां त्यानें देवाला आळवून म्हटलें, " तुझ्या कृपाप्रसादानं मला जर का माझं पूर्वीचं दिवाणपद परत मिळालें तर मी या ठिकाणीं सुंदर मंदिर उभारीन. "

आणि यानंतर थोड्या दिवसांनीं पेशवे व होळकर यांच्यामध्यें करार होऊन गंगाधरपंतांची फिरून वाईचें दिवाण म्हणून नेमणूक झाली.

तेव्हां दिलेला शब्द खरा करायच्या हेतूनें सरदार चंद्रचूड यानें १७७३ सालीं मोहिनीराजाचें भव्य आणि सुंदर असें मंदिर बांधलें. त्या वेळच्या स्वस्ताईच्या काळांत त्यानें चार पांच लाख रुपये खर्च केले. हें मंदिर ७५ फूट उंच असून वर बारीक नक्षीकामानें युक्त असें शिखर आहे. मंदिरांत आंतल्या बाजूसहि सुंदरसें नक्षीकाम केलेलें असून मधल्या गाभाऱ्यामध्यें मोहिनीराजाची म्हणजे विष्णूची मूर्ति बसविलेली आहे तर बाहेरच्या सभामंडपामध्यें गणपति, सरस्वती, शंकर, पार्वती, शनि, मारुती वगैरे देवतांच्या मूर्ति उभारलेल्या आहेत.

पेशव्यांनीं या देवळाला वार्षिक १५०० रु. ची मदत मंजूर केली होती ती १८६० पर्यंत मिळत होती. १८६१ सालीं इनाम कमिशननें ती बंद केली. नंतर ब्रिटिशांनीं मंदिराच्या खर्चासाठीं म्हणून वार्षिक २४८ रु. ची रक्कम मंजूर केली. आतां गांवचें लोक या देवळाचा खर्च त्यांच्या जमिनीच्या उत्पन्नांतून करतात.

शिंगणापूर येथील शनीची उघडी मूर्ति

घरांना दरवाजे नाहींत, मौल्यवान वस्तू ठेवावयाच्या कपाटांना कुलुपें नाहींत आणि धनधान्य उघड्यावर टाकलें तरी तें कधीं चोरीला जात नाहीं असें एक गांव नगर जिल्ह्यांत आहे. या गांवचे दुकानदार आपलें दुकान तसेंच उघडें ठेवून निर्धास्तपणें झोंपू शकतात आणि शेतकरी सुगीच्या दिवसांतहि खळ्यावर राखण

महाराष्ट्र राज्यांतील सहकारी साखर कारखान्यांची ३०–६–१९५

सहकारी साखर कारखान्याचें नांव	सभासद संख्या — उत्पादक	सभासद संख्या — बिगर उत्पादक	सभासद संख्या — सहकारी सोसायटचा	ऊंसाचें क्षेत्र एकर	ऊंस खरेदी टन	तयार झालेली साखर — हंगामांतील— टन	तयार झालेली साखर — हंगामांतील— सरासरी उतारा	मुंबई सरकार
अहमदनगर जिल्हा								
(१) प्रवरा	१३४७	३	१८	४,५३९	१,५९,७२८	१८,१६१	११.३०	१०,००,०००
(२) कोपरगांव	८९७	७	२४	३,६०८	१,६३,०१०	१८,५२०	११.३३	१०,००,०००
(३) अशोक	७१३	—	१८	३,०६९	९६,१११	१०,९८४	११.२५	१०,००,०००
(४) राहुरी	१२९५	—	१७	३,५००	१,२३,१५८	१४,४८९	११.७०	१०,००,०००
(५) गणेश	१६७२	३	२२	३,७२०	१,१८,९५२	१४,०५५	१२.२९	१०,००,०००
पुणें जिल्हा								
(६) मालेगांव	१३१३	१	१७	३,०००	१,२८,२१२	१५,९३७	१२.४३	१०,००,०००
(७) श्री छत्रपति	६४२	—	१०	१,९९१	८९,७७५	१०,२७८	११.४५	१०,००,०००
उत्तर सातारा जिल्हा								
(८) श्री राम	१२९७	६४	१९	२,८००	१,१५,४०६	१३,९२३	१२.७	९,९९,७५०
(९) कृष्णा	१७५१	६	३८	३,५००	—	—	—	२०,००,०००
दक्षिण सातारा जिल्हा								
(१०) शेतकरी	१३०४	१३	४४	३,०३६	४९,१७७	५,२३२	—	१०,००,०००
कोल्हापूर जिल्हा								
(११) श्री पंचगंगा	१५६८	२९	६१	३,५००	४,८०३	३५६	१३.१८	१०,००,०००
(१२) ″वारणा	१६८६	१९	२७	५,५९६	—	—	—	१०,००,०००
(१३) ″भोगावती	१६३३	१	२३	३,०००	१६,२१७	१,९००	११.२९	१०,००,०००
(१४) दूधगंगा वेदगंगा						माहिती उपलब्ध नाहीं		१०,००,०००
नाशिक जिल्हा								
(१५) गिरणा	१०४१	—	२३	२,७५०	७१,११७	६,८६६	१३.८०	१०,००,०००

अखेरची सांपत्तिक परिस्थिति व इतर माहिती दर्शविणारा तक्ता

स्वतःचें भांडवल		कर्जाऊ भांडवल					
वसूल झालेलें भाग भांडवल					एकूण खेळतें	कारखाने चालविण्याचा	१९५८–५९चा नफा——तोटा
सभासद	गंगाजळी	ठेवी इतर फंडस्	इ. फा. को.	मध्यवर्ती बँकेचें	भांडवल	व्यवस्था खर्च	(+ नफा) (— तोटा)
३६,५७,३३४	६७,५२,१४०	३०,०५,६५०	३,००,०००	३९,११,८८३	२,२४,१९,८१५	४,७०,०९८	५,९५,०९७
३८,६८,०३२	३९,८५,७७७	१९,८०,६३९	३०,९७,३३६	३७,२०,३५०	१,७७,४९,६९९	६,०१,२२१	४,४२,९१४
१९,७५,७४१	१०,२८,०८३	४,७८,७६१	५२,५०,०००	४९,७३,१४१	१,५७,८३,६१०	२,६५,६८९	८७,५०६
२३,८९,४४८	२८,०५,०२१	४,७२,२३६	५२,५०,०००	२४,५५,२२३	१,६६,०८,३१३	२,८८,०५८	११,६१०
२१,५४,७८२	१७,२७,०५७	५,०७,२४४	५२,५०,०००	५४,५४,४८१	१,६४,१८,८७०	३,८५,५५४	७,७२६
२१,७३,५८४	२०,२५,३६३	५,३०,१०५	–	१९,९८,०७१	६६,६९,७०९	९,८६,०००	३,७३,८
१२,५५,४९४	८,६४,८९७	६,१५,६१५	२२,००,०००	२३,६३,३८७	७०,१३,८९९	१,०६,८२२	—
२०,६३,०५४	१७,८४,०३०	५,०६,०७५	४४,०३,१४१	४३,३४,४००	१,४३,४५,०५९	८,४३,११५	२,०५,३३६
१७,४०,८७०	७,७४२	१०,८४७	–	–	३८,१५,९९२	४०,९३५	१८,८०५
१५,५९,३३७	२,३४,११६	२,४४,५७१	५५,००,०००	४३,०४,४१४	१,७२,१४,७५०	४,३३,७०२	१,४८,०५४
१५,१७,९३२	३१,३७४	२३,२२५	५४,७५,०००	२०,५७,४८७	७५,३२,४८७	९६,५१२	४,५७,२५१
१५,४६,९७२	१,२३,०४३	३२,७३५	५४,७५,०००	२४,८९,०४५	१,३८,५३,१७७	२,३९,१६१	२,३३,५१३
१८,७१,९३९	८,९५४	४९,९६९	५४,७५,०००	४३,०७,०१८	९७,५७,०१८	१६,३९,९६८	३,८९०
१६,३०,३००	५,६६०	५६,०१६	५५,००,०००	५२,७६,९७०	१,६७,१०,२२६	२,००,०००	१,४५,२१९

न ठेवतां निष्काळजीपणें घरीं राहूं शकतात. या गांवांत कुठल्याहि वस्तूला कुणीहि हात लावणार नसल्याची सर्वांना खात्री आहे.

अशा या जगावेगळया गांवाचें नांव शिंगणापूर असें असून तें अहमदनगर शहरापासून २५ मैलांवर नेवासें तालुक्यांत आहे. या गांवीं शनीचें जाज्वल्य देवस्थान असून प्रत्येक अमावास्येच्या दिवशीं येथें मोठी यात्रा भरते. त्या वेळीं आसपासच्या टापूंतीलच नव्हे तर दूरदूरच्या भागांतील हजारों स्त्री-पुरुष दर्शनासाठीं येतात.

ही शनिदेवाची मूर्ति अदमासें साडेपांच फूट उंचीची असून ती एका दगडी चौथऱ्यावर बसविली आहे. मूर्ति उघडी आहे. तिच्यावर मंदिर उभारलेले नाहीं. हें दैवत जागृत असून शिंगणापूरच्या हद्दींत जर का कुणी चोरी केली तर शनिमहाराजांचा त्याच्यावर कोप होऊन तो आंधळा होतो अशी लोकांची दृढ समजूत आहे. या गोष्टीचें प्रत्यंतर पुष्कळदां आल्याचेहि लोक बोलतात. म्हणून चोरी करायला कोणी धजत नाहीं.

एवढ्याचसाठीं शिंगणापूरला शनिदेवाची खूप मोठी यात्रा भरत असल्यावेळीं चोरीचपाटीचा प्रकार चुकूनदेखील झालेला आढळत नाहीं. गांवच्या हद्दींत प्रवेश केलेल्या दरेक स्त्री-पुरुषाच्या मनामध्यें शनीची धास्ती असल्यानें आपल्या हातून प्रमाद घडला तर तो जागा देव आपल्याला गय करणार नाहीं, या समजुतीनें ते चुकून देखील आपल्या हातून चोरीचें पाप होऊं न देण्याची खबरदारी घेतात. इतकेंच नव्हे तर शनी देवाचें दर्शन घेते वेळीं त्यांच्या हातून नकळत तशी चूक झाली असल्यास त्याबद्दल त्यांना क्षमा करण्याविषयींची अनन्य भावें याचना करतात.

देवदर्शनासाठीं आलेले लोक मूर्तीला लोटयानें पाणी घालतात आणि नंतर त्याला तेल, फुलें, बिब्बा, खिळा, कवडी, उडीद, वगैरे वस्तू अर्पण करतात.

ते पाण्याचे लोटे थोडया अंतरावर फुलें विकणाऱ्या माळ्यापाशीं ठेवलेले असतात. देवदर्शनासाठीं आलेली मंडळी माळ्यापासून फुलाबरोबर पाण्याचे लोटेहि मागून घेतात व देवाला पाणी घालून झाल्यावर ते ज्यांचें त्याला परत करतात. फुलें विकणाऱ्यांचें लोटे नेणाऱ्यांकडे लक्ष नसलें तरी लोटा घेऊन पसार होण्याची कल्पना कोणाच्याहि मनाला शिवत नाहीं.

तीच गोष्ट तेथील दुकानांतल्या वस्तूंची. दुकानदारांची नजर चुकवून एखादी वस्तू चोरायची गोष्ट तर दूरच राहो पण जवळ पैसे नसल्यानें एखाद्यानें एखादी वस्तू विकत घेतली आहे आणि नंतर त्यानें न चुकतां पैसे आणून दिले नाहींत असें कधीं घडतच नाहीं मुळीं. ही गोष्ट ठाऊक असल्यानें एखाद्या अनोळखी गिऱ्हाईकानें कितीहि भारी किंमतीची वस्तू उधार मागितली तरी ती द्यायला दुकानदार मागेंपुढें पहात नाहीं. कारण आपली फसवणूक होणार नसल्याची त्याची खात्री असते.

शिंगणापूर हें ३०० वस्तीचें छोटेसें गांव असून तेथें ५०–६० घरें आहेत. एकाहि घराला दरवाजा आढळणार नाहीं. जितकें तिकडें नुसत्या चौकटी उभ्या केलेल्या दिसतील. तसेंच घरांतील कपाटांना दारें नसून ट्रंकापेटयांना कडीकोयंडा नसलेलें आढळून येईल. मग कुलूपकिल्लीचें तर नांवच नको. कारण कडीकोयंडा असलेली पेटी गांवांत आणणें म्हणजें शनिदेवाच्या प्रभावाविषयीं अविश्वास दर्शविणें होय अशी लोकांची दृढ समजूत आहे. यात्रेच्या दिवशीं शनिदेवाची पालखी निघते. त्यावेळीं भाविक लोकांच्या झुंडीच्या झुंडी तेथें लोटतात. पालखींत ठेवलेल्या शनिदेवाच्या मुकूटावर फुलांचा नुसता वर्षाव होत असतो. जमलेल्या प्रचंड जन समुदायांत गुन्हेगारहि असण्याचा संभव असतो. पण चोरी करायचा विचार चुकूनसुद्धां कुणाच्या मनाला शिवत नाहीं.

शिक्षण

शिक्षण म्हणजे लिहितां वाचतां येऊन नोकरीची तयारी करण्याचें साधन एवढाच संकुचित अर्थ आता शिक्षणास राहिला नसून शिक्षण म्हणजे संपूर्ण जीवनावर परिणाम करणारे संस्कार अशा व्यापक अर्थानें आतां स्वातंत्र्योत्तर भारतांत शिक्षणाकडे पाहण्यांत येत आहे. आणि याच दृष्टिकोनांतून शिक्षणाचे विविध अंगांचा आणि स्तरांचा विकास करण्यांत येत आहे. जनतेची शिक्षणाकडे वाढती ओढ व शिक्षणांत सर्वतोपरी सहाय्य करण्याचे शासनाचें ध्येय यामुळें शिक्षणाचा विस्तार जिल्ह्यांत फार वेगानें होत आहे. शिकणारे, शिक्षण देणारे व शैक्षणिक संस्था या सर्वांच्याच संख्येंत १९४७–४८ नंतर नगर जिल्ह्यांत वाढ झालेली दिसून येते. अहमदनगर जिल्ह्यांत अगदी पूर्व प्राथमिक शिक्षणापासून ते विश्वविद्यालयीन शिक्षणापर्यंतच्या शिक्षणाची आतां सोय आहे.

शिक्षण क्षेत्रांतील विविध स्तरांत १९४७ नंतर नगर जिल्ह्यांत जो व्याप वाढला व प्रगति झाली त्याचा खालीलप्रमाणें अनुक्रमें विचार केल्यास तो उद्बोधक ठरेल.

पूर्व प्राथमिक शिक्षण.

३ ते ६ वर्षे वयाच्या मुलांकरितां पूर्व प्राथमिक शाळांतून शिक्षणाची व्यवस्था असते. नगर जिल्ह्यांत सरकारमान्य पूर्व प्राथमिक शाळा आहेत.

प्राथमिक शिक्षण

नगर जिल्ह्यांत प्राथमिक शिक्षणाची व्यवस्था स्थानिक स्वराज्यसंस्थांच्याकडे आहे. नगर जिल्हा प्राथमिक शिक्षण मंडळ, नगर शहर प्राथमिक शिक्षण मंडळ व कॅन्टोनमेन्ट या तीन संस्था प्राथमिक शिक्षणाची व्यवस्था पाहतात. सध्या या संस्थांच्या कार्यक्षेत्रांतील शाळांची संख्या १७०५ आहे. त्यापैकीं मुलांच्या १६५४ व मुलींच्या ५१ शाळा आहेत. या शाळांतून १,२८,७५८ मुलें व ६७,९०९ मुली असे एकूण १,९६,६६७ विद्यार्थी शिक्षण घेतात. या शाळांतील शिक्षकांची संख्या सुमारें ४८५४ असून पैकीं ३५७३ प्रशिक्षित शिक्षक आहेत.

प्राथमिक शाळा व विद्यार्थी यांचे सध्यांचे आंकडे व १९४७–४८ मधील आंकडे यांची तुलना केल्यास साधारणत: १३ वर्षांच्या कालावधींत प्राथमिक शिक्षणाच्या बाबतींत कशी वाढ झाली हे दिसून येईल. १९४७-४८ मध्यें जिल्ह्यांत प्राथमिक शाळांची संख्या फक्त ७८९ होती ती आतां १७०५ वर गेली आहे व प्राथमिक शाळेंत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या फक्त ४१,१६१ होती ती आता सुमारें २ लक्षांवर पोहचली आहे

पुणें विभागांत अथवा संपूर्ण महाराष्ट्र राज्यांत दर लाख लोकसंख्येंस प्राथमिक शिक्षण संस्थांच्या सरासरी प्रमाणापेक्षां अहमदनगर जिल्ह्यांतील दर लाख लोकसंख्येस प्राथमिक शिक्षण संस्थांचें असणारें सरासरी प्रमाण जास्त आहे.

१९४७–४८ पासून जिल्ह्यांतील प्राथमिक शिक्षण संस्था आणि विद्यार्थी यांच्या संख्येंत कशी वाढ झाली हें खालील तक्त्यावरून दिसून येईल.

वर्ष	शाळा	विद्यार्थी
१९४७–४८	७८९	४१,१६१
१९५०–५१	१,४३३	१,५१,६०५
१९५५–५६	१,५५८	१,६७,०८६
१९५७–५८	१,६२३	१,७७,४६६
१९५८–५९	१,६३८	१,९४,८८९
१९५९–६०	१,६६२	१,९८,७६७
१९६०–६१	१,६९२	२,१२,६१७

जीवन शिक्षण

जीवनाद्वारा दिलें जाणारें शिक्षण तें जीवन शिक्षण. अशा प्रकारचें शिक्षण देणाऱ्या शाळाहि जिल्ह्यांत आहेत. या शाळांतून एक मूलोद्योग प्राधान्येंकरून शिकविला जातो. मूलोद्योगाच्या दृष्टीनें वर्गवारी केल्यास सूतकताई, विणकाम यांचें शिक्षण देणाऱ्या ३१३, शेती भूलोद्योग शिकविणाऱ्या ६४, आणि सुतार कामाचें शिक्षण देणाऱ्या २२ अशा विविध मूलोद्योगाचें शिक्षण देणाऱ्या एकूण ३९९ शाळा आहेत व त्यांत एकंदर ५२,१८८ विद्यार्थी शिक्षण घेतात. १९५५–५६ मध्यें नगर जिल्ह्यांत बेसिक शिक्षणाच्या फक्त २१५ शाळा होत्या व विद्यार्थी फक्त १५५८ होते. यावरून मूलोद्योगाचें शिक्षण देणाऱ्या शाळा आणि शिक्षण घेणारे विद्यार्थी यांच्यांत मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे हें दिसून येईल.

जीवनोपयोगी शिक्षण

शिक्षण हे जीवनोपयोगी करुन शिक्षण संपताच विद्यार्थ्यांस त्याचे जवळ कांहीं तरी अर्थोत्पादनाची कला असावी हा मूलोद्योग शिक्षणाचा खरा उद्देश आहे. " Earn while learn " या म्हणीचा प्रत्यय या भूलोद्योग शिक्षण देणाऱ्या शाळांत येतो. या शिक्षण पद्धतीचा मुलांच्या दैनिक जीवनावर चांगला परिणाम होतो व शिक्षणाबरोबर विद्यार्थ्यांना कष्ट करून अर्थोत्पादनाची संवयहि लागते. या शाळांत सूतकताई, विणकाम, कापूसवेंचणी इत्यादि, कापसाचे सूत काढण्यापासून त्याचे शर्टिंग, कोटिंग, चादरी,

टॉवेल्स, लुगडीं, धोतरें इत्यादि उपयुक्त कापड तयार करण्यापर्यंत यशस्वी प्रयोग करण्यांत येतात. त्याच प्रमाणें शेतकी शाळांतून शेतीचीं विविध प्रकारचीं कामें करून घेतलीं जातात व सुतारकाम शाळांतून फळा, खुर्ची, खुंटाळी वगैरे नाना तऱ्हेच्या विविधोपयोगी वस्तू तयार करून घेण्यांत येतात. सन १९६०–६१ मध्यें मूलोद्योगाचें शिक्षण देणाऱ्या शाळांत जिल्ह्यांत एकूण ३४,२६१ रुपये किंमतीचा कच्चा माल वापरण्यांत आला व त्यापासून एकूण ४७,२३१ रुपये किंमतीचा माल तयार करण्यांत आला. अशा प्रकारें तयार झालेल्या मालाचे नमुने प्रदर्शनांत मांडण्यांत येतात आणि त्यांच्या विक्रीचीहि व्यवस्था करण्यांत येते.

सक्तीचें प्राथमिक शिक्षण

जिल्ह्यांतील २०० पेक्षां अधिक लोकवस्ती असलेल्या ७ ते ११ वर्षे वयोमर्यादा असलेल्या मुलांकरितां सक्तीची शिक्षण योजना लागू करण्यांत आली आहे. नगर जिल्ह्यांत सन १९६०–६१ सालीं ६९,४८४ मुलें व ४४,५६० मुलींची सक्तीच्या शिक्षणाकरितां नोंद करण्यांत आली आहे.

माध्यमिक शिक्षण

नगर जिल्ह्यांत मुलांचीं ९२ व मुलींचीं ५ अशीं एकूण ९७ हायस्कूल्स असून त्यांत अनुक्रमें १७,२०७ आणि ४,०७८ अशी एकूण २१,२८५ विद्यार्थ्यांची शिक्षणाची व्यवस्था आहे. १९५१ सालीं या जिल्ह्यांत फक्त २६ हायस्कूल्स होती व त्यांत एकूण ७,७४७ मुले शिकत होती. म्हणजे अवघ्या १० वर्षांत जिल्ह्यांत विद्यार्थ्यांच्या संख्येंत शेंकडा २७५ व शाळांच्या संख्येंत शेंकडा ३७३ वाढ झाली आहे. यावरून माध्यमिक शिक्षणाचें प्रमाण किती वाढलें आहे याची कल्पना येईल.

जिल्ह्यांतील एकूण ९७ माध्यमिक विद्यालयांपैकीं विविधोद्देशीय ४ शाळा व एक व्होकेशनल विद्यालय आहे. याशिवाय नगर येथील दादा चौधरी विद्यालयांत सरकारी कॉमर्स सेन्टर सुरू आहे. तसेंच नगर शहरांत एक शासकीय टेक्निकल हायस्कूल सुरू असून अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या शाळेंतून या विभागांतील शिक्षणाची व्यवस्था आहे.

विविधोद्देशीय शाळांपैकीं मुलींच्या सरकारी हायस्कूलमधून गृहशास्त्र, नगर येथील कन्या शाळेंत कला, व संगमनेर, जामगांव, कर्जत व मांडवगण या गांवांतील शाळांतून शेती हा विषय शिकविला जातो.

शैक्षणिक संस्थांच्या व विद्यार्थ्यांच्या वाढीबरोबर प्रशिक्षित शिक्षकांचीहि उत्तम दर्जाच्या शिक्षणाकरितां आवश्यकता असते. त्या दृष्टीनें नगर जिल्ह्यांत शिक्षकांच्याकरितां प्रशिक्षण देणाऱ्या संस्थाहि आहेत. प्राथमिक शिक्षकांच्या प्रशिक्षणाकरिता पांच प्रशिक्षण महाविद्यालयें आहेत. त्यापैकीं स्त्रियांच्याकरितां एक आहे. या महाविद्यालयांतून सुमारें २०० शिक्षक दरवर्षी प्रशिक्षण घेऊन बाहेर पडतात. माध्यमिक शाळांच्या शिक्षकांकरितांहि तीन इन्स्टिटयूट्स आहेत. त्याचप्रमाणें शारीरिक शिक्षणासाठीं एक व गायनाची एक शाळा आहे. नगर येथें एक आर्टस् व सायन्स या विषयांचें महाविद्यालय असून श्रीरामपूर व संगमनेर येथें नवीन महाविद्यालयें नुकतींच सुरू झालीं आहेत.

१९५०–५१ पासून आतां पर्यंत जिल्ह्यांत माध्यमिक शिक्षणाची कशी वाढ झाली हें खालील तक्त्यावरून दिसून येईल.

वर्ष	शाळांची संख्या.	विद्यार्थ्यांची संख्या.
१९५०–५१	२६	७,७४७
१९५५–५६	४०	९,७६८
१९५७–५८	४९	१२,२९१
१९५८–५९	५४	१४,२७६
१९५९–६०	७१	१७,०७६
१९६०–६१	९७	२१,४०६

राष्ट्रीय शिस्त योजना

विविध विषयांच्या पुस्तकें अथवा प्रात्यक्षिकाद्वारें दिल्या जाणाऱ्या शिक्षणाइतकेच जीवनामध्यें शारीरिक शिक्षण, शिस्त, सहजीवन व नीतिशिक्षण यांस महत्त्व आहे. यादृष्टीनें शालेय शिक्षणांत राष्ट्रीय शिस्तयोजना सुरुं करण्यांत आली आहे. जिल्ह्यामध्यें मध्यवर्ती सरकार व महाराष्ट्र सरकारतर्फे शारीरिक शिक्षणांत प्रशिक्षित असलेले एकूण ३३ शिक्षक-शिक्षिका राष्ट्रीय शिस्त योजनेखालीं काम करीत आहेत. याशिवाय इतर ९ जादा शिक्षकांचाहि या कामीं उपयोग करण्यांत येतो.

पंचवार्षिक योजनेंतून शिक्षणास सहाय्य

या जिल्ह्यांत ज्या दोन पंचवार्षिक योजना पूर्ण करण्यांत आल्या आहेत त्यांतूनहि शिक्षणाच्या कार्यक्रमास खालीलप्रमाणें सहाय्य करण्यांत आलें आहे.

(१) इंग्रजी शाळेच्या इमारतीची अडचण दूर करण्याच्या दृष्टीनें इमारतीच्या एकंदर खर्चाच्या ५० टक्के म्हणजे आतांपर्यंत २,८१,२५० रुपये अनुदान देण्यांत आलें.

(२) दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत शाळांना इमारती बांधण्याकरितां ३,८०,००० रुपये कर्ज देण्यांत आले.

(३) विद्यार्थ्यांचीं वसतिगृहें बांधण्याकरितां ३०,००० रुपये अनुदान देण्यांत आलें.

(४) इच्छा व योग्यता असूनहि ज्यांना शिकण्याची ऐपत नाहीं अशा विद्यार्थ्यांना दरसाल ९० रुपयेप्रमाणें १,८०० रुपये कर्ज देण्यांत आले.

(५) १२०० रुपयापेक्षां कमी उत्पन्न असलेल्या पालकांच्या मुलांना फीची सवलत मिळावी म्हणून मुलांच्या फीकरितां म्हणून शाळांना ८५,०६९ रुपये दिले.

(६) याशिवाय स्काउटिंग, शास्त्रीय ज्ञानाचीं अभ्यास मंडळें यांच्या प्रगतीकरितां अनुदान देण्यांत आलें.

(७) शाळांना लागणारीं शैक्षणिक उपकरणें व पुस्तकें घेण्यासाठीं पहिल्या पंचवार्षिक योजनेंत ३४,२१५ रुपये अनुदान देण्यांत आले. याशिवाय प्राथमिक शाळांचें बांधकाम करण्याकरितां जिल्हा प्राथमिक शिक्षण मंडळास बरीच मोठी रक्कम मंजूर करण्यांत आली.

समाज शिक्षण

प्राथमिक शिक्षण, माध्यमिक शिक्षण व उच्च शिक्षण आदि प्रकारच्या शैक्षणिक कार्यक्रमांस शासनाकडून अधिकाधिक सहाय्य तर होतच आहे. पण जे अशा प्रकारच्या कोणत्याच शैक्षणिक दर्जात बसत नाहींत अशी असंख्य प्रौढ अशिक्षित जनता विशेषतः ग्रामीण भागांत पसरली आहे. त्यांना सुशिक्षित जरी नाहीं तरी कमींत कमी साक्षर करणें अगत्याचे आहे. त्यादृष्टीनें शासनातर्फे सर्वत्र सुरू करण्यांत आलेल्या साक्षरता मोहिमेसहि जिल्ह्यांत मोठ्या प्रमाणांवर यश मिळालें आहे. दोन्ही पंचवार्षिक योजनाच्या काळांत सुमारें १ लक्ष प्रौढांना साक्षर करण्यांत येऊन त्याकरितां अंदाजे ३ लक्ष रुपये खर्च करण्यांत आला. नुकत्याच सुरू कर-

ण्यांत आलेल्या ग्रामशिक्षण मोहिमेनुसार जिल्ह्यांत कार्यास जोरांत सुरवात करण्यांत आली असून जिल्ह्यांत या योजनेखालीं १५८ गांवांची निवड करून या गांवांत एकहि निरक्षर न ठेवण्याच्या प्रयत्नास निर्धारानें सुरुवात झाली आहे.

तांत्रिक शिक्षण

अहमदनगर येथील शासकीय औद्योगिक शाळेंत एक इन्डस्ट्रियल ट्रेनिंग इन्स्टिटयूट सुरू झाली आहे. ही इन्स्टिटयूट राज्यसरकार द्वारें केंद्रीय सरकारच्या सहाय्यानें चालविण्यांत येत असून यांत सध्या ड्राफट्समन, इलेक्ट्रिशिअन, वेल्डर्स, त्याच प्रमाणें टर्नर्स व फिटर्स यांच्या शिक्षणक्रमाचें एकूण २ वर्षांचें शिक्षण दिलें जातें.

इंजिनिअरिंग प्रशिक्षण

त्याच प्रमाणें केंद्रिय संरक्षण मंत्रालयातर्फे नगर येथील भारतीय सेनादलाच्या टी. डी. ई. (व्ही. ई.) या केंद्रांत इंजिनिअरिंगचा पदवी परीक्षेचा दर्जा असलेला ए. एम्. आय्. ई. चा अभ्यासक्रम नुकताच सुरू झाला आहे. या केंद्रांत ४० जणांच्या प्रशिक्षणाची व्यवस्था आहे.
